**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७३२/०२**

**श्री.योगेश मनोहर कोथमिरे**
**१४-अ-११२ बिंबिसार नगर, संक्रमण शिबीर,**
**महानंद डेअरीच्या बाजूला, गोरेगांव (पु),**
**मुंबई ४०० ०६५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन)**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.योगेश कोथमीरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०६.२००७ रोजी अर्ज करुन, दि.२७ एप्रिल, २००७ व दि.७ मे, २००७ रोजी आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांना समक्ष दिलेल्या अर्जावर काय कारवाई झाली. यांची सुस्पष्ट मुध्देसुध माहिती मिळावी. अर्जाबाबत नियमानुसार कार्यवाही करते वेळी नस्ती बनविणे क्रमप्राप्त आहे किंवा कसे. सदर अर्जावर नस्ती बनविली असल्यास सदर नस्तीच्या म्हणजेच टिप्पनी, शेरे असलेले छायांकित प्रती नियमानुसार मिळाव्यात. नस्ती बनविली नसल्यास त्याचे कारण काय इत्यादी माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे विहित वेळेत माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.०७.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत आदेश दिले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महानगरपालिकेच्या मालकीची सदनिका निवासस्थान म्हणून मिळण्याबाबत दि.२७.०४.२००७ रोजी अर्ज केला होता.  महापालिकेच्या मालकीची शिखर सोसायटी येथील सदनिका अपीलकारास रहावयास देण्यात आलेली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. माहिती अधिकार अंतर्गत केलेल्या अपीलातील, अपीलकारास सदनिका रहावयास मिळणेबाबत हेतू साद्य झाल्याने सदर प्रकरणी कोणतीही तक्रार प्रलंबीत नाही.  या परिस्थितीत मी खालीप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७२९/०२**

**श्री. डी.टी.चाफे**
**६०-सी, भुपेन चेंबर्स,**
**४ था मजला, ९ दलाल स्ट्रीट,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.डी.टी.चाफे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.१०.२००८ रोजी अर्ज करुन, विश्वस्त मंडळाचा पत्रव्यवहाराचा पत्ता, विश्वस्त मंडळावरील सदस्यांचा पत्रव्यवहाराचे पत्ते त्यामध्ये काही बदल झाला असल्यास त्याबाबतची माहिती विश्वस्त मंडळाकडून चालविण्यात येणा-या अनाथाल्याचा पत्ता, लेख्याचे विवरणपत्र इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध माहिती दिली. उर्वरित माहिती प्राप्त होताच पुरविण्यात येईल असे दि.१९.११.२००८, २२.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, करीम भाई इब्रहीम खोजा ऑरफनेज ट्रस्ट मुंबई बाबत मागील १० वर्षाची माहिती मागीतली होती. सदर माहिती अपीलकारास क्र.मरावम/मअ/७०९/४४२८/२००८, दि.०१.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास पुरविण्या आली. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी विलंबाने माहिती पुरविली असल्याचे दिसते. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, माहितीच्या अधिकारात मागणी केलेली माहिती विहित कालावधीत पुरविणे आवश्यक आहे. सदर गांभीर्य लक्षात घेता भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्यीची दक्षता घ्यावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई कारण्यात येईल. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७३०/०२**
**अपील क्र.२००९/३७३१/०२**

**श्री.खलिब इम्रान अकिल अहमद**
**यु.टी.नं.३९३/०८, २/४, एम.सी.पी,**
**अथर रोड, मुंबई ४०० ०११. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**एस.पी. कार्यालय, बीड,**
**जि.बीड ४३१ ११२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सीरसाळा शहर पोलीस स्टेशन,**
**ता.परळी, जि.बीड ४३१ १२२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.खलिब इम्रान अकिल अहमद यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.११.२००७ रोजी अर्ज करुन, सीरसाळा पोलीस स्टेशनची दि.३०.०५.२००६ ची नोंदवही दि.३०.०५.२००६ ते ३१.०५.२००६ या दोन दिवयाची शिरराळा पोलीस स्टेशन मधील आवक जावक कागदपत्रासंबंधीची सविस्तर माहिती. सीरसाळा पोलीस स्टेशनच्या अधिका-यांची माहिती. शीरसाळा पोलीस स्टेशनला भेट दिलेल्या पोलीस निरीक्षक श्री.कामतकर आणि एल.सी.बी. अधिका-याबाबतची सविस्तर माहिती. दि.३०.०५.२००६ रोजी शीरसाळा पोलीस स्टेशनच्या परिक्षेत्रात घडलेल्या घटनेबाबतची सविस्तर माहिती. औरंगाबाद Arms Haul Case बाबत अपीलकारास अटक करण्यात आली याबाबतची सविस्तर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पोलीस स्टेशन शीरसाळा ता.परळी जिल्हा बीड बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित वेळेत माहिती पुरविली नाही. त्यामुळे जन माहिती अधिका-यांना शास्ती लावण्याची अपीलकाराने व्दितीय अपीलात मागणी केली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी अभयतांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७२८/०२**

**श्री. रघुनाथ विश्वनाथ वाघमोडे**
**लालबत्ती हनुमान टेकडी,**
**आसल्फा व्हिजेज, चाळ नं.२५०,**
**घाटकोपर, मुंबई ४०० ०८४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी**
**भूम. ता.भूम जि.उस्मानाबाद.**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय, भूम ता.भूम,**
**जि.उस्मानाबाद.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रघुनाथ वाघमोडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.१०.२००८ रोजी अर्ज करुन, तलाठी सज्जा पखरुड या कार्यालयाची वादग्रस्त नोंदवही एक प्रत व संपादीत झाल्याने जमीनीचे फेरफार करतेवेळी घटना स्थळाचे पंचनामा प्रती व फेरफार करतेवेळी नोटीस डकवळी त्या पंचनामाप्रती दि.०१.०१.२००६ ते २६.०९.२००८ पर्यंत फेरफाराचा कालावधी फेरफाराच्या नक्कला सहीत तलाठी सज्जा पखरुड गांव शिरलगाव ग.न.३५१ मधील विहिर संपादीत झाली. विहिरीच्या नोंदीचा निकाल कोणत्या कागदपत्राच्या आधारे देण्यात आला त्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२८.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलावर सुनावणी आयोजित केली. अपीलकारास मागणीप्रमाणे संबंधीत कागदपत्राच्या नक्कला द्याव्यात असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.२२.१२.२००८ च्या पत्रासोबत

एकूण ८ मुद्यावर अपीलकारास माहिती पुरविली. माहिती अपुरी खोटी मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विविध नक्कलाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास नक्कलाच्या प्रती दि.२२.१२.२००८ च्या पत्रानुसार पुरविल्या आहेत. तसे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलातील कागदपत्राची तपासणी केली असता अपीलकारास माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपीलकारास पुरविण्यात आलेली माहिती अपूरी / खोटी कशी आहे याबाबत अपीलकाराने व्दितीय अपीलात काहीही खुलासा दिलेला नाही. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. सदर प्रकरणी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७२६/०२**

**श्री. सुशिल पन्नालाल मटकर**
**६ अ, खंडेराव पोलस हौ.सो.**
**सिल्लोड रोड, धुळे ४२४ ००१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.**

**जन माहिती अधिकारी तथा शिक्षण संचालक / सहा.सचिव**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुशिल मटकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०४.२००९ रोजी अर्ज करुन, इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी चे खाजगी क्लासेस सुरु करण्याकरिता लागणा-या पात्रतेबाबत व परवानगीबाबत माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती शिक्षण संचालक (माध्य) पुणे यांचे कार्यकक्षेत येत असल्याने पुढील कार्यवाहीसाठी, माहिती अधिकारी शिक्षण संचालक (माध्य) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, खाजगी टयुशन क्लासेस सुरु करण्याकरिता लागणा-या परवानगी / पात्रतेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर केला. अपीलकाराने मागीतलेली माहिती पुणे विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेत येत नाही. त्यामुळे अपीलकारास तसे कळवून अपीलकाराचा अर्ज शिक्षण संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मुळ अर्ज पाठविला. अपीलकारास माहिती देणेबाबत कळविले. केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकारास कळविली. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७२५/०२**

**श्री.डॉ.फरोग इकबाल मकदुमी**
**यु.टी.नं.४९, सेपरेट, रत्नागिरी स्पेशल प्रिझन,**
**रत्नागिरी, महाराष्ट्र ४१५ ६१२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय, मालेगांव,**
**कॅम्प रोड, मालेगांव,**
**नाशिक ४२३ २०३.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, मालेगांव,**
**कॅम्प रोड, मालेगांव,**
**नाशिक ४२३ २०३. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.डॉ.फरोग मकदुमी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, विविध विषयासंबंधी एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०५.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दारिद्रिय रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र आणि आर्थिक दुर्बल

घटकासाठी मालेगावातून कोणकोणते अधिकारी प्रमाणपत्र देतात. त्या संबंधीत सर्व अधिका-यांचे पूर्ण पत्ते व इतर ५ मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलकारास दि.२९.०५.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती पुरविण्यात आली असल्याने जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी पत्राची प्रत सादर करुन प्रतिपादन केले. तसेच आयोगासमक्ष दि.२९.०५.२००९ पत्राची छायाप्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली. अपीलकारास सदर प्रकरणी मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७२४/०२**

**श्री.सलीम बाबुभाई पठाण**
**डावखररोड, व्यापारी मंडळ कार्यालय शेजारी,**
**वार्ड नं.६, ता.श्रीरामपुर, जि.अहमदनगर ४१३ ७०९. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मध्य मुंबई, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मध्य मुंबई, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सलीम पठाण यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०६.२००९ रोजी अर्ज करुन, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालयाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. कोणताच आदेश प्राप्त झाला नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०५.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय मद्य मुंबई (सा.बां.वि) वरळी, मुंबई बाबत विविध मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने दि.०३.१०.२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहून आवश्यक ती माहिती पाहिली. आता सदर प्रकरणी कोणतीही तक्रार राहिली नसून अपीलकाराचे व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे असे अपीलकाराने लेखी पत्र दि.०३.१०.२००९ रोजी दिले. सदर पत्राची प्रत उत्तरवादीने आयोगास सादर केली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७२२/०२**

**श्री.म.ह.धारवाडकर**
**३०, महसूल कर्मचारी गृहनिर्माण संस्था,**
**शिवाजी विधी महाविद्यालयासमोर,**
**वसमतरोड, परभणी. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.म.ह. धारवाडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०८.२००६ रोजी अर्ज करुन, उप जिल्हाधिकारी पदावरील पदोन्नतीकरिता मानीक दिनांक मिळणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहिती उपलब्ध होताच अपीलकारास माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२२.०९.२००६ च्या पत्रान्वये कळविले. माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.१५.०१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. गोपनीय अहवाल नस्ती प्राप्त झाल्यास माहिती पुरविण्यात येईल असे दि.१२.०२.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविण्यात आले. अपीलकारास दि.३०.०३.२००७ च्या पत्रासोबत सन १९६४ ते १९७६ या कालावधीतील गोपनीय अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मानीव दिनांक मिळणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे सुनावणीचेवेळी आयोगास सांगीतले. अपीलकाराने शासनाकडे दि.२१.०३.२००५ रोजी सादर केलेल्या निवेदनाची प्रत उपलब्ध करून देण्याची मागणी केली. सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३ आठवडयाचे आत अपीलकारास उत्तर पाठवावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७१९/०२**

**श्री.संभाजी मल्हारी झावरे**
**मु.पो.टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर,**
**जि.अहमदनगर ४१४ ३०४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.लेखाधिकारी**
**पंचायत समिती मोखाडा,**
**वित्त विभागए जि.ठाणे.**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लेखाधिकारी**
**पंचायत समिती मोखाडा,**
**वित्त विभागए जि.ठाणे.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संभाजी झावरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०४.२००९ रोजी अर्ज करुन, शिक्षण विभाग, पंचायत समिती मोखाडा, जि.ठाणे यांचेकडून जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांचे लेख व वित्ता विभाग, पंचायत समिती, मोखाडा यांचेकडे सादर झालेले विविध बिले लेखा व वित्त विभागास ज्या रजिस्टररला नोंदविलेले आहे त्या रजिस्टरची साक्षांकित प्रत सदरच्या बिलांना जर लेखा व वित्त विभागाने काही त्रुटी / ऑबजेक्शन शेरा नमूद करुन ती बिले परत शिक्षण विभागास सादर केली असल्यास त्यांचा परत दिल्याचा दिनांक / जावक क्रमांक / शिक्षण विभागाच्या ज्या कर्मचा-याकडे दिली त्याचे नाव व हुद्दा इत्यादी.

पुन्हा परत मिळालेल्या बिलांवर शिक्षण विभागाने त्रुटी / ऑबजेक्शनची पुर्तता करुन लेखा व वित्त विभागास सादर केली असल्यास त्याचा अहवाल नोंद क्रमांक व दिनांक इत्यादी.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही

बाजूचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विविध बिले लेखा व वित्त विभागास ज्या रजीस्टरमध्ये नोंदविलेली आहेत त्या रजीस्टरची साक्षांकित, बीलावरील लेखा आक्षेपाची प्रत, त्रुटीची पूर्तता केलेल्या अहवालची प्रत मागीतली होत. बील रजीस्ट्रची प्रत उपलब्ध नसल्याच्या कारणावरुन नाकारण्यात आली. बील रजीस्टर महत्वाची बाब आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्राथमिक चौकशी करावी. त्यानुसार सदर प्रकरणी वस्तुस्थितीदर्शक माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०१.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७२०/०२**

**श्री.संभाजी मल्हारी झावरे**
**मु.पो.टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर,**
**जि.अहमदनगर ४१४ ३०४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी**
**पंचायत समिती, मोखाडा,**
**शिक्षण विभाग, जि.ठाणे.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक**
**पंचायत समिती, मोखाडा,**
**शिक्षण विभाग, जि.ठाणे.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संभाजी झावरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०३.२००९ रोजी अर्ज करुन, पाचव्या वेतन आयोगानुसार ३३ महिने कालावधीची भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाची रक्कम भ.नि.नि. खात्यामध्ये जमा करणेबाबत अथवा रोख मिळणेबाबत श्री.संभाजी झावरे (पुर्वीची शाळा-जि.प.शाळा ईखरिचा पाडा, ता.मोखाडा, जि.ठाणे.) सध्या कार्यरत - विषयतज्ज्ञ गट साधन केंद्र, पंचायत समिती आवार पारनेर, जि.अहमदनगर यांनी आपल्या कार्यालयाकडे केलेल्या अर्जाची स्थिती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१४.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०१.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने ५ व्या वेतन आयोगाच्या ३३ महिने वेतन फरकाबाबत, एकस्तर पदोन्नती योजना व महागाई फरक रक्कमा जमा करणेबाबत केलेल्या अर्जावरील कारवाईची माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास उपलब्ध करून दिली असल्याचे उत्तरवादीनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यारुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७७४/०२**

**श्रीमती कल्पना मोहन राजपूत**
**श्रीरामनगर, मारोती मंदीराजवळ,**
**शासकीय दूध डेअरी मागे,**
**जि.धुळे ४२४ ००१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सहकार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सहकार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती. कल्पना राजपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०६.२००९ रोजी अर्ज करुन, धुळे जिल्हयातील श्री समर्थ पत संस्था, देवी पद्‌मावती पत संस्था चंद्रकांत हरी बढे पतसंस्था, धुळे इत्यादि पत संस्थांना सहकार विभाग महाराष्ट्र शासन यांनी परवानगी दिली का? अपीलकाराची रक्कम सदर पत संस्थामध्ये मुदत ठेव म्हणून ठेवली. परंतू सदर ठेवीची मुदत संपूण ३ वर्षे पूर्ण झाले तरीही ठेवीची रक्कम व त्यावरील व्याज मिळाले नाही याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने धुळे जिल्हयातील पत संस्थात ठेवलेल्या ठेवी मुदत संपली तरी ठेवीची रक्कम मिळत नसल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती दिलेली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०२.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७७५/०२**

**श्री. उमाकांत ग. रोट्टे**
**शिवगण निवास सत्ताने निवास समोर,**
**बिदर रोउ, मु.पो.ता.उदगीर, जि.लातूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,**
**विभागीय कार्यालय, लातूर,**
**रेणापूर रोड, जि.लातूर.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,**
**विभागीय कार्यालय, लातूर,**
**रेणापूर रोड, जि.लातूर. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.उमाकांत रोट्टे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०७.२००९ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर येथील चालक श्री.यु.जी.देशमुख, श्री.बी.जी.माने यांचेबाबत अनुषंगीक माहिती बस स्थानक देवणी (बु), राज्य परिवहन आगार, उदगिर बाबत अनुषंगीक माहिती. अशा विविध विषयावर एकूण १६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालवधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१०.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही

बाजूचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर येथील विविध विषयावर एकूण १६ मुद्यावर माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुध्दा क्र.३, ५, ६, ११ व १४ ची खोटी माहिती दिली.  मुध्दा क्र.९ ची अपूरी माहिती दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे.  अपीलकारास पुरविण्यात आलेली माहिती कशी अपूरी / खोटी आहे याबाबत अपीलकाराने तपशिल दिलेला नाही.  अपीलकाराच्या मागणीप्रमाणे जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.  यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६९/०२**

**श्री. धस मच्छिद्रनाथ देवव्रत**
**ओंकार अपार्टमेंट फ्लॅट नं.३०२,**
**पंम्पींग स्टेशन रोड,**
**सावेडी, अहमदनगर ४१४ ००३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सिव्हील हॉस्पीटल, अहमदनगर,**
**जि.अहमदनगर.**

**जन माहिती अधिकारी,**
**सिव्हील हॉस्पीटल, अहमदनगर,**
**जि.अहमदनगर.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.धस मच्छिंद्रनाथ देवव्रत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.११.२००८ रोजी अर्ज करुन, वेतन फरक अदा न झाल्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित वेळेत कोणतीही माहिती पुरविली नाी. यामुळे अपीलकाराने दि.२२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या वेतन फरकाची रक्कम अदा केली नसल्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादी हजर होते. उत्तरवादीने आयोगासमोर असे प्रतिपादन केले की अपीलकारास वेतन फरकाची रक्कम अदा केली आहे. अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे असे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचेवेळी आयोगास सांगीतले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६८/०२**

**श्री. बलभीम गो. चिद्रावार**
**रा.डॉ.हेडगेवार चौक मुखेड,**
**ता.मुखेड, जि.नांदेड. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, मुखेड,**
**ता.मुखेड, जि.नांदेड.**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय, मुखेड,**
**ता.मुखेड, जि.नांदेड. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.बलभीम चिद्रावार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.१२.२००८ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

१. मा.न्यायालय यांनी श्री.बि.जी.चिद्रावार यांच्याकडून रक्कम वसूल करण्यास आदेशित केले आहे काय?
२. मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे भरणा करावयाची रक्कम रू.१६, १४६/- ची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे काय? हे सत्य आहे काय? पण ही रक्कम माझ्‍याकडून वसूल करण्याचे प्रयोजन काय आहे?
३. माझी उपदानाची रक्कम रोखून ठेवण्यास किंवा उपदानातून रक्कम वसूल करण्यास कोर्टाने आदेशित केले आहे काय असल्यास आदेशाची प्रत देण्यात यावी.

जन माहिती अधिका-यांनी असमाधानकारक माहिती दिली असल्याने अपीलकाराने दि.१३.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.  अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवानिवृत्ती उपदानामधून नियमबाहया रक्कम वसूल केल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकाराच्या उपदानातून रक्कम कमी करण्यास मा.न्यायालयाने आदेश दिले आहेत काय? असल्यास आदेशाची प्रत द्यावी अशी अपीलकाराची मागणी आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या उपदानातून रू.१६, १४६/- इतकी रक्कम वसूल करण्यास मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशाची साक्षांकित प्रत अपीलकारास, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत निशुल्करित्या पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६७/०२**

**श्री. अर्जुन श्रिरंग तुपे**
**१३, ज्योतिसदर गुलगोहर छेद रस्ता क्र.६,**
**जुहू विलेपार्ले विकास योजना, जुहू,**
**मुंबई ४०० ०४९. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती कार्यालय,**
**श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर,**
**जि.अहमदनगर.**

**जन माहिती अधिकारी,**
**पंचायत समिती कार्यालय,**
**श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर,**
**जि.अहमदनगर. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अर्जुन तुपे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.११.२००८ रोजी अर्ज करुन, मौजे भेर्डापूरच्या गावठाण सिटी सर्व्हे क्र.४०२ च्या ४६१.७० चौ.मी. जागेत पिठाच्या चक्कीसाठी चालू असलेले बेकायदा बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूरी माहिती पुरविली. यामुळे अपीलकाराने दि.१९.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पिठाच्या चक्कीसाठी चालू असलेल्या बेकायदा बांधकामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६६/०२**

**श्री.विजय शंकर पाचपांडे**
**सेवानिवृत्त मुख्या.**
**तु.स.झोपे गुरूजी प्रा.वि.मं.भुसावळ,**
**पांडूरंग टॉकीज समोर, न्यु एरिया वाडे,**
**भुसावळ. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
**जिल्हा परिषद, जळगांव,**
**जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हा परिषद, जळगांव,**
**जि.जळगांव. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विजय पाचपांडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.१२.२००८ रोजी अर्ज करुन, अपीलकाराच्या सेवानिवृत्ती विषयक कागदपत्राची पूर्तता करुन शाळेमार्फत जन माहिती अधिका-याकडे कधी प्राप्त झाले याबाबत एकूण ६ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे यांचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या सेवानिवृत्ती विषयक कागदपत्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांनी कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०२.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६४/०२**

**श्रीमती. प्रिया देशमुख**
**१० प्रसन्न स्मृती दिपनगर पुर्णा,**
**रोड नांदेड.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
**जिल्हा परिषद, जळगांव,**
**जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हा परिषद, जळगांव,**
**जि.जळगांव.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती. प्रिया देशमुख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०३.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०१.२००६ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

अधिक्षक हयांना दिलेले अर्ज दि.१४.०५.२००४, ३०.०६.२००४, २७.०८.२००४, ०७.०९.२००४ व ०८.११.२००४ त्यावर घेतलेले निर्णय तसेच खोटे दस्तऐवज तयार करणा-या व पुरावे नष्ट करणा-या तपासणी अधिका-याविरुध्द चौकशी आदेशित केली असल्यास आदेशाची प्रत तसेच चौकशी अहवालाची प्रत, व शिस्तभंगाची कार्यवाही केली असल्यास आदेशाची प्रत. तसेच मी व माझे सासरे रामराव देशमुख हयांनी दिलेल्या सर्व अर्जावर मा.अधिक्षकांनी घेतलेल्या निर्णयाची प्रत तसेच पोलीसांनी मयताचे काढलेले फोटो प्रत्येकी एक प्रत मिळणेस विनंती आहे. तसेच निरीक्षक स्था.गु.शा.नांदेड त्यांचेकडे सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाही संबंधीची माहिती आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रतीसह मिळणेस विनंती आहे. तसेच सदर हत्ये प्रकरणातील केस डायरीची प्रमाणित प्रती मिळणेस विनंती आहे.

गुन्हा न्यायप्रविष्ठ असल्याने अपीलकाराने मागणी केलेली कागदपत्र सदर प्रकरणी चौकशी अहवालाच्या प्रती पुरविणे हा निर्णय न्यायालयीन कामकाजात हस्तक्षेप ठरु शकेल. उक्त अधिनियमातील कलम ८ जी आणि एफ मधील तरतुदीचा आधार घेउन जन माहिती अधिका-यांनी माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या पतीच्या हत्याप्रकरणी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत, मयताचे काढलेल्या चार फोटोच्या प्रती, दैनंदिन्याच्या प्रती इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणाच्या सद्यस्थितीबाबत जन माहिती अधिका-याकडे आयोगाने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी विचारणा केली. परंतू जन माहिती अधिकारी प्रकरणाची सद्यस्थिती सांगू शकले नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराच्या पतीच्या हत्याप्रकरणी चौकशी पूर्ण झाल्यानंतर अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी. मा.न्यायालयाने माहिती प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली असेल किंवा जी प्रकट केल्याने न्यायालयाचा अवमान होणार नसेल तर संबंधीत माहिती अपीलकारास पुरविणे आवश्यक आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६३/०२**

**श्री. जगन्नाथ स. भोर**
**प्लॉट नं.६, पवन नगर,**
**भिस्त बाग, अहमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (ले व को)**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.जगन्नाथ भोर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०७.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा मधील वर्ग-१ व वर्ग-२ च्या नेमणूकाबाबत अनुषंगीक एकूण ९ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण व त्रोटक विलंबाने माहिती दिली. अनुषंगीक पत्र, नसल्याची टिप्पणीची माहिती अप्राप्त या कारणावरून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०६.०६.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. उर्वरित माहिती ३ महिन्याचे आत अपीलकारास पुरवावी असे आदेश पारित केले. सप्टेंबर, २००९ अखेरपर्यंत जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही

बाजूचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा मधील गट अ व गट ब च्या नेमणूकाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास उर्वरित माहिती द्यावी असे आदेश पारित केले होते.  जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७६२/०२**

**श्री. गंगाराम आधार तमरवाने**
**मु.पो.चिरणे-कदाणे.**
**तो.शिंदखेडा, जि.धुळे.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी**
**नासर्डी पुलाजवळ,**
**ता.जि.नाशिक, नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
**नासर्डी पुलाजवळ,**
**ता.जि.नाशिक, नाशिक.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.गंगाराम तमरवाने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०१.२००९ रोजी अर्ज करुन, श्री गुरुदेव प्राथमिक आश्रमशाळा, ता.दिंडोरी जि.नाशिक येथे अपीलकार मुख्याद्यापक म्हणून कार्यरत होते. सदर आश्रमशाळेसंबंधीच्या मुद्यावर चर्चा करण्याकरिता सह विचार सभा आयोजित करावी. राहूल शिक्षण संस्था संचलीत विजा भज प्राथमिक आश्रमशाळेत उपशिक्षक म्हणून पुर्ननियुक्ती करण्याची अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.०५.०९.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही

बाजूचे म्हणने ऐकूण ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवेत पुर्ननियुक्ती करण्यासाठी अनुषंगीक माहिती मागीतली होती. संस्थेने दिशाभूल केल्यामुळे आजतागायतचे वेतन मिळावे व पुर्ननियुक्ती करावी. १४ वर्षापासून नुकसान होत आहे. असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. श्री.गुरुदेव प्राथमिक आश्रमशाळा दिंडोरी येथील मुख्याद्यापक पदाचा दि.३०.१२.१९९५ रोजी राजिनामा दिला. सदर राजिनामा मंजूर करु नये अशी अपीलकाराने मागणी केली. सेवेत पुर्ननियुक्ती करण्यासाठी अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयातील कागदपत्र प्रथम निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत. त्यानंतर अपीलकाराने निवड केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती अपीलकारास पुरविण्यात याव्यात.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७७१/०२**

**श्री. राजकुमार बागवे**
**मु.पो.जानवली, साकेडी रोड,**
**वाकाडवाडी, श्री.नाडकर्णी सर यांचे घर,**
**जानवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग ४१६ ६०२. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,**
**४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. राजकुमार बागवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०१.२००८ व दि.१७.०३.२००९ रोजी अर्ज करुन, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागातील नोकर भरती संबंधीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अधिक्षक, सहा.अधिव्याख्याता, पुर्ण वेळ निदेशक, निदेशक या आणि कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत निदेशक पदासाठीची भरती. मागीतलेली माहिती न मिळाल्याने अपीलकाराने दि.२७.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर दि.१८.०५.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकारास मागणीप्रमाणे निशुल्क माहिती पुरवावी असे जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. त्यानुसार अपीलकारास दि.२१.०५.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. हवी असलेली माहिती अतीविलंबाने मिळाली.

माहिती अपूर्ण, माहिती खोटी असण्याची शक्यता असे मुध्दे उपस्थित करून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, अधिक्षक, सह.अधिव्याख्याता, पूर्ण वेळ निदेशक, निदेशक या आणि कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत निदेशकपदाच्या भरतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता अधिक स्वरुपाची माहिती मागीतली होती. यामुळे सदर माहिती पुरविण्यास विलंब झाला. माहिती विस्तृत असल्याने प्रशासकीय कारणास्तव विलंब झालेला असल्याने जन माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करून क्षमा याचना केली आहे. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास सदर प्रकरणी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन केले. अपीलकारास पुरविलेली माहिती मुध्देनिहाय नसल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुद्यानुसार अपीलकारास मुध्देनिहाय (Pointwise) माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

## आदेश

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८२५/०२**

**श्री. कैलास देवराम पाटील**
**७ ब, भूषण कॉलनी,**
**जळगांव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**मुख्य सचिवांचे कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. कैलास पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०८.२००८ रोजी अर्ज करुन, दि.०४.०७.२००७ दि.३०.०६.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहिती पोटी रु.१५/- इतके शुल्क घेउन जन माहिती अधिका-यांनी दि.१५.०९.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१७.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१९.११.२००८ रोजी आदेश पारित केले. सदर आदेश मान्य नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, अपीलकाराने दि.०४.०७.२००७, दि.३०.०६.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अधिका-यांनी अपीलकाराकडून माहिती पोटी रू.१५/- एवढे शुल्क वसूल करून दि.२९.०८.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०८.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८०१/०२**

**श्री.राजेश सांडूजी हिवराळे**
**सोनावणे बी.व्ही. (वनपाल) घर क्र.२६१,**
**मिलींदनगर, उस्मानपूरा, औरंगाबाद ४३१ ००५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. राजेश हिवराळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०७.२००८ रोजी अर्ज करुन, दि.२६.०४.२००८ च्या अर्जात नमुद मुद्यांच्या अनुषंगाने श्री.आढावे दिलीप व पवार वंदना या उमेदवारांची निवड मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये खुल्या प्रवर्गातून करण्यास अप्पर आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांना आदेशित करणार काय? दि.२६.०४.२००८ च्या अर्जातील नमुद मुद्यांच्या अन्वये लेखी परिक्षेचे गुण आणि इतर उमेदवाराप्रमाणे मुलाखत गुण देण्याचे आदेशित करणार काय? माद्यमिक शिक्षक (गणित)-२००६ नियुक्तीपत्र देण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी केली होती. विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२०.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकारास मागणीप्रमाणे उत्तरवादीनी माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलातील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उपस्थित होते.

सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८०५/०२**

**श्री. संजय एकनाथ आहेर**
**मु.पो.ता.दिंडोरी जि.नाशिक,**
**दिपलक्ष्मी जनरल स्टोअर्स पालखेड रोड,**
**दिंडोरी. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. संजय आहेर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, संस्थेच्या आश्रमशाळेकडून जिल्हापरिषदेकडे शिक्षक वर्ग करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. १) श्रीमती.नंदा निंबा कापडनीस यांचे प्रकरणी श्री.सु.ना.शिंदे, कक्ष अधिकारी यांनी दिलेले पत्र दि.१० मे, २००६ २) श्रीमती.प्रणिता शरद आहेर यांचे प्रकरणी श्री.र.स.सरफरे, कक्ष अधिकारी यांनी दिलेले पत्र ही सारखीच प्रकरणे असतांना दोन वेगवेगळी पत्रे कशी. श्री. शिंदे, कक्ष अधिकारी यांचे पत्रावरुन जिल्हापरिषदेने कापडनीस यांची सेवा वर्ग केली. मात्र जिल्हापरिषदेच्या मताप्रमाणे श्री.सरफरे, कक्ष अधिकारी यांचे पत्र चुकीचे आहे, नियमाप्रमाणे पत्र कोणाचे बरोबर आहे. चुकीचे पत्र देण्या-या अधिका-यावर काय कार्यवाही केली. सेवा वर्ग रद्यसाठी जिल्हापरिषदेला आदेश दिला काय? नसल्यास का दिला नाही. याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.३०.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित करुन दि.३१.१०.२००७ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.१० मे, २००६ रोजी श्री.सु.ना.शिंदे, कक्ष अधिकारी ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांनी श्रीमती.कापडनीस यांची सेवा जिल्हापरिषदेकडे वर्ग होण्यास ओदश दिला. त्यानुसार त्यांची सेवा जिल्हापरिषदेकडे वर्ग केली. श्रीमती.आहेर यांची सेवा मात्र जिल्हापरिषदेकडे वर्ग केली नाही. श्री.शिंदे, कक्ष अधिकारी यांचेप्रमाणे जिल्हापरिषदेस श्री.सरफरे यांनी श्रीमती.आहेर यांचेबाबत स्पष्ट आदेश दिले नाहीत असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे व सदर प्रकरणी त्यांच्यावर अन्याय झाला असल्याचे त्यांनी अपीलात नमुद केले आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अनुसार मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती पुरवावयाची आहे. अन्याय निवारण करण्याची बाब माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत मोडत नाही. त्यासाठी अपीलकाराने सक्षमप्राधिकरणाकडे दाद मागावी. याप्रकरणी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८०४/०२**

**श्री. सईद मिया अलिमिया सय्यद**
**खोली नं.१, कुंज निवास कंपाउंड,**
**सहकार रोड, जोगेश्वरी (प), मुंबई ४०० १०२. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, नाशिक**
**(आर.टी.ओ), नाशिक, ता.जि.नाशिक.**

**जन माहिती अधिकारी,**
**प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, नाशिक**
**(आर.टी.ओ), नाशिक, ता.जि.नाशिक. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. सईदमिया सय्यद यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०४.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०१.२००७ रोजी अर्ज करुन, एम-एच १५ टि आर-वाय एक नउ चोवीस नं.३० केसी ६ एक-००७२२५, हा टि आर नंबर घेण्यासाठी कंपनीने सबमीट केलेले सर्व कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. माहिती पोटी रु.२९/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. अपीलकारास हवी असलेली माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.०१.०४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिका-यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, अपीलकाराने आवश्यक असलेल्या माहितीबाबत, प्रादेशिक परिवहन कार्यालय, नाशिक येथे सर्व संबंधीत कागदपत्राची प्रत्यक्ष पडताळणी केली. प्रत्यक्ष पाहिलेल्या माहितीवरुन अपीलकाराचे पूर्ण समाधान झाले. आता अपीलकारास लेखी स्वरूपात माहितीची आवश्यकता नाही. त्यामुळे अपीलकाराने दि.०१.०४.२००७ रोजी दाखल केलेले अपील मागे घेत आहे. अपीलकाराचा अपील अर्ज निकालात काढण्यात यावा अशी अपीलकाराने दि.२६.०५.२००७ च्या पत्रान्वये विनंती केली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास आवश्यकती माहिती पुरविली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८०३/०२**

**श्री. दशदथ आच्युतराव होळे**
**रा.अष्टामोड, पो.गांजूर, ता.चाकुर,**
**जि.लातूर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. दशरथ होळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०७.२००९ रोजी अर्ज करुन, लातूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रना लातूर यांनी पत्र क्र.जिग्राविमला/दारेग/सीआर २८/३ कावी-२/०९ च्या पत्रान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीची सत्यप्रत. दारीद्रय रेषेखालील सर्वेक्षण २००२-०७ च्या यादीवर प्राप्त अपीलापैकी पात्र लाभार्थ्याच्या याद्याबाबत घेण्यात आलेल्या निर्णयाची सत्यप्रत मिळणेबाबत मागणी केली होती. माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.२३.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लातूर जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. केंद्र शासनाने दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणना २००२ बाबत दि.१३.०९.२००२ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामधील मुध्दा क्र.१० नुसार प्रत्येक वर्षी ग्रामसभेने दारिद्रय रेषेखालील कुटुंब यांदीचा आढावा घेउन यादीमधील अपात्र कुटुंबे वगळण्याची कार्यवाही करावी, अशी तरतूद आहे. तथापि बहुतांशी ग्रामसभांची मागणी ही दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणना २००२ च्या यादीत वाढीव कुटंबाच्या समावेशाची असून मंजूर यादीतील कुटुंबे वगळण्यास ग्रामसभा इच्छुक नसते असा अनुभव आहे. त्यामुळे राज्यातील ५.५० लाख अपात्र कुटुंबांना वगळण्याची कार्यवाही ग्रामसभेमार्फत होणे शक्य नाही असे शासनाचे मत आहे. सदर बाबीच्या अनुषंगाने अपात्र लाभार्थी वगळण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्याचे प्रस्तावित करून नस्ती मा.मुख्यमंत्री कार्यालयास सादर केली आहे. या अनुषंगाने जो काही निर्णय होईल, तो संबंधीत कार्यालयांना कळविण्यात येईल असे उत्तरवादीने लेखी अहवाल आयोगास सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी सविस्तर माहिती अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८०२/०२**

**श्रीमती. रत्नकांता ज.श्रॉफ**
**आर.जे.श्रॉफ, १०,**
**श्रीरंग नवप्रभात सहकारी गृहनिर्माण सोसा.,**
**उदय कॉलनी मागे, जळगांव. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव (प्राथमिक)**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**प्राशि-२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**प्राशि-२,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती. रत्नकांता जे.श्रॉफ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.१०.२००८ रोजी अर्ज करुन, श्रीमती.रत्नकांता जंगुलाल श्रॉफ यांच्या सेवाखंड क्षमापित करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) मध्ये दिलेल्या व्याख्येत बसत नसल्याने अपीलकाराचा अर्ज नाकारण्यात येत असल्याने दि.१३.११.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी अपीलकाराचे यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता त्यांचे प्रतिनिधीना त्यांचे म्हणने देउन पाठविले. श्रीमती.श्रॉफ, सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षिका, नवीन गुजराथी प्राथमिक शाळा, नंदूरबार यांच्या सेवेमध्ये पडलेला एकूण ९ महिने, १८ दिवस एतका सेवा खंड मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना दि.२३.०८.२००५ च्या वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार दि.२३.०३.२००९ च्या पत्रान्वये क्षमापित केला असल्याचे आयोगास दि.०४.१२.२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९९/०२**

**श्री. रंजन अमृत साळवी.**
**टिळकनगर ता.राहाता,**
**जि.अहमदनगर ४१३ ७२०. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई, सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक अभियंता**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई, सार्वजनिक बांधकाम मंडळ,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.रंजन साळवी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०८.२००७ रोजी अर्ज करुन, एकूण ४ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकारास दि.११.०९.२००७ रोजी पत्र पाठवून असे कळविले की, दैनंदिन कामकाज व अपुरा कर्मचारी वर्ग लक्षात घेता विस्तृत माहिती संकलीत करुन त्याच्याप्रती काढून उपलब्ध करुन देणे अशक्य आहे. कार्यालयात उपस्थित राहून माहिती तपासावी व त्यातील निवडक कागदपत्राच्या प्रती अपीलकारास पुरविण्यात येतील असे जन माहिती अधिका-यांनी दि.११.०९.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. अपीलकाराचे समाधान झाले नसल्याने त्यांनी दि.२३.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती पुरविली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता उत्तरवादी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली असल्याने अपीलकाराचे समाधान झाले. म्हणून व्दितीय अपील निकाली काढावे अशी अपीलकाराने दि.२५.०१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास विनंती केली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९७/०२**

**श्री. चेतन कोठारी**
**५२, ओशिअनी अपार्टमेंट,**
**डॉ.राजाबली पटेल लेन,**
**बी.देसाई रोड, मुंबई ४०० ०२६.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधिक्षक**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, जुने बजार**
**जुने तहसिल कार्यालय, औरंगाबाद रेंज,**
**औरंगाबाद.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक**
**महासंचालक ॲन्टी करप्शन ब्युरो,**
**मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला,**
**पांडूरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चेतन कोठारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.१२.२००७ रोजी अर्ज करून, एक्साईज, इनकमटॅक्स, सीबीआय, पोलीस, सेमी गव्हर्नमेंटच्या कर्मचा-याविरूध्द केसेस नोंदविण्यात आल्या आहेत. दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आली आहेत, किती प्रकरणी दोषारोपपत्र दाखल केली नाहीत इत्यादी माहिती अप्पर पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांचेकडे मागणी केली होती. माहितीपोटी रू.२४/- इतकी रक्कम भरण्याबाबत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले. अपीलकाराने शुल्क भरणा Money Order ने केला. अपीलकारास दि.१२.०४.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१९.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी ३० दिवसात माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरून राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली असल्याने व्दितीय अपील परत घेण्यास परवानगी द्यावी अशी अपीलकाराने दि.२५.११.२००९ च्या पत्रानुसार विनंती केली आहे. व्दितीय अपील परत घेण्याची अपीलकाराची विनंती मान्य करण्यात येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**व्दितीय अपील परत घेण्यास अपीलकारास परवानगी देण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८००/०२**

**श्री.राजेश सांडूजी हिवराळे**
**मिलींदनगर उस्मानपूरा,**
**औरंगाबाद-०५.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**आदिवासी विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.राजेश हिवराळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०९.२००८ रोजी अर्ज करुन, मा.राज्यपालांचे सचिव कार्यालय, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाच्या कॉम्पलीमेंटरी स्लिप क्र.०३/८/एम/१५३९/ए, दि.१२.०५.२००८ अन्वये कोणती कार्यवाही केली. दि.२६.०४.२००८ च्या अपीलकाराच्या तक्रार अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने माद्यमिक शिक्षक गणित-२००६ या पदाचे नियुक्ती आदेश देण्याबाबतच्या आदिवासी विकास, मंत्रालय कार्यालयाच्या योग्य त्या प्रशासकीय प्रमुखांचा अभिप्राय आदेश मिळण्याची विनंती केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी घेतली नाही. म्हणून व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, माद्यमिक शिक्षक-गणित या पदाचे नियुक्ती आदेश देणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी दि.२६.०५.२००८ दि.१८.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर केला. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९२/०२**

**श्री. विठ्ठल बुधा तायडे**
**८/४०२ अमृत धाय, योगीधाम जवळ,**
**कल्याण (प).** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद जळगांव,**
**जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी**
**जिल्हा परिषद जळगांव,**
**जि.जळगांव.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विठ्ठल तायडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०५.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०९.२००६ रोजी अर्ज करुन, १५% जिल्हापरिषद मागासवर्गीयासाठीचा सेस फंड व केंद्रीय दलित वस्ती सुधार योजना निधीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास पुरविलेल्या माहितीचा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आढावा घेतला. अपीलकारास १५ दिवसाचे आत पूर्ण माहिती द्यावी असे दि.२२.०३.२००७ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.१७.०३.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास सविस्तर माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जिल्हापरिषद मागासवर्गीयाचा निधी व दलित वस्ती सुधार योजनाच्या निधच्या खर्चाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जिल्हापरिषद २०% सेस फंड व दलित वस्ती सुधारणा योजनाचा निधी शिल्लक ठेवल्याबध्दल काय कार्यवाही करावी याबाबत माहिती मिळावी असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. सदर प्रकरणी काही कार्यवाही करण्याची गरज वाटत नाही. उत्तरवादीने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली आहे. या परस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९३/०२**

**श्री. विठ्ठल बुधा तायडे**
**८/४०२ अमृत धाय, योगीधाम जवळ,**
**कल्याण (प).** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती भुसावळ,**
**ता.भुसावळ, जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक/ ग्रामविकास अधिकारी**
**पंचायत समिती भुसावळ,**
**ता.भुसावळ, जि.जळगांव.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विठ्ठल तायडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०७.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.११.२००५ रोजी अर्ज करुन, भुसावळ तालुक्यात समाविष्ठ ग्रामपंचायत व्दारा ग्राम पंचायत बाल व विकास कल्याण निधीतून केलेली कामाची माहिती व केंद्र सरकारच्या बाल व महिला कल्याण विभागाच्या कार्यक्रमातून कोणकोणती कामे घेण्यात आली आहेत याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुध्दा क्र.१ बाबत दि.१३.०१.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. मुध्दा क्र.२ ते १२ बाबत संबंधीत ग्रामपंचायतचे माहिती अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार करावा जेणेकरुन माहिती उपलब्ध होउ शकेल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०४.२००६ व दि.०४.०४.२००६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार अपीलकारास जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती भुसावळ यांनी दि.२८.०४.२००६ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. अपूर्ण माहिती

मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महिला व बालकल्याण विभागाच्या निधीतून केलेल्या कामाची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१३ जानेवारी, २००६ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती अपीलकारास पुरवावी असे जन माहिती अधिका-यांनी सर्व संबंधीत ४० ग्रामपंचायतींना दि.१९.१२.२००५ रोजी पत्र पाठवून कळविले आहे. सदर बाब अपीलकारास अवगत करण्यात आली आहे. ३५ ग्रामपंचायतीची २०% मागासवर्गीय सेस फंड, १०% महिला व बाल कल्याण निधी व खर्च, अनुषेशाबाबत अपीलकारास माहिती पुरविण्यात आली आहे. उर्वरित ग्रामपंचायतीच्या जन माहिती अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देउन अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत कळविण्यात यावे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७७७/०२**

**श्री. भागीनाथ गो. शिरसाट**
**मु.वरखेड पो.हसनापूर,**
**ता.शेवगांव, जि.अमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सांस्कृतिक कार्य संचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, जुने सचिवालय,**
**विस्तार भवन, एम.जी.रोड, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सांस्कृतिक कार्य संचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, जुने सचिवालय,**
**विस्तार भवन, एम.जी.रोड, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.भागीनाथ शिरसाट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०८.२००८ रोजी अर्ज करुन, सांस्कृतिक कार्य विभागामार्फत, सांस्कृतीक मंडळाकडून कोणकोणत्या योजना राबविल्या जातात. मागील ५ वर्षात सांस्कृतिक कार्य विभागामार्फत कोणकोणत्या संस्थेला अनुदान देण्यात आले. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी चुकीची व अर्धवट माहिती दिली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.१५.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागीतलेली पूर्णपणे माहिती देण्यात आली आहे. ज्या संस्थांना मागील ३ वर्षात अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्या संस्थेच्या छायाप्रती अपीलकारास देता येत नाही असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सांस्कृतीक कार्य व पर्यटन विभागाकडून गेला ५ वर्षात कोणकोणत्या संस्थांना अनुदान मंजूर करण्यात आले याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.०९.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. त्यानंतर प्रथम अपीलावरील सुनावणीचेवेळी त्यांची बाजू मांडण्याकरिता अपीलकार हजर राहिले नाहीत. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०३.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७७८/०२**

**श्री. भागीनाथ गो. शिरसाट**
**मु.वरखेड पो.हसनापूर,**
**ता.शेवगांव, जि.अमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि.,**
**प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामाकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि.,**
**प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामाकृष्ण चेंबूरकर मार्ग,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.भागीनाथ शिरसाट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०९.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत सन २००५ ते २००८ या कालावधीत महामंडळामार्फत वितरित झालेल्या कर्ज प्रकरणाची तपशिलवार माहिती कर्जदाराचे नाव व पत्ता कर्ज रक्कम, कर्ज दिलेल्या व्यवसायाचे नाव, शिफारस केलेल्या जिल्हा व्यवस्थापकाचे नाव व पत्ता व कर्जदाराने कर्जासाठी दिलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०१.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अर्धवट अपूरी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत वितररित केलेल्या कर्जाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. महामंडळाचे जन माहिती अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक यांचेशी अपीलकाराने संविस्तर चर्चा केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास संपूर्ण माहिती प्रत्यक्ष पहावयास उपलब्ध करुन दिली. त्यामुळे अपीलकाराचे संपूर्ण समाधान झाले. आता त्यांची कसलीही तक्रार राहिलेली नाही. दि.२३.०१.२००९ चे व्दितीय अपील मागे घेत आहे असे अपीलकाराने दि.२३.०८.२००९ रोजी लेखी पत्र राज्य माहिती आयोगास सादर केले आहे. व्दितीय अपील मागे घेण्याची अपीलकाराची विनंती मान्य करण्यात येत आहे. या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** (रामानंद तिवारी)
**दिनांक ०३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९४/०२**

**श्री. विठ्ठल बुधा तायडे**
**८/४०२ अमृत धाय, योगीधाम जवळ,**
**कल्याण (प).** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती भुसावळ,**
**ता.भुसावळ, जि.जळगांव.**

**जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक/ ग्रामविकास अधिकारी**
**पंचायत समिती भुसावळ,**
**ता.भुसावळ, जि.जळगांव.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.विठ्ठल तायडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०७.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.११.२००५ रोजी अर्ज करुन, भुसावळ तालुक्यात समाविष्ठ ग्रामपंचायत व्दारा ग्राम पंचायत बाल व विकास कल्याण निधीतून केलेली कामाची माहिती व केंद्र सरकारच्या बाल व महिला कल्याण विभागाच्या कार्यक्रमातून कोणकोणती कामे घेण्यात आली आहेत याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जातील मुध्दा क्र.१ बाबत दि.१३.०१.२००६ च्या पत्रान्वये माहिती दिली. मुध्दा क्र.२ ते १२ बाबत संबंधीत ग्रामपंचायतचे माहिती अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार करावा जेणेकरुन माहिती उपलब्ध होउ शकेल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.०३.०४.२००६ व दि.०४.०४.२००६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार अपीलकारास जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती भुसावळ यांनी दि.२८.०४.२००६ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. अपूर्ण माहिती

मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महिला व बालकल्याण विभागाच्या निधीतून केलेल्या कामाची अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.१३ जानेवारी, २००६ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अर्जातील मुध्दा क्र.२ ते १२ बाबतची माहिती ग्रामपंचायत स्तरावरची आहे. सदर माहिती ग्रामपंचायत स्तरावरील जन माहिती अधिका-याकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळविले असल्याचेही प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९०/०२**

**श्री. बापुसाहेब उ. पालवे**
**मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद,**
**न्यायालयीन बंदी क्र.५००९,**
**प्लॅट नं.५८, गुरूकुल सोसा.,**
**पाईप लाईन रोड, सावेडी**
**जि.अहमदनगर.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव,**
**गृह विभाग, पोल-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग, पोल-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**कार्यासन विशा-६, गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. बापुसाहेब पालवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०४.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

क्रांतीचौक पो.स्टे.औरंगाबाद शहर येथे दि.२२.०४.२००७ रोजी दाखल असलेल्या अपराध नंबर १६०/०७ क्र.३७६, ३५४, ३४२, ३४ भादवि या गुन्हयाबाबत विधानसभेत सन

२००७ मधील पावसाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न विचारण्यांत आला होता.  त्या तारांकित प्रश्नाची सत्यप्रत व त्या अनुषंगाने सदर गुन्हयाचे तपासी अंमलदार यांनी शासनाला पाठविलेल्या सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती व तपासी अमंलदार यांनी पाठविलेल्या अहवालाची सत्यप्रत व त्यावर शासनाने विधान सभेत दिलेल्या उत्तरांची सत्यप्रत.

सदर गुन्हाचे तपासी अंमलदार यांची चौकशी करण्याबाबत शासनाने काढलेल्या आदेशाची सत्यप्रत.  सदरची चौकशी मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेपण विभाग, पुणे यांनी केली असून, चौकशी दरम्यान त्यांनी घेतलेल्या सर्व जबाब प्रती व चौकशी अहवालाची सत्यप्रत, जो त्यांनी शासनाला सादर केला आहे.

अपीलकाराच्या दि.०६.०४.२००८ च्या अर्जातील वरील मुध्दा क्र. १ येथील माहिती गृहविभागातील विशा-६ कार्यासनाशी संबंधीत आहे.  मुध्दा क्र.२ बाबतची माहिती महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाशी संबंधीत आहे.  अपीलकाराच्या अर्जाची प्रत संबंधीताकडे हस्तांतरित करून अपीलकारास परस्पर माहिती पुरविण्याबाबत कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पोल-२ गृह विभाग, मंत्रालय यांनी दि.२३.०५.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले.  यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.  जन माहिती अधिका-यांनी केलेल्या कारवाईचे समर्थन करुन प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि.२६.०७.२००८ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील निकाली काढले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.  अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, क्रांतीचौक पोलीस ठाणे, औरंगाबाद शहर येथील गु.र.क्र.१६०/०७ प्रकरणाबाबत अनुषंगीक माहिती मागतली होती.

जन माहिती अधिकारी, महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच जन माहिती अधिकारी, कार्यासन विशा-६ गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-याची सदर कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७८८/०२**

**श्री. बापुसाहेब उ. पालवे**
**मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद,**
**न्यायालयीन बंदी क्र.५००९,**
**प्लॅट नं.५८, गुरूकुल सोसा.,**
**पाईप लाईन रोड, सावेडी**
**जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महिला व बालविकास अधिकारी**
**शासकीय मुलीचे विशेष पुर्नः वसन केंद्र देवनार,**
**मुंबई ४०० ०८८.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक**
**शासकीय मुलीचे विशेष पुर्नः वसन केंद्र देवनार,**
**मुंबई ४०० ०८८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. बापुसाहेब पालवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.१०.२००८ रोजी अर्ज करून, दि.०१.०१.२००५ ते दि.०३.१०.२००८ या कालावधीत विशेष पुनर्वसन केंद्रापासून किती प्रवेशिता पळून गेल्या त्यांची नावे व पत्ते, त्यापैकी किती प्रवेशिता मिळाल्या त्यांची नावे पत्ते, दि.०१.०७.२००८ ते ०३.१०.२००८ या कालावधीतील गेट रजीस्टरमध्ये ज्या प्रवेशिता बाहेर गेल्यानंतर व परत आल्यानंतर नोंदी घेतल्या जातात तसेच प्रवेशितांना भेटण्यास आलेल्या व्यक्तींच्या व नातेवाईकांच्या नोंदी घेतल्या जातात घेतलेल्या नोंदीच्या सत्यप्रतीची माहिती मागीतली होती. कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.२५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विशेष बालगृहातील गेट नोंदवहीबाबत, पळून गेलेल्या प्रवेशिताबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा महिला व बाल विकास अधिकारी, शासकीय मुलीचे विशेष पुनर्वसन केंद्र (विशेष बालगृह) देवनार, मुंबई यांनी असे प्रतिपादन केले की, सदर प्रकरणी प्रवेशिताबाबतची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(जी) अनुसार प्रकट करता येत नाही. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यान केलेले प्रतिपादन लक्षात घेता ते पटण्याजोगे आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०३.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९८/०२**

**श्री. अफाक अे मंडाविया**
**सी-२, मक्का हाउस, करिमी पार्क,**
**बी.एम.सी. रूग्णालयाजवळ,**
**ओशिवारा गार्डन रोड,**
**अजित ग्लास, जोगेश्वरी (प),**
**मुंबई ४०० १०२.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी**
**विभागीय कार्यालय, नाशिक**
**जिल्हाधिकारी नाशिक यांचे कार्यालय,**
**नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**(त्र्यंबकेश्वर), तहसिलदार कार्यालय,**
**त्र्यंबकेश्वर, नाशिक.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री. अफाक अे मंडाविया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०७.२००७ रोजी अर्ज करुन, दि.०१.०८.२००६ पासून जुलै २००७ पर्यंत स्थायी / अस्थायी स्वरुपात पुरविण्यात आलेल्या शिधापत्रिकाची यादी, त्यासंबंधीच्या कागदपत्राच्या छायाप्रती इत्यादी अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.२२.०८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.११.०९.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, सदर प्रकरणी व्दितीय अपील परत घेण्यास परवानगी द्यावी अशी अपीलकाराने दि.२६.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास विनंती केली आहे.

## आदेश

**अपीलकाराची व्दितीय अपील परत घेण्याची विनंती मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७७९/०२**

**श्री. प्रमोद शा मोजे**
**विकास स्टील रोड, नगरपालिका शाळेसमोर,**
**वार्ड नं.७, श्रीरामपूर, जि.अहमदनगर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मे.ऑल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हेन्मेंट,**
**एम.एन.रॉय हुमन डेव्हलपमेंट कॅम्प,**
**प्लॉट नं.६, एफ ब्लॉक गर्व्हेन्मेंट कॉलनी,**
**बिल्डींग नं.३२६, टी.पी.एस.रोड, नं.१२,**
**(बी.के.सी) बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**मे.ऑल इंडिया इन्स्टीटयूट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हेन्मेंट,**
**एम.एन.रॉय हुमन डेव्हलपमेंट कॅम्प,**
**प्लॉट नं.६, एफ ब्लॉक गर्व्हेन्मेंट कॉलनी,**
**बिल्डींग नं.३२६, टी.पी.एस.रोड, नं.१२,**
**(बी.के.सी) बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगरपालिका, श्रीरामपूर जि.अहमदनगर.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री. प्रमोद मोजे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०५.२००९ रोजी अर्ज करून, एल.एस.जी.डी.कोर्स श्रीरामपूर केंद्रात किती वर्षे चालला. कोर्स चालक कोण होते. सदर कोर्स श्रीरामपूर नगरपालिका मधील किती कर्मचारी बसले होते. त्यांची नावासह माहिती. सदर कोर्स केंद्र का बंद झाले इत्यादि माहिती मागीतली होती. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नसल्याने माहिती देता येत नाही असे

संस्थेने दि.०५.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने थेट राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, एल.एस.जी.डी.कोर्स श्रीरामपूर केंद्राबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळत नाही. यामुळे सदर संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचा संस्थेचा मुध्दा बरोबर आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देतो की, सदर प्रकरणी अपीलकाराने मागीतलेली माहिती मुख्याधिकारी, नगरपालिका, श्रीरामपूर यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०३.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७८१/०२**

**श्री. भागीनाथ गो. शिरसाट**
**मु.वरखेड पो.हसनापूर,**
**ता.शेवगांव, जि.अमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई**
**जुहू शॉपींग सेंटर, गुलमोहर, क्रॉस रोड नं.९९,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०४९.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक**
**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई**
**जुहू शॉपींग सेंटर, गुलमोहर, क्रॉस रोड नं.९९,**
**विलेपार्ले (प), मुंबई ४०० ०४९. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.भागीनाथ शिरसाट यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०८.२००८ रोजी अर्ज करुन, सन २००४-२००८ अखेर वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळास शासनाकडून उपलब्ध झालेला निधी, वर्षनिहाय, महामंडळाचा सहभाग बँकेमार्फत इतर योजनेअंतर्गत झालेल्या प्रकरणाची यादी. बँकेचा सहभाग नसलेले व महामंडळाने वितरित केलेले कर्ज, कर्जदाराचे नाव, सर्व कर्जदाराचे मुळ कागदपत्राच्या सत्य प्रती रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. दारिद्रय रेषेखालील असल्याबाबतच्या पुराव्याची प्रत देउन माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.११.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपुरी चुकीची माहिती देण्यात आली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास मळामंडळाने मंजूर केलेल्या कर्जाबाबत, लाभार्थ्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली आहे. पुरविलेली माहिती अपुरी, चुकीची असल्याचा मुध्दा अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. परंतू कोणती माहिती चुकीची व अपूरी आहे याबाबत काहीही खुलासा केला नाही. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०३.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७९५/०२**

**श्रीमती. कमल ग. कांबळे**
**एम.आय.डी.सी कॉर्नर,**
**संस्कार वर्दिनी शाळेच्या जवळ,**
**बारशी रोड, लातूर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**नगर विकास विभाग, (न.वि-३०)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**नगर विकास विभाग, (न.वि-३०)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.कमल कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, लातूर शहराच्या विकास योजनेतील मौजे बसवंतपूर येथील सर्व्हे क्र.२२ व २३ मधील क्षेत्र औद्योगिक विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबतचया ई पी ०७ ची सद्यस्थितीबाबत विविध अधिकारी यांच्या टिप्पण्याचा महिनानिहाय स्थिती तसेच महाराष्ट्र शासकीय कर्मचारी बदल्या व दप्तर दिरंगाई प्रतिबंध अधिनियमान्वये केलेल्या कारवाईबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. लातूर शहराच्या पुनप्रसिध्द विकास योजनेसंबंधी नस्ती शासनास सादर करण्यात आली असून त्याबाबतचा निर्णय होणे आहे. यामध्ये ई पी ०७ बाबतचे प्रकरणही समाविष्ट आहे. उर्वरित मुद्याबाबत प्रश्नार्थक असल्याने त्याबाबतची माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०२.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लातूर शहराच्या विकास योजनेतील मौजे बसवंतपूर येथील सर्व्हे क्र.२२ व २३ मधील क्षेत्र औद्योगिक विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करणेबाबतच्यचा ई पी ०७ ची सद्यस्थिती व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असल्याचे व अर्जातील उर्वरित मुध्दे प्रश्नार्थक असल्याने त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.०२.०६.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. ई पी ०७ संबंधीचा प्रस्ताव प्रलंबित ठेवला असल्याबाबत अपीलकाराची तक्रार आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी चौकशी करुन १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७८२/०२**

**श्री.लव श.शिंदे**
**मु.पो.अशोकनगर ४१३ ७१७,**
**तालुका-श्रीरामपूर,**
**जि.अहमदनगर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव (फलोत्पादन)**
**कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मस्य व्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मस्य व्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.लव श शिंदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. महाराष्ट्र शासनाने सन १९९७-९८ च्या सुमारास ॲग्रो ॲडव्हान्टेज हे कृषीप्रदर्शन मुंबई येथे आयोजित केले होते. त्यावेळेस त्यासंबंधी झालेल्या खर्चाच्या रकमेतील काही गैरप्रकार (भ्रष्टाचार) झाल्याने त्याची चौकशी होउन चौकशीचा अहवाल शासनास सादर झालेला आहे. सदरच्या अहवालात महालेखापरिक्षकांनी जे दोष दाखविले, तसेच जी अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे त्याबाबत शासनाने संबंधितांविरुध्द काय कारवाई केली आहे.

२. विनापरवानगी व प्रमाणापेक्षा अधिक खर्च कोणी केलेला आहे. त्याची वसुली संबंधितांकडून करणेबाबत कार्यवाही करणेत आलेली आहे काय? MAIDC ला ५

कोटी ९३ लाखाच्या झालेल्या डेफिसीटची वसुली संबंधितांकडून केली आहे काय? नसल्यास त्याची कारणे काय आहेत, याची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३. सदरच्या चौकशी अहवालामध्ये काही मंत्री व अधिकारी यांचेवर ठपका ठेवून त्यांचेकडून झालेल्या गैरप्रकाराची (भ्रष्टाचाराची) रक्कम वसूल करणेबाबत सुचविलेले आहे. सदरची रक्कम त्यांचेकडून वसुल करण्यात आलेली आहे काय? नसल्यास त्याची कारणे काय? याची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

४. गैरव्यवहार (भ्रष्टाचार) दोषी आढळलेल्या कुणावर फेरा अंतर्गत कारवाई करण्याबाबत सूचविले होते. कारवाईबाबत संबंधित विभागाकडून काही अभिप्राय घेतलेले आहेत काय? या अभिप्राय व टिपणीची प्रत व त्याबाबत झालेली कार्यवाही व सद्यस्थिती.

अपीलकाराने विचारणा केलेल्या माहितीच्या प्रकरणाबाबतची नस्ती अद्याप वरिष्ठस्तरावर निर्णयासाठी सादर करण्यात आली आहे. याबाबतचा पाठपुरावा सूरु आहे. तसे अपीलकाराच्या प्रतिनिधीसही कळविण्यात आले आहे. सदर प्रकरण विभागास प्राप्त झाल्यास आवश्यक माहिती त्वरित उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.०४.२००८ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.३०.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराच्या दि.१०.०२.२००९ च्या मूळ अर्जाच्या संदर्भात माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती वस्तुस्थितीला धरुन आहे असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०४.०४.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, ॲग्रो ॲडव्हान्टेज या कृषी प्रदर्शनावर झालेला खर्च व अन्य बाबीतील व्यवहारातील गैरप्रकाराबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

सदर प्रकरणी चौकशी अहवालाची प्रत अपीलकारास देण्यात आली आहे. अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दिलेली नाही. यासंबंधीची फाईल सादर करण्यता आली आहे. सदर प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी प्रथम अपीलावर सुनावणी आयोजित करणे आवश्यक होते. सुनावणी आयोजित करुन या प्रकरणासंबंधी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकून घेणे आवश्यक होते. परंतू प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केली आहे त्यासंबंधीच्या फाईलची सद्यस्थिती अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी कळवावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३७/०२**

**श्री. बळीराम वा. पाखरे**
**आयुधिक राज्य राखीव पोलीस बल पुणे**
**रा.झेंडेवस्ती, स.नं.४३/३, बी.टी.कवडे रोड,**
**घोरपडीगांव, मुंढवा, पुणे ३६.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पोलीस महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ०३७.**

**जन माहिती अधिकारी,**
**पोलीस महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ०३७.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.बळीराम पाखरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०७.२००८ रोजी अर्ज करुन, पोलीस निरीक्षक (अर्मर) रा.रा.पो.बल, पुणे या पदावरील नियुक्तीबाबतच्या वादासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे माहिती विहित वेळेत पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराची आयुधिक पोलीस निरीक्षक पदावर नियुक्ती होणेपूर्वी विभागीय निवड समिती नेमली होती. निवड समितीने अपीलकाराची मुलाखत घेउन पात्र ठरल्यानंतर आयुधिक पोलीस निरीक्षक पदावर अपीलकाराची नियुक्ती केली. त्याबाबतचा निवड समितीच्या सभेच्या वृतांताची नक्कल. सदर पदावर अपीलकारास रूजू होणेबाबत दिलेल्या कागदपत्राच्या नक्कला. नियुक्तीसाठी अपीलकारास मुलाखतीला बोलावलेल्या पत्राची नक्कल. अपीलकाराने सादर केलेली शैक्षणिक प्रमाणपत्राच्या नक्कला. समितीच्या अहवालाची नक्कल. नियुक्तीचे आदेश करण्यासाठी संबंधित लिपीकाने सादर केलेल्या टिप्पणीची नस्तीसह नक्कल. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्र किती काळाचे मुदतीत तपासून घ्यावीत याबाबत वरिष्ठांनी निर्गमित केलेल्या सूचनाच्या प्रतीची नक्कल. अपीलकाराने खोटी प्रमाणपत्र सादर करुन नियुक्ती मिळविली याबाबत केलेल्या निनावी अर्जाची नक्कल इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे अपीलकारास दि.१७.०८.२००९ अन्वये विनाशुल्क पुरविली आहेत. अन्य कागदपत्र कार्यालयाच्या अभिलेखाचा जाणिवपूर्वक व काळजीपूर्वक शोध घेतला असता कागदपत्र अभिलेखावर मिळून आली नाहीत. त्यामुळे सदरील माहिती अपीलकारास देण्यात आली नाही असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक १६.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८९४/०२**

**श्री. विकास दत्तात्रय चोपडे**
**शाहु कॉलनी, एम.एस.ई.बी. फाटा,**
**मु.पो.क कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विकास चोपडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०६.२००९ रोजी अर्ज करुन, मौजे बहिरेवाडी, ता.पन्हाळा येथील वारणा उजवा कालवा कि.मी.५९ व ६० या पाटबंधारे प्रकल्पाचे कामकाजासंबंधी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी, अर्जाच्या अनुषंगाने तातडीने अर्जदारास माहिती उपलब्ध होणेच्या दृष्टीकोनातून अंतरिम उत्तर दि.०६.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर दि.०१.०८.२००९ च्या पत्रान्वये विहित मुदतील सविस्तर माहिती पुरविली. दरम्यान अपीलकाराने दि.१७.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेले आदेश पोच देय डाकेने अपीलकारास पाठविले. त्यानंतर अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वारणा उजवा कालवा कि.मी.५९ व ६० या पाटबंधारे प्रकल्पाचे कामासंबंधी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अर्जावर अपीलकारास सविस्तर मुध्देनिहाय माहिती पुरविली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८५/०२**

**श्री. दिगंबर शं.गिरमे**
**सी.टी.एस.नं.४२२, कसबा पेठ,**
**पुणे ११. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)**
**पोलीस महासंचालक, मुंबई यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (गोपनीय)**
**पोलीस महासंचालक, मुंबई यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.दिगंबर गिरमे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०३.२००९ व १३.०५.२००९ रोजी अर्ज करुन, फरसरवाना पोलीस स्टेशन येथे अपीलकारावर १५३/९३ चॅप्टर केस दाखल झाली होती. त्याबाबत पोलीसांनी केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने अपीलकाराने माहितीच्या अधिकारात अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराच्या अर्जातील काही मुध्दे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधीत आहेत. यास्तव अपीलकाराच्या अर्जाची प्रत पुढील कार्यवाहीकरिता, जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०९.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. तसेच कार्यासनात उपलब्ध असलेली कागदपत्रे निरीक्षणाकरिता अपीलकारास उपलब्ध करुन देण्याची व त्यानंतर निवडक कागदपत्राच्या

छायाप्रती देण्याची जन माहिती अधिका-यांनी तयारी दाखविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकारावर १५३/९३ चॅप्टर केस दाखल झाली होती. त्याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती.

कार्यालयातील संबंधीत कागदपत्र अपीलकारास पहाणीसाठी दोन वेळा उपलब्ध करुन देण्यात आली होती. तसेच नस्तीच्या पहाणी अंती अपीलकाराने मागणी केलेली नस्तीवरील उपलब्ध माहिती वेळोवेळी अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी दि.२८.०५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले होते. तसेच सामान्य प्रशासन विभाग, क्र.केमाअ--२००८/प्र.क्र.१३/०८/सहा (माअ), दि.०६.०९.२००८ च्या परिपत्रकातील परिच्छेद २ मधील तरतुदीनुसार अर्जातील उर्वरित मुद्याबाबतच्या माहितीसाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालयाशी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करावा असेही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले होते. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८२/०२**

**श्री. दिगंबर शं.गिरमे**
**सी.टी.एस.नं.४२२, कसबा पेठ,**
**पुणे ११.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.दिगंबर गिरमे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००५ रोजी अर्ज करुन, पोलीसांनी अपीलकारास चुकीच्य पध्दतीने सी.आर.पी.सी.कलम ११० अनुसार बंदीस्त ठेवल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.२२.१२.२००५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पोलीसांनी फौजदारी दंड प्रक्रीया संहिता नियम (Criminal

Procedure Cade) ११० अनुसार चुकीच्या पध्दतीने अपीलकारास बंदीस्त करुन ठेवलेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी पोलीसांनी अपीलकारास चुकीचे कलम लावून बंदी केल्याबाबत दि.३१.१२.१९९५ रोजी तक्रार दाखल केली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती अपीलकारास दि.२६.०९.२००६ च्या पत्रान्वये कळविलेली आहे. या परिस्थितीत मी आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक १४.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८३/०२**

**श्री. दिगंबर शं.गिरमे**
**सी.टी.एस.नं.४२२, कसबा पेठ,**
**पुणे ११.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.दिगंबर गिरमे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०३.२००९ रोजी अर्ज करुन, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम-११० (ई) (जी) आणि भांदवि ३२५ अन्वये सराहीत गुन्हेगारावर कारवाई करण्यात येते. अर्जदार श्री.गिरमे हे सराहीत गुन्हेगार नव्हते. तसेच उक्त कलमाप्रमाणे कारवाई करण्यापूर्वी त्यांना नोटीस का देण्यात आली नाही. सदर दोन्ही कलमान्वये एकत्रित कारवाई कशी होउ शकते. अपीलकाराची आई आणि अपीलकार यांचे घरगुती वाद आहेत. तरी ११० प्रमाणे कारवाई करण्यात आली. सदर प्रकरणाची कागदपत्र रद्यी म्हणून मे.अशोक ट्रेडर्स यांना विकली अपीलकारास दिली नाहीत. कलम ११० (ई) (जी) ला धरून भदंवि ३२५ ला धरून चॅप्टर केस होत नाही याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१६.०४.२००९ च्या पत्रानुसार अपीलकारास माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकार श्री.गिरमे रा.सी.टी.४२२ कसबा पेठ, पुणे यांनी त्यांचे आईस मारहाण केलेबाबत फरासरवाना पोलीस स्टेशन गुन्हा रजीस्टर क्रमांक ६७/९३ भादविक ३२५ अन्वये अपराध दाखल झाला. त्यानंतर प्रतिबंधक उपाय योजना म्हणून सन १९९३ मध्ये तत्कालीन सहाय्यक पोलीस आयुक्त, शहर विभाग, पुणे यांचे कालावधीत सी.आर.पी.सी.११० (ई) (ग) अन्वये प्रतिबंधक कारवाई झाली होती. सदर प्रतिबंधक कारवाईची रेकॉर्ड ही मुदतबाहय झाले असल्यामुळे नष्ट करण्यात आले असल्याचे अपीलकारास कळविले. अपीलकारविरुध्द केलेली प्रतिबंधक कारवाई फौजदारी दंड प्रक्रिया संहिता ११० (ई) (ग) ही सन १९९३ मध्ये झाली आहे. ही प्रतिबंधक कारवाई त्यावेळचे परिस्थितीनुसार फरासरवाना पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांनी केली आहे. ही चुकीची अगर आहे नाही याबाबत अपीलकाराने सहा महिन्याचे आत योग्य त्या कोर्टात अर्ज करुन दाद मागणे आवश्यक होते. चॅप्टर केस मध्ये अपील फक्त सत्र न्यायालयातच केले जाते. अपीलकाराने त्यावेळेचे चॅप्टर केस बाबत दाद मागावयाची असल्यास सत्र न्यायालय, पुणे येथे अपील करण्यास मुभा आहे. अपीलकारास वेळोवेळी निरनिराळी माहिती दिलेली आहे. उपलब्ध अर्ज पहाण्यासाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. उपलब्ध रेकॉर्ड फरसरवाना पोलीस स्टेशन, स.पो.आ. शहर विभाग पुणे शहर यांनी दाखविलेले आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग विभाग, पुणे श्री.पी.आर.पटणे यांनी क्राईम रजिस्टर व इतर रेकार्ड अर्जदार यांना अवलोकनास उपलब्ध करुन दिलेले आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२६.०९.२००९ च्या पत्रान्वये

कळविलेले आहे.      यावरुनअपीलकारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८४/०२**

**श्री. दिगंबर शं.गिरमे**
**सी.टी.एस.नं.४२२, कसबा पेठ,**
**पुणे ११. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**समान्य प्रशासन विभाग, का-६,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**समान्य प्रशासन विभाग, का-६,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दिगंबर गिरमे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०५.२००९ रोजी अर्ज करुन, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ बाबत स्पष्टीकरणात्मक अनुषंगीक माहिती मागीतली होती. उक्त अधिनियमातील कलम ८ मध्ये माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद नमुद केले असून त्यातील उप कलम (ड) अन्वये अपीलकारास योग्य ते मार्गदर्शन मिळू शकेल. राज्य माहिती आयोगाची स्वतंत्र अधिकारीता असून त्यात शासनास हस्तक्षेप करता येणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०६.०६.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२४.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अर्जावर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३४/०२**

**श्री. राजेंद्र रा. इंगवणे**
**राहूल चेंबर्स, १४ एरडंवणे,**
**कर्वे रोड, पुणे ४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**विधी व न्याय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.राजेंद्र इंगवणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, दि.२८.०७.२००७ रोजीच्या पत्रावर केलेल्या कारवाईची तपशिलात्मक माहिती लेखी स्वरुपात मिळावी. कारवाई चौकशी दरम्यान संबंधीत घटकांना काढलेल्या नोटीसा, घेतलेले जबाब, पिडीत घटकास दिलेला न्याय, दोषी घटकावर झालेल्या दंडात्मक कारवाईची छायाकिंत प्रतीची मागणी केली होती. मागीतलेली योग्य पूर्ण माहिती मिळण्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१४.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित केली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, दि.२८.०७.२००७ च्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती.  अपीलकाराने माहितीच्या अधिकारात दि.१७.१२.२००७ रोजी विधी व न्याय विभागाच्या नोंदणी शाखेत अर्ज सादर केला.  दि.२८.०७.२००७ च्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती.  दि.२८.०७.२००७ च्या पत्रातील विषय हा गृह विभाग मंत्रालय यांचेशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचा अर्ज गृह विभागाकडे हस्तांतरित केला असल्याचा लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले.  यावरुन अर्जाचर जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार कार्यवाही केली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १६.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७८/०२**

**सौ.कलावली खरात**
**२२/१५५५, अभ्युदय नगर,**
**मुंबई ४०० ०३३. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख,**
**सातारा, तहसिल आवार, सातारा,**
**जि.सातारा**

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**भूमी अभिलेख कार्यालय,**
**खंडाळा, जि.सातारा. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार सौ.कलावती खरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, मौजे लोणंद ता.खंडाळा, जि.सातारा येथील स.नं.४२६/अ याचा सि.स.नं.२४७५ क्षेत्र ५६६५५ चौ.मी. कसे नमुद केले याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१५.०९.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख खंडाळा यांनी सर्व कागदपत्राचे अवलोकन करुन अपीलकारास तीन आठवडयाचे आत माहिती पुरवावी असे दि.१८.०९.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मौजे लोणंद ता.खंडाळा जि.सातारा येथील स.नं.४२६/अ याचा सि.स.नं.२४७५ क्षेत्र ५६६५५ चौ.मी. या मिळकतीवर महाराणी सईबाई भोसले सहकारी गृहनिर्माण संस्था लि. तर्फे चेअरमन श्री.शंकरराव बाळासो जाधव अशी नोंद मिळकत पत्रिकेवर दि.१५.०७.१९८५ रोजी घेणेत आलेली आहे. मूळ माहितीचे अधिकार अर्जामध्ये क्षेत्रफळाबाबत अपीलकाराने मागणी केलेली नाही. तथापि अपीलकारास जन माहिती अधिकारी, खंडाळा यांनी मिळकतपत्रिकेवर नमुद असलेप्रमाणे माहिती दिली आहे. सि.स.नं.२४७५ याचे क्षेत्र ५६६५५ चौ.मी कसे नमुद केले याची अपीलकारास माहिती हवी आहे असे अपीलकाराने सांगीतले. अपीलकाराने दि.१८.०५.२००८ चा माहितीच्या अधिकारातील अर्जात क्षेत्राबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख केलेला नव्हता. प्लॉटप्रमाणे मिळतपत्रिकेवर नोंदी घेणेत आलेल्या नाही. तसेच मिळकत पत्रिकेवर कोणत्याही धारकाची नावे घेणेत आलेले नाहीत असे जन माहिती अधिका-यांनी सांगीतले. अपीलकार यांनी नमुद केलेल्या क्षेत्रफळाबाबत जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, खंडाळा यांनी सर्व कागदपत्राचे अवलोकन करुन अपीलकारास ३ आठवडयाचे आत माहिती पुरवावी असे आदेश पारित केले आहेत. जन माहिती अधिका-यांनी प्रथम अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशाचे पालन केले नाही. अपीलकारास माहिती पुरविली नाही. जन माहिती अधिका-यांची सदर कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत आवश्यकती माहिती अपीलकारास पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७६/०२**

**सौ.कलावली खरात**
**२२/१५५५, अभ्युदय नगर,**
**मुंबई ४०० ०३३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार सौ.कलावती खरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०७.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

"कोणी तक्रार केलेली असो वा नसो विषयांकित महाराणी सईबाई भोसले या संस्थेच्या बाबतीत आपल्या कार्यालयाच्या दि.०१.०४.१९९८५ च्या क्र.सी.टी.एस/एच.एस.जी./एस.आर-५ च्या आदेशामधील अटींचे पालन होत आहे किंवा नाही हे पाहिले जाण्याची आपल्या कार्यालयाने जी व्यवस्था केलेली आहे, त्या व्यवस्थेने त्यांच्या कर्तव्याच्या एक भाग म्हणून, सदर आदेशातील अट क्र.२, ३ व ५ च्या बाबतीत दि.०१.०४.१९८५ पासून गेल्या सुमारे वीस वर्षात सादर केलेल्या अहवालावर आपल्या कार्यालयाने जी कार्यवाही केली असेल त्या कार्यवाहीची माहिती देणा-या कागद पत्रांच्या प्रती अर्जदारास पुरविण्याची नम्र विनंती आहे."

मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१२.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराणी सईबाई भोसले या संस्थेबाबत उपविभागीय अधिकारी, सातारा यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रत जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**                      **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९**            **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८१/०२**

**श्री.हरी आप्पा प्रक्षाळे**
**अनिल नगर, पंढरपूर,**
**मसोबा मंदीर समोर,**
**वीट भट्टी जवळ, ता.पंढरपूर,**
**जि.सोलापूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा शल्यचिकित्सक**
**श्री.छत्रपती शिवाजी महाराज सवौपचार रुग्णालय,**
**सोलापूर.**

**जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक**
**वैद्यकीय अधिक्षक यांचे कार्यालय,**
**उप जिल्हा रुग्णालय, पंढरपूर,**
**ता.पंढरपूर, जि.सोलापूर. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.हरी आप्पा प्रक्षाळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०८.२००८ रोजी अर्ज करुन, पंढरपूर उप जिल्हा रुग्णालयास सन २००६-०७ तसेच २००७-०८ या वर्षात डॉ.आनंदीबाई जोशी हा पुरस्कार म्हणून किती रुपयाचा धनादेश मिळाला. त्या रक्कमेला रुग्णालयास कोणत्या कामाकरिता कशाप्रकारे खर्च करण्यात आला, त्याची सविस्तर माहिती, खर्चाच्या पावत्याची छायाप्रत, सन २००५-०६ ते २००७-०८ या वर्षात रुग्णालयाने किती भंगार विक्री केली. कशाप्रकारे भंगाराचा लिलाव करण्यात आला. भंगार लिलाव घेणा-यांचे नाव, पत्ता, भंगाराचे वजन किती, किती रक्कम दिली, कोषागारात भरण्यात आलेल्या रक्कमेच्या चालनाची प्रत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०९.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने

अपीलकाराने दि.०४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पंढरपूर उप जिल्हा रुग्णालयाबाबत अुनषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. पंरतू यामुळे अपीलकाराचे समाधान झाले नाही. या परिस्थितीत राज्य माहिती आयोग काही करुन शकत नाही. तरी सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ११.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६७/०२**

**श्री.सारंग भाउसाहेब मदाले**
**मोना हाउसिंग सोसा.,**
**एफ/२२, उषःकाल कॉलनी रोड,**
**जुनी सांगवी, पुणे ४११ ०२७. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक नगररचना**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी, पुणे १८.**

**जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी, पुणे १८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सारंग मदाले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०२.२००९ रोजी अर्ज करुन, सांगवी फाटा ते डांगे चौकाचा रस्ता रुंदी करणासाठीचा शासन मान्यताप्राप्त नकाशाची छायाप्रत मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३१.०३.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०१.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१३.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. प्रथम अपीलावर दि.१२.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. आदेशासोबत नकाशाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, याच विषयावरील अपील क्र.८५७/२००९ संबंधी राज्य माहिती आयुक्त, पुणे यांनी सुनावणी आयोजित करुन दि.१४.०९.२००९ रोजी आदेश पारित केले आहेत. एका राज्य माहिती आयुक्तांनी अपीलावर आदेश पारित केल्यानंतर पुन्हा त्याच विषयावर पारित केलेले आदेश समाधानकारक नसल्याच्या कारणावरुन अन्य राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये तरतुद नाही. यामुळे सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.

## आदेश

**अपीलावर राज्य माहिती आयुक्त, पुणे यांनी यापूर्वीच आदेश पारित केले असल्याने सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ११.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६३/०२**

**श्री.पुरूषोत्तम रा.बापये**
**राजेश पुरूषोत्तम बापये,**
**६०२ बी, बिल्डींग,**
**नोहा एपेक्स हौ.सोसा.,**
**स्नेहसकूल वाडीचे मागे,**
**आनंद महल रोड, अडाचव,**
**सुरत ३९५ ००९.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मामलेदार**
**मामलेदार कार्यालय, वडगांव**
**ता.मावळ, जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा तलाठी**
**कुसगांव, ता.मावळ, जि.पुणे.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.पुरुषोत्तम बापये यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

मौजे कुजगाव (बु) बापये वाडी येथे अपीलकाराची वडीलोपार्जीत जमिन सर्व्हे क्र.२३८ व २७० येथे आहे. सर्व्हे क्र.२३८ मालकाच्या नावामध्ये बापये बरोबर वत्सला बाबुराव तेलंग यांचे नाव जोडले गेले आहे. त्याचा नोंद क्र.७३२ ने बदल केलेला दिसतो. नोंद क्र.१७७ व ५११ यांनी बदल झालेले दिसतात. सदर नोंदी क्र.७३२, १७७ व ५११ च्या कागदपत्राच्या नक्कला. बदल करतांना अधिका-यांनी मारलेले शेरे. नोंदी करतांना इतर मालकांना नोटीसा काढल्या होत्या का? काढल्या असल्यास मालकांचे जाबजबाब ७/१२ उता-याची नक्कल सर्व्हे क्र.२७० मालकाच्या नावाबरोबर वत्सला बाबुराव तेलंग, कार्यकारी अभियंता, रस्ते विकास महामंडळ, गणेश यशवंत साबळे, अरविंद मधुकर गुर्जर, धनंजय मधुकर गुर्जर यांची नावे जोडली गेलेली

दिसतात. नोंदी क्र.९९९, ७३२, ९८६, १३५९, ४२६०, १७५, १७७, ५१२, १४७८, २११९ व २१२० ने झालेल्या दिसतात. सदर कागदपत्राच्या नक्कला व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मौजे कुजगाव (बु) बापये वाडी येथील सर्व्हे क्र.२३८ व २७० मधील मालकाच्या नावाबरोबर अन्य व्यक्तीच्या नोंदी केल्या आहेत. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७३/०२**

**श्री.शामराव जोती देसाई**
**मु.पो.शिरटे, ता.वाळवा,**
**जि.सांगली. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभाग नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**विभाग नियंत्रक कार्यालय,**
**राज्य परिवहन, सांगली, जि.सांगली.**

**जन माहिती अधिकारी तथा सुरक्षा व दक्षता अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**विभाग नियंत्रक कार्यालय,**
**राज्य परिवहन, सांगली, जि.सांगली. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.शामराव देसाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.१२.२००६ रोजी अर्ज करुन, सुरक्षा रक्षकाच्या अतिकालीका भत्ता माहे फेब्रुवारी, १९९८ पासून अतिकालीन भत्ता मंजूर केला असून स्वाक्षरित खाडारखोड म्हणून परत मंजूरीस पाठविले. पंरतू आद्याप अतिकालीक भत्ता मिळाला नाही. त्यामुळे अपीलकाराने एकूण १८ विनंती अर्ज / स्मरणपत्र पाठविली. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. अर्जान्वये कोणतीही माहिती मागीतली नसल्याचे नमुद करुन अपीलकाराचा अर्ज दप्तरी ठेवणेत आल्याबाबत जन माहिती अधिका-यांनी दि.०९.०२.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१८.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१२.०६.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-याने दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१४.०६.२००७ रोजी आदेश पारित करुन प्रथम

अपील फेटाळले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते.   सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सुरक्षा रक्षकाचा अतिरिक्त भत्ता मंजूरीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  उत्तरवादीने अपीलकारास व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमक्ष माहिती पुरविली.  सदर प्रकरणी अपीलकारास आता माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**  **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९**  **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७४/०२**

**श्री. दिगंबर शं.गिरमे**
**सी.टी.एस.नं.४२२, कसबा पेठ,**
**पुणे ११.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप महासंचालक**
**पोलीस महासंचालक, मुंबई यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस महासंचालक**
**पोलीस महासंचालक, मुंबई यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंग मार्ग,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.दिगंबर गिरमे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०९.२००८ रोजी अर्ज करुन, फरसरवाना पोलीस स्टेशन येथील पोलीसांनी सन १९९३ मध्ये कौटुंबिक प्रकरणात सी.आर.पी.सी.११० (ई) (जी) प्रमाणे प्रतिबंधक कार्यवाही व अटक करुन सराईत गुन्हेगारासारखी वागणूक देउन मानसिक त्रास दिल्याबाबत तक्रार करुन अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांनी दि.३०.०९.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर मुध्देनिहाय माहिती, अपीलकारास शुल्क स्विकारुन पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.

आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, परि-१ पुणे शहर श्री.वसंत कोरगावकर यांनी चौकशी केलेली आहे. अपीलकाराने त्यांच्या आई श्रीमती.पार्वतीबाई, वय ६८ यांना मारून हाताचे हाड फॅक्चर करुन मोठी दुखापत केली. यामुळे त्यांच्याविरुध्द फरासरवाना पोलीस स्टेशन गुन्ही रजिस्टर क्र.६७/९३, भदवि क्र.३२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. या अपराधानंतर सन १९९३ मध्ये तात्कालीन पोलीस उपनिरीक्षक, डी.व्ही.पवार यांनी विशेष कार्यकारी दंडाधिकारी शहर विभाग, कोर्ट, पुणे यांचे कोर्टात चॅप्टर केस क्र.१५३/९३, सी.आर.पी.सी.११० (ई) (जी) अन्वये प्रोसीडींग पाठवून प्रतिबंधक कार्यवाही केली होती. त्यामध्ये अपीलकाराकडून १ वर्षे मुदतीचा व घटनेनुसार व ३०००/- रूपये रक्कमेचा चांगल्या वर्तणुकीचा फायनल बॉंड घेण्यात आला आहे. सदर अहवाल उत्तरवादीने आयोगास सादर केला. संबंधीत विषयी क्र.४४३/०२ हया व्दितीय अपीलावर दि.०७.१०.२००६ रोजी मा.मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी आदेश पारित केले आहेत. व्दितीय अपील फेटाळण्यात आले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८०७/०२**

**श्री. सुनिल पंडीतराव जगताप**
**टाईप एफ/५३/१२,**
**औष्णिक विज केंद्र वसाहत कोराडी,**
**पो.कोराडी वसाहत ता.कामठी,**
**जि.नागपुर ४४१ १११.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक**
**एस्ट्रेला बॅटरीज परिसर,**
**विस्तारीत इमारत, १ ला मजला,**
**धारावी रोड, मांटुगा, मुंबई ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (मा.सं.२)**
**प्रकाशगड, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुनिल जगताप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०९.२००८ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य विज मंडळातील ज्या कार्यरत व निलंबीत कामगारांना जानेवारी १९८८ पासून ते डिसेंबर, २००१ पर्यंतच्या कालावधीत मंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले. या बडतर्फीच्या कार्यवाहीवर "औद्योगीक विवाद अधिनियम" अंतर्गत संबंधित विभागाव्दारे मंडळाने घेतलेल्या पूर्व परवानगीच्या अहवालाच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. अपीलकाराचे प्रकरण पूर्वी कोराडी कार्यालयाने हाताळ्ले असल्याने मुख्य महाव्यवस्थापक (कोराडी औ.वि.केंद्र, कोराडी) येथील जन माहिती अधिका-याकडे अपीलकाराचा माहितीच्या अधिकारातील अर्ज हस्तांतरित करण्यात येत असल्याचे अपीलकारास कळविले. तसेच सदर कार्यालयाशी परस्पर संपर्क साधावा असे जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (मासं-२) यांनी दि.३०.०९.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले, यामुळे समाधान झाले नसल्याने

अपीलकाराने दि.१०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील कार्यरत व निलंबित कामगांराना जानेवारी, १९८८ ते डिसेंबर, २००१ या कालावधीत मंडळाच्या सेवेतून बडतर्फ केले याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. महानिर्मीती कंपनीस औद्योगिक विवाद अधिनियम लागू आहे किंवा कसे अशी आयोगाने उत्तरवादीकडे विचारणा केली. औद्योगिक विवाद नियम, महानिर्मिती कपंनीस लागू आहेत असे उत्तरवादीने आयोगास सांगीतले.

सन १९८८ ते २००१ या काळात महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून व्यवस्थापन होत असे. महानिर्मिती कंपनी सन २००५ पासून अस्तितत्वात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती, महानिर्मीती कंपनीकडे उपलब्ध नाही. त्याचप्रमाणे बडतर्फीची प्रकरणे हाताळण्यासाठी महानिर्मिती कंपनीमध्ये वेगवेगळया पातळीवर क्षेत्रिय कार्यालयास अधिकार प्रदार करण्यात आलेले आहेत. त्यामुळे क्षेत्रिय कार्यालयाकडून बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचा-यांची माहिती महानिर्मिती कार्यालयाकडून उपलब्ध होउ शकत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०६.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविले आहे. अर्जावर जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०७.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६४/०२**

**श्री. अशोक भाउ सावंत**
**सी/३४३ विकासीनी, सेक्टर ८ बी,**
**सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग-१,**
**पंचायत समिती माण दहिवडी,**
**ता.माण, जि.सातारा.**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक/सरपंच**
**ग्रामपंचायत किरकसाल, पोस्ट-गोंदावले**
**ता.माण, जि.सातारा. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.अशोक सावंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.१२.२००७ रोजी अर्ज करुन, स्व.श्री.भाउ भिवा सावंत यांची मिळकत न.६३ (६६) येथील मौ.किरकसाल ता.माण जि.सातारा येथील घर जमिन श्री.श्रीरंग भाउ सावंत यांच्या नावे कशी झाली यांची पूर्ण माहिती कागदपत्राच्या नक्कलासह मिळवी अशी मागणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माण (दहिवडी) यांचेकडे केली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ग्रामपंचायत पातळीवर आहे. पंचायत समिती पातळीवर सदरची माहिती संकलीत नाही. सदरची माहिती, जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत किरकसाल यांचेकडे मागणी करावी असे जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी-गट अ पंचायत समिती माण (दहिवडी) यांनी अपीलकारास दि.२७.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, किरकसाल ता.माण, जि.सातारा यांनी अपीलकारास दि.२५.०१.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१८.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१८.०३.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली.

उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिली असल्याचे नमुद करून अपील निकाली काढले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मौ.किरकसाल येथील घर जमिन श्री.श्रीरंग भाउ सावंत यांचे नावे कशी झाली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

मौ.किरकसाल येथील ग्रामपंचायत हद्दीतील वडिलोपार्जित घर जमिन क्र.६३ (६६) यांचे हिस्से समान करुन, त्यापैकी एक हिस्सा श्रीरंग भाउ सावंत यांना देण्यास अपीलकाराची हरकत नाही. परंतू ग्रामपंचायती मधील दप्तरी अपीलकाराचे थोरले बंधू श्री.श्रीरंग भाउ सावंत यांचे नावेच सर्व नोंद केलेली आहे. म्हणून वारसा हक्काप्रमाणे ग्रामपंचायतीने श्री.श्रीरंग भाउ सावंत यांचे एकटयाचे नावे केलेली नोंद रद्द करुन वारसदारांना समान हक्क प्राप्त व्हावा अशी अपीलकराने व्दितीय अपीलात मागणी केली आहे.

स्व.भाउ भिवा सावंत यांचे नावे असलेली घर जमिन, त्यांना वारस असून फक्त श्री.श्रीरंग भाउ सावंत (अपीलकाराचे थोरले भाउ) यांचे नावे कशी झाली. श्री.श्रीरंग भाउ सावंत यांनी स्वत:चे नावे कोणत्या आधारे केली. याबाबत जन माहिती अधिका-यांनी नमुना क्र.८ चे उतारे व नोंद झालेल्या रजीस्टरची संबंधीत पानाची छायाप्रत अपीलकारास पुरविली आहे. घर जमिनी स्व.भाउ भिवा सावंत यांच्या पश्चात त्यांच्या सर्व संबंधित वारसादारांना समान हक्क प्राप्त करुन

देण्याची बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मोडत नाही. याकरिता अपीलकाराने सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ११.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८१२/०२**

**श्री. मोहन ग. गव्हाणकर**
**श्री.जोशी कश्यप अपार्टमेंट (तळ मजला)**
**पांडे लेआऊट प्लॉट नं.९, मालवीय नगर,**
**खामला-नागपूर ४४० ०२५.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सार्वजनिक आरोग्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**ग्राम विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.मोहन गव्हाणकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०६.२००९ रोजी अर्ज करुन, जिल्हा परिषद सेवेतील, पूर्वीचे विस्तार अधिकारी (आरोग्य) व सद्याचे वैद्यकीय अधिकारी, गट ब वेतनश्रेणी रू.२०००-३५०० (सुधारित रू.६५००-१०५००) यांना कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यासंबंधाने कार्यालयीन टिप्पणी, पत्र U.O.R. व्दारे आरोग्य विभागाने शासनाचे वित्त विभागाचे अभिप्राय त्या कार्यालयीन टिप्पणीची प्रत, U.O.R. छायाप्रतीची मागणी केली होती. वैद्यकीय अधिका-यांना कालबध्द पदोन्नती योजना लागू केल्याबाबतचे आदेश हे सार्वजनिक आरोग्य विभागाने निर्ममित केले असल्याने याबाबतची वित्त विभागाची टिप्पणी अथवा पत्राची प्रत ही सार्वजनिक आरोग्य विभागाकडे उपलब्ध आहे. त्यामुळे त्या विभागाकडे परस्पर संपर्क

साधावा असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग श्री.मोहम्मद मुजावर यांनी दि.१५ मे, २००९ च्या पत्रान्वये कळविले. विहित मुदतीत जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०६.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलावर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने व्दितीय अपील राज्य महिती आयोगाकडे दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, वैद्यकीय अधिकारी - गट ब पदधारकांना कालबध्द पदोन्नती योजन लागू करण्यासंबंधीच्या सर्व संबंधीत नस्तीच्या / कागदपत्राची मागणी केली होती. सदर प्रकरणी वैद्यकीय अधिकारी गट ब पद धारकांना आश्वाशीत योजना लागू करण्याकरिता अनौपचारिक संदर्भ वित्त विभागास सादर करुन ग्राम विकास व जलसंधारण विभागाने वित्त विभागाची मान्यता घेतली आहे. सदरबाबत जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.सुर्यकांत निकम यांनी आयोगासमोर व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०७.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६९/०२**

**श्रीमती. रेणुका अनिरुध्द गोडबोले**
**डी ३ वेंकटेश हेरिरेज कर्वेनगर,**
**३१८+५ अे कर्वेनगर, पुणे ५२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.१९६७,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.१९६७,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती. रेणूका गोडबोले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०३.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकाराच्या दि.१०.१०.२००८ व दि.३०.१२.२००८ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती तंत्रशिक्षण संचालनालय प्राधिकरणाची कर्तव्य, अधिकार, एम.आय.पी.टी. अनुदानीत तंत्रनिकेतन संस्थेतील कर्मचा-याच्या सेवाशर्ती, वेतनश्रेणी, नियुक्ती नियम इत्यादी एकूण १० मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी क्र.११/तांशिसं/मा.अधिकार/२००८/७००६ अनुसार माहिती पुरविली. माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन दि.१२.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जन माहिती अधिका-यांनी दि.०५.०५.२००९ च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती मिळाली असल्याचे व्दितीय अपीलात नमुद केले आहे. परंतू अर्जातील मुध्दर क्र.१ ते ३ व ५ ते १० मध्ये मागीतलेली माहिती देण्याचे मुदामहून टाळले गेले असल्याचाही मुध्दा व्दितीय अपीलात नमुद केला आहे. सदर प्रकरणी अपीलकारास, जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीची प्रत व्दितीय अपीलासोबत जोडली नसल्याने अपीलकारास अर्जातील कोणकोणत्या मुद्यावर माहिती पुरविली, कोणकोणत्या मुद्यावर माहिती पुरविली नाही याची आयोगास खात्री करता आली नाही. उत्तरवादीनेही व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर केला नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अर्जातील सर्व मुद्याबाबत अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७९/०२**

**सौ.कलावली खरात**
**२२/१५५५, अभ्युदय नगर,**
**मुंबई ४०० ०३३.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार सौ.कलावती खरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०४.२००८ रोजी अर्ज करुन, महाराणी सईबाई भासले सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या) लोणंदच्या भुखंड वाटपातील गैरव्यवहाराबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१०.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, भुखंड वाटपातील गैरव्यवहाराबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. भुखंड वाटपातील गैरव्यवहाराबाबत महसूल व वन विभाग, मंत्रालयाने दि.१३.०२.२००८

रोजी आयोजित केलेल्या चौकशी संबंधीची प्रत, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत निशुल्करित्या पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ११.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७७/०२**

**सौ.कलावली खरात**
**२२/१५५५, अभ्युदय नगर,**
**मुंबई ४०० ०३३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार सौ.कलावती खरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०७.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी साहेब, सातारा यांचे दि.०५.०१.२००८ चे निकालपत्र पोस्ट ऑफिसमध्ये प्रत्यक्षात किती तारखेस दाखल करण्यात आले याची आपल्या कार्यालयाच्या अभिलेख्यानुसारची माहिती पुरवावी.
२. अर्जदाराच्या दि.२७.०३.२००८ च्या जोडपत्र-अ मधील अर्जास विहित मुदत संपून गेली तरी उत्तर देण्यात न आल्याच्या बाबतीत शासकीय माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त करण्यात आलेल्या लेखी निवेदनाची एक प्रमाणित प्रत अर्जदारास पुरविण्याची नम्र विनंती आहे.
३. अर्जदाराच्या दि.१३.०६.२००८ च्या जोडपत्र-अ मधील अर्जात नमूद करण्यात आल्याप्रमाणे अर्जदाराने केवळ माननीय लोक आयुक्त साहेब यांच्या कार्यालयास

केलेला दि.२७.०९.२००७ च्या अर्जाच्या अनुषंगानेच संबंधित सचिव दि.०५.०६.२००८ रोजी पाहिल्याचे स्पष्ट केलेले आहे.

या बाबीचा आपल्या कार्यालयाने इन्कार केलेला नाही. असे असताना अर्जदाराच्या दि.१०.०५.२००८ च्या अपीलाशी ज्या अधिकृत कागदपत्रांच्या आधारे संबंध जोडण्यात आलेला आहे त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती अर्जदारास पुरविण्याची नम्र विनंती आहे.

मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.१५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, सातारा यांचे दि.०५.०७.२००८ चे निकालपत्र पोस्टात कधी दाखल केले. दि.२७.०३.२००८ च्या जोडपत्र अ मधील अर्जास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. याबाबत जन माहिती अधिका-याकडून प्राप्त करण्यात आलेला लेखी अहवाल इत्यादी माहिती मागीतली आहे. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती पुरवावी.

## <u>आदेश</u>

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७०/०२**

**श्री.रामदास कैलास केंदळे**
**वाल्हेकरवाडी चिंचवडगाव,**
**पुणे ४११ ०३३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य व्यवस्थापकीय संचालक**
**लोक शाहीर अण्णाभाउ साठे विकास महामंडळ (मर्या)**
**मुंबई-बी-२२ कल्याण केंद्र अशोक वन, हनुमान टेकडी,**
**बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६.**

**जन माहिती अधिकारी,**
**लोक शाहीर अण्णाभाउ साठे विकास महामंडळ (मर्या)**
**मुंबई-बी-२२ कल्याण केंद्र अशोक वन, हनुमान टेकडी,**
**बोरीवली (पू), मुंबई ४०० ०६६.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.रामदास केंदळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०६.२००९ रोजी अर्ज करुन, लोकशाहीर अण्णाभाउ साठे विकास महामंडळ (मर्या.) कंपनी कायदा अधिनियम, १९५६ च्या तरतुदीनुसार दि.११ जुलै, १९८५ रोजी स्थापना झाली त्यावेळेसच्या स्थापना नियमावली व लाभार्थी योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रतेबाबत सविस्तर नियमावली इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागीतलेली माहिती विहित कालावधीत मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१३.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लोकशाहीर आण्णाभाउ साठे विकास महामंडळ (मर्या.) बाबत स्थापना नियमावली व लाभार्थी पात्रतेबाबतच्या नियमावली संबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पाठविली परंतू अपीलकाराने स्विकारली नाही असे जन माहिती अधिका-यांनी आयोगास सांगीतले. अपीलकार सुनावणीस अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६२/०२**

**श्री.सुरेश ज्ञा.सोळशे**
**१/६ श्रीरामकुंज को.ऑप.हौ.सो.,**
**दत्तवाडी कुळगाव, बदलापूर (पू),**
**जि.ठाणे.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप विभागीय अधिकारी**
**जुन्नर आंबगांव, राजगुरु नगर,**
**ता.राजगुरु नगर, जि.पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**आंबेगांव, ता.आंबेगांव,**
**जि.पुणे.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सुरेश सोळशे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०१.२००९ रोजी अर्ज करुन, श्री.सुरेश सोळशे व्दारा ज्ञानदेव मताजी सोळशे मौजे पोखरी, ता.आंबेगांव, जि.पुणे येथील खरेदी खताची नोंद होणे कामी दि.०८.०८.२००० अर्ज केला असता तहसिलदार यांनी आदेश होउन सुध्दा ७/१२ उत्ता-यावर नोंद झाली नाही. याबाबत का नोंद झाली नाही किंवा कसे बाबत माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१९.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, खरेदी खताची नोंद ७/१२ उता-यावर झाली नाही याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, खरेदी खताची ७/१२ उता-यावर नोंद का झाली नाही. याबाबत जन माहिती अधिका-यांनी चौकशी करावी. हे आदेश प्राप्त झाल्यापासून सदर प्रकरणी अपीलकारास १५ दिवसांचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८९/०२**

**श्रीमती. सुनिता पवार**
**३७७, नवी सदाशिव पेठ,**
**पुणे ४११ ०३०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.सुनिता पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०२.२००९ रोजी अर्ज करुन, नागरी जमिन (कमाल धारणा व विनियम) अधिनियम, १९७६ च्या कलम २० (१) अन्वये पारित केलेल्या क्र.युएलसी २२ (२००३)/४६३/नाजकधा-२, दि.३१.१२.२००३ च्या आदेशाची साक्षांकित प्रतीची मागणी केली होती. तसेच त्यासाठी सादर केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०३.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. उत्तरवादीने सदर सुनावणी विधानमंडळाच्या नागपूर येथील अधिवेशनाच्या कारणावरुन पुढे ढकलण्यास दि.०९.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास

विनंती केली आहे.  सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, क्र.युएलसी २२ (२००३)/४६३/नाजकधा-२, दि.३१.१२.२००३ च्या पत्राची साक्षांकित प्रतीची मागणी केली होती.  जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही.  सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही.  राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत दि.३१.१२.२००३ च्या पत्राची साक्षांकित प्रत अपीलकारास निशुल्करित्या पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६८/०२**

**श्री.संजय प.पाटील**
**मार्केटिंग विभाग, इंडियन एक्स्प्रेस वृत्तपत्र समूह,**
**एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट,**
**मुंबई ४०० ०२१.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गटविकास अधिकारी वर्ग-१,**
**पंचायत समिती कार्यालय, चंदगड**
**चंदगड, जि.कोल्हापूर.**

**जन माहिती अधिकारी,**
**गटविकास अधिकारी वर्ग-१,**
**पंचायत समिती कार्यालय, चंदगड**
**चंदगड, जि.कोल्हापूर.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.संजय पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०६.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०४.२००८ रोजी अर्ज करून, श्री.सतुराम सावंत यांनी मु.पो.कालकुंद्रा, ता.चंदगडच्या हद्दीतील कितवाड सस्त्यावर बांधलेले घर अधिकृत असल्यास त्याबाबतची साक्षांकित माहिती, बांधलेले घर नियमाचे उल्लघंन करित असल्यास त्याची माहिती घेतलेली जागा नियम डावलून घेतली असल्यास त्यावर काही कारवाई करण्यात आली असल्यास त्याची माहिती, घेतलेली जागा नियम शर्तीचा भंग करणारी नसल्यास त्याबाबतची माहिती. कालकुंद्री गावात जिल्हाधिकारी यांच्या परवानगीने किती जमिनी हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी यांच्या परवानगी शिवाय गावठाणातील जमिनी हस्तांतरित झाल्या असल्यास त्यांची घेण्या-या / देणा-यांची नावे सर्व्हे क्र.गावठाण जागा/परसू जागा क्रमांक याची माहिती इत्यादी अनुषंगीक एकूण २१ मुद्यावर माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी माहिती आणली होती. परंतू अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास पोस्टातून निशुल्करित्या माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८७/०२**

**सचिव,**
**सोनामाता समाज सेवा संघ, सोलापूर,**
**१५, मेडिकल को.ऑप, हौ. सोसा.,**
**टिळक नगर, विजापूर रोड,**
**सोलापूर ०४. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य,**
**क्रिडा व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य,**
**क्रिडा व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार सचिव, सोनामाता समाज सेवा संघ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.१२.२००८ रोजी अर्ज करुन, नोंदणी प्रमाणपत्र व अचानकपणे, अधिनियमबाहयपणे, बेकायदेशिरपणे रोखलेले अनुदान सुरु होउन मिळणेकामी सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केलेले अपील. मा.मंत्री, सामाजिक न्याय श्री.चंद्रकांतजी हंडोरे व अन्य अधिका-यांच्या उपस्थितीत दि.०८.११.२००६ रोजी सुनावणी झाली. सदर सुनावणीचा निर्णय मिळावा. रोखलेले अनुदान सुरु होउन मिळावे. यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेले विनंती अर्ज, Secretary Submitte file असे शेरे दिले आहेत. सदर शे-याप्रमाणे सचिव, सामाजिक न्याय विभाग यांनी काय कार्यवाही केली. संबंधित फाईल मधील टिप्पणीच्या छायाप्रती, मा.मुख्यमंत्री महोदयांना फाईल सादर केली नसल्यास त्याचे प्रयोजन इत्यादि माहिती

मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१६.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, संस्थेचे अचानकरपणे बंध केलेले अनुदान सुरु करण्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. संस्थेचे बंद केलेले अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबत अपीलकाराची मागणी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८८/०२**

**श्री.प्रकाश स. माने**
**प्रतिविष व रक्तजल विभाग,**
**पिंपरी, पुणे १८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक**
**हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळ,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.**

**जन माहिती अधिकारी,**
**हाफकीन जीव-औषध निर्माण महामंडळ,**
**परळ, मुंबई ४०० ०१२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.प्रकाश माने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.११.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.आ.भा.कांबळे व श्री.एम.संजात्रा यांनी तबेला क्षेत्र सहा.वर्ग-क ची पदोन्नती नाकारल्यानंतर त्या ठीकाणी कार्यालयीन आदेश क्र.७३/२००६ दि.११.०४.२००६ नुसार जेष्ठतेनुसार कोणत्या कामगारांना पदोन्नती देण्यात आली. पदोन्नती देण्यात आली नसल्यास त्याची कारणे. अन्य दोन कोणत्या कामगाराची नावे जेष्ठता यादीमध्ये होती. महामंडळाने सन २००६ ची पदोन्नती न देता सन २००७ ची विभागीय पदोन्नतीची स्थापना कोणत्या निमयानुसार केली. श्री.शं.ना.शिंदे यांना पदोन्नती मिळणे आवश्यक होते ती का देण्यात आली नाही. पदोन्नतीबाबत कोणकोणते प्रश्न उपस्थित झाले होते. याबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाकडून कोणते अभिप्राय मिळाले. तबेला क्षेत्र वर्ग-ब ची पदोन्नती का थांबविण्यात आली इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.२९.०१.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास मुध्देनिहाय माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील

दाखल केले.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.  यामुळे व्यथित होउन अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, तबेला क्षेत्र सहाय्यक वर्ग क तसेच तबेला क्षेत्र सहाय्यक वर्ग ब बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.

बिंदू नामावलीचे आरक्षणानुसार श्री.एस.एन.शिंदे यांना सन २००७ मध्ये पदोन्नती मिळाली.  श्री.प्रकाश स.माने यांना आरक्षणांतर्गत पद उपलब्ध नसल्याने पदोन्नती देण्यात आली नाही.  परंतू त्याअनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग, मागासवर्गीय कक्ष १६ ब मंत्रालय, मुंबई यांच्याशी पत्रव्यवहार केलेला असून त्याबाबतचे उत्तर प्रतिक्षाधीन आहे, असे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक (प्रशासन) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मार्या. श्री.सचिनदेव वामनराव बोरकर यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास अद्यावत माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १४.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८०/०२**

**सौ.कलावली खरात**
**२२/१५५५, अभ्युदय नगर,**
**मुंबई ४०० ०३३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा,**
**जि.सातारा.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार सौ.कलावती खरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२००८ रोजी ब्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०६.२००८ रोजी अर्ज करुन, कार्यालयाच्या दि.०१.०४.१९८५ च्या क्र.सी.टी.एस/एच.एस.सी/एस.आर-५ च्या आदेशातील अट क्र.२५ प्रमाणे कार्यालयाचा प्रतिनिधी व महाराणी सईबाई भोसले सहकारी गृहनिर्माण संस्था लोणंद यांच्यामध्ये करण्यात आलेल्या कराराची प्रमाणित प्रत, कार्यालयाच्या अभिलेखातील नोंदीनुसार करारपत्रातील अटी व शर्तीचा भंग संस्थेने केलेला असल्यास त्या संबंधीची माहिती, शासनाने मंजूर केलेली जमिन, संस्थेने जमिन ताब्यात घेतली त्यासंबंधीचा दस्त निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावा इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१५.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे ब्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा व सईबाई भोसले सहकारी गृहनिर्माण संस्था लोणंद यांचेमध्ये करण्यात आलेल्या करारपत्राची प्रत मागीतली होती. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी दि.०१.०४.१९८५ च्या आदेशानुसार महाराणी सईबाई भोसले सहकारी गृहनिर्माण संस्था, लोणंद यांचेमध्ये करारपत्र करण्यात आले त्या करारपत्राची प्रत अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ११.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८११/०२**

**श्री.सुनील रा.गोरले**
**श्री.अविनाथ चौकरी,**
**कमरूद्दीन ले आउट,**
**गोरवाडा रोड, बेरगाव,**
**नागपूर ४४० १३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**(रचना व कार्यपध्दती)**
**मंत्रालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**(रचना व कार्यपध्दती)**
**मंत्रालय, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुनिल गोरले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेल्या विषयासंबंधीची माहिती मागीतली होती.

गेल्या २० ते २५ वर्षापासून रोजंदारीवर कार्यरत शासकीय दूध योजना, नागपूर येथील कामगारांना नियमित करण्याचा प्रश्न शासन दरबारी प्रलंबित असून गेल्या दहा वर्षापासून हया प्रश्नाबाबत विधानसभा, विधान परिषदेत चर्चा होत आहे व कामगारांना नियमित करण्याचे आश्वासने देण्यात येतात. मान्यवर सभापती महोदयांनी सुध्दा याबाबत दखल घेतलेली आहे. या अनुषंगाने नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात दि.२७.१२.२००८ रोजी विधान परिषदेत मा.श्री.अरविंद सावंत व मा.श्री.किरण पावसकर यांचे लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मोठी चर्चा

घडून आली व त्यात मा.मंत्रीमहोदय दूग्धविकास विभाग यांनी कर्मचा-यांना दोन महीन्यात नियमित करण्याचे आश्वासन दिले व तसे पत्र सुध्दा उपोषणकर्त्या कर्मचा-यांना दिले. तशीच पत्रे विभाग प्रमुख्र यांनी सुध्दा दिलेली आहे. याबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागीतली होती.

माहिती अधिकारात मागणी केलेली माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.२२.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाख्रल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१०.०८.२००९ रोजी मुध्देनिहाय माहिती दिली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती अप्राप्तच्या करणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाख्रल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विधान परिषदेत दि.२७.१२.२००८ रोजी मा.श्री.अरविंद सावंत, श्री.किरण पावसकर, वि.प.स.यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात शासकीय दूध योजनेतील रोजंदारी कार्यरत कामगारांना नियमित करण्याबाबत मांडलेल्या लक्षवेधी सूचनासंबंधी अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मुध्देनिहाय सविस्तर माहिती दि.१०.०८.२००९ च्या आदेशान्वये (सुनावणी न आयोजित करता) अपीलकारास पुरविली आहे. अपीलकाराने दि.१३.०४.२००९ च्या पत्रान्वये माहिती मागीतली होती. तीन महिन्याहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतर विलंबाने अपीलकारास माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची सदर कृती निश्चितच योग्य नाही. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती

कारवाई करण्याची जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे. सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०७.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८८६/०२**

**श्रीमती.अनुराधा सुरेश तोरे**
**कृष्णलिला टेरेस, अे., विंग प्लॉट नं.१५,**
**स.न.५४/६ कोथरूड, महात्मा सोसा. जवळ,**
**पुणे ४११ ०३८. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उपसहाय्यक पोलीय महानिरीक्षक**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्रीमती.अनुराधा तोरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०५.२००९ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने प्रमुख लिपीक पदाची नियमित पदोन्नती नाकारल्यामुळे अपीलकारास कालबध्द पदोन्नती देय नाही असे जा.क्र.पोमसं/८/१५५४/काप/प्रलि, दि.१०.०८.१९९९ पत्रानुसार कळविले याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०६.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१३.०३.२००९ च्या पत्रान्वये अर्जातील मुध्दा क्र.५ बाबतची माहिती नाकारली. अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रमुख्र लिपीक पदावरील पदोन्नती अपीलकाराने नाकारली असल्याने कालबध्द पदोन्नती अपीलकारास देय नसल्याचे कार्यालयाने अपीलकारास दि.१०.०८.२००९ च्या पत्रान्वये कळविले. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.०६.२००८, १३.०८.२००८, २७.०१.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर केला. अपीलकार हया आता सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांच्या सेवाविषयक प्रकरणी योग्य तो निर्णय घेण्यासाठी कार्यालयाने दि.११.०८.२००९ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रकरणी स्मरणपत्र पाठवून शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचेही प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी लेखी अहवालात खुलासा केला आहे. यावरुन सदर प्रकरणी प्रस्ताव गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रलंबित आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर वस्तुस्थिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास कळवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८१९/०२**

**श्री.विश्वनाथ गं. खांडेकर**
**प्लॉट नं.११ बी जोशी वाडी,**
**कुकडे ले आउट,**
**मैनाप्पाई हायस्कुल समोर,**
**नागपूर २७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतूक)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मध्यवर्ती अपिलीय, महाराष्ट्र वाहतुक भवन,**
**डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय नियंत्रक / (प्रशासन)**
**उपमहाव्यवस्थापक (चालन)**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मध्यवर्ती अपिलीय, महाराष्ट्र वाहतुक भवन,**
**डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.विश्वनाथ खांडेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०४.२००९ रोजी अर्ज करून, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

दि.०३.०७.२००८ ला अमरनाथ प्रकरणी नागपूर बंद होते. या दिवशी शहर बस सेवा पूर्ण पणे बंद होती. या तारखेला रेगुलर/रोज गट-२ चालक-वाहक आपल्या नियोजित कामावर / स्पेअर वर हजर झालेत. बंद मुळे शेडयुलच न निघाल्यामुळे कोणलाही कामगिरीवर पाठविले नाही. कामगार करारानुसार त्या तारखेचा रेगुलर चालक वाहकांना स्पेअर (हजेरी) मिळाला पण

रोज. गट-२ चालक वाहकांना अजुन पावेतो (स्पेअर) हजेरी मिळालेली नाही करीता विषयांकित माहिती देणेबाबत.

अपीलकाराने नागपूर विभागातील रोंजदार गट-२ चालक-वाहकाबाबत माहिती मागीतली आहे असे वाटते. सबब अपीलकाराच्या अर्जाची प्रत विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, नागपूर विभाग यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असल्याचे कळवून सदर प्रकरणी विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, नागपूर या कार्यालयाकडे संपर्क साधावा असे जन माहिती अधिका-यांनी दि.२७.०५.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने, माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, रोंजदारी गट-२ चालक-वाहकाची डयुटी बुक केलेली नसेल पण त्यांना स्पेअरमध्ये कामगिरीवर बोलाविले असेल अशा वेळी त्यांनी कामगिरीवर हजर राहूनही काही कारणास्तव कामगिरी दिली नाही तर त्यांना त्या दिवसाची हजेरी देता येते किंवा नाही याबाबत माहिती मागीतली होती. कार्यालयातील कागदपत्रावर उपलब्ध असलेली माहिती दि.२७.०५.२००९ च्या पत्रानुसार पाठविली. दि.१६.१०.१९९९ रोजी मान्यता प्राप्त संघटनेबरोबर १९९६ ते २००० या कालावधीकरिता झालेल्या करारातील कलम क्र.५ च्या अनुषंगाने तसेच वाहतूक खात्यातर्फे प्रसारित केलेल्या परिपत्रक राप/वाह/माअ/१००२, दि.१३.०२.२००९ अन्वये

रोजंदार गट-२ वरील कामगारांना कामगिरीवर बोलविल्यानंतर त्याने सदर कामगिरीवर हजर राहूनही त्यास कामगिरी दिली नाही, तर त्याची त्या दिवसाची हजेरी लावण्यात यावी अशा स्पष्ट सूचना आलेल्या आहेत असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२४.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविलेले आहे. यावरुन कार्यालयीन अभिलेखावरील माहिती अपीलकारास कळविण्यात आली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०७.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८१८/०२**

**श्री.अनिल बा. कांबळे**
**उपसंचालक,**
**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,**
**६ वा मजला, उद्योग भवन,**
**सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग (कामगार)**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अनिल कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

उपसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य तसेच सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या पदावर विभागीय पदोन्नतीने मिळालेल्या व नियमित झालेल्या व सद्या कार्यरत असलेल्या अधिका-यांची नावे व संस्था, तसेच सदर बाबतीत अनुसचित जाती संवर्गातील अधिका-यांची संख्या, उपसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य तसेच सहसंवालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य नामनिर्देशाने नियुक्ती झालेल्या व नियमित झालेल्या व सद्या कार्यरत असलेल्या अधिका-यांची नावे व संख्या, तसेच सदर बाबतीत अनुसूचित जाती संवर्गातील अधिका-यांची संख्या इत्यादी अनुषंगीक एकूण ७ मुद्यावर माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.०५.०५.२००९ रोजी

प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, उपसंचालक/सहसंचालक औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या पदावरील नामनिर्देशनाने / पदोन्नतीने नियुक्ती झालेल्या अधिका-याबाबत अनुषंगिक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबाजवणी करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती देण्यात येईल असे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.बा.शि.वानखेडे यांनी आश्वासन दिले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०७.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८७१/०२**

**श्री.चांगदेव नारायण बनकर**
**विमल विहार बी.४/१२,**
**बिबवेवाडी पुणे ४११ ०३७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मुख्य सचिव कार्यालय, महाराष्ट्र राज्य,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मुख्य सचिव कार्यालय, महाराष्ट्र राज्य,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा.मुख्यमंत्री कार्यालय,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.चांगदेव बनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०७.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०४.२००६ रोजी अर्ज करुन, कृषी संघ या समितीवर सदस्य म्हणून अपीलकाराची नेमणूक होण्यासाठी अपीलकाराने दि.२२.०९.२००५ रोजी पोच देय डाकेने विनंती अर्ज केला होता. कोणत्या अधिका-याने टिप्पणी लिहून अपीलकाराचा अर्ज निर्णयासाठी मा.मुख्यमंत्री महोदयासमोर ठेवला त्या टिप्पणीच्या छायाप्रती, अर्जावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी काय शेरा, अभिप्राय अंतीम निर्णय कोणत्या तारखेस घेतला याबाबतची माहिती, संबंधीत कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने मा.मुख्य सचिव कार्यालयाकडे दि.२५.०५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी अपीलकाराने मुख्यमंत्री कार्यालयातील प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे प्रथम अपील दाखल

करणे आवश्यक होते.  माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते.  सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कृषी संघ समितीच्या सदस्य पदावर नेमणूक करावी म्हणून अपीलकाराने मुख्यमंत्री कार्यालयाकडे पोच देय डाकेने अर्ज सादर केला होता.  सदर अर्जावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले शेरे याबाबतची माहिती, तसेच अपीलकाराचा विनंती अर्ज ज्या विभागात पाठविला त्या ठीकाणी जे जे शेरे, अभिप्राय टिप्पणी व अंतिम निर्णय झाला त्या त्या कार्यालयीन पत्रव्यवहाराच्या साक्षांकित छायाप्रतीची मागणी केली होती.  या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास हे आदेश प्राप्त झ्ााल्यापासून १५ दिवसाचे आत उचित उत्तर पाठवावे.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३७७२/०२**

**श्री.हमिद माणिक शेख**
**रा.सं.न.३०/७/२ घ.नं.२८०,**
**कृष्णा पवन सोसायटी समोर,**
**आंबेगाव ता.हवेली, जि.पुणे. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय आयुक्त**
**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे १.**

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी पुणे, जि.पुणे. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.हमिद शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांची पेन्शन संबंधातील सर्व कामे किती दिवसात पूर्ण करण्याची असतात.
२. संबंधीत मुदतीत कार्यालय प्रमुखाने वरील मुदतीमध्ये पेन्शन संबंधीतील सर्व कामे पूर्ण न केल्यास त्यावर माहिती कायद्याअंतर्गत काय कारवाई करण्यात येते व त्या कार्यवाहीची पध्दत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०१.०४.२००९ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती चुकीची असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१७.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.११.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, स्वेच्छानिवृत्त शासकीय कर्मचा-यांची पेन्शन किती कालावधीत मंजूर होते याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०१.०४.२००९ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसते. तसेच सदर प्रकरणी माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ११.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

**अपील क्र.२००९/३८१३/०२**

**श्री.अशोक ग. खडसे**
**गिताई नगर, गोपूरी, साटोने लेआउट,**
**नागपूर रोड, वर्धा, ता.जि.वर्धा. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.अशोक खडसे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.०४.२००९ रोजी अर्ज करुन, खालीलप्रमाणे माहिती मागीतली होती.

मा.श्री.सिध्दरामजी मेहत्रे, गृहराज्यमंत्री असतांना त्यांचे कार्यकाळात एका पोलीस इन्स्पेक्टरचे अपील प्रकरणात मंत्री महोदयांनी नोंदविलेले मत तसेच अधिका-यांनी नोंदविलेले मत त्यांच्या नस्तीमधील माहिती दयावी. तसेच सदर इन्स्पेक्टरचे प्रकरणात विधानसभा विरोधी सदस्य किंवा उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यांत येवुन सदर अपीलामध्ये झालेल्या कारवाईची प्रत. उच्च न्यायालयाच्या रिट याचीकेची प्रत द्यावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०४.०५.२००९ च्या पत्रान्वये असे कळविले की, कोणत्या इन्स्पेक्टरची माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. यामुळे माहिती देणे शक्य नाही. न्यायालीन प्रकरणाची माहिती संबंधीताशी, संबंधीत असल्याने माहिती देउ शकत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे दि.१२.०६.२००९ रोजी प्रथम

अपील दाखल केले.  माहिती अधिका-याने अपीलकारास दि.२०.०४.२००९ च्या पत्रान्वये यशोचित उत्तर दिले.  असल्याचे नमुद करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२५.०६.२००९ रोजी आदेश निर्गमित करुन अपील फेटाळले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, पोलीस इन्स्पेक्टरच्या अपील प्रकरणाबाबत मा.मंत्री महोदयांनी नोंदविलेले मत, उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात येउन सदर अपीलामध्ये झालेल्या कारवाईची प्रत इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती.  सदर प्रकरणाबाबत विधानसभा/उच्च न्यायालयाने कार्यवाही केली आहे किंवा कसे याबाबत काही बोध होत नाही. असे अपीलकारास उत्तर दिले आहे.  सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती संदिग्ध स्वरुपाची असल्याचे दिसून येते.  यावरुन जन माहिती अधिका-यांनी अर्जावर समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०७.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८१७/०२**

**श्री. प्रमोदकुमार ह अग्रवाल**
**मनोहर चौक, पोलीस लेन समोर,**
**गोंदिया ४४१ ८०१.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा वित्तीय सल्लागार व उपसचिव,**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**महाराष्ट्र शासन,**
**४२, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,**
**मुंबई ४०० ०२०.**

**जन माहिती अधिकारी,**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**महाराष्ट्र शासन,**
**४२, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,**
**मुंबई ४०० ०२०.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.प्रमोदकुमार अग्रवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.०५.२००९ रोजी अर्ज करुन, धानाची कस्टम मिलिंग व वाहतुकीचे प्रदानाबाबत धानानुसार, एजन्सीनुसार परिमाणानुसार, अंतरानुसार अपीलकाराने आदा केले त्याबाबतच्या प्रपत्राची प्रत तसेच यासाठी अपीलकाराने केलेला खर्च याबाबतची सन २००४-०५ ते २००७-०८ या कालावधीची माहिती अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागीतलेल्या माहितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य को.ऑप.मार्केटिंग फेडरेशन, मुंबई व महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ नाशिक यांचे स्तरावर मुळ अभिलेख ठेवतात. यामुळे सदर माहिती त्यांचेकडून घेण्यात यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१६.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित केली नाही.  माहिती दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, धानाची कस्टम मिलिंग व वाहतुकीचे प्रदानाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  अपीलकाराच्या अर्जातील मुध्दा क्र.१ बाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षक विभागाने अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.  अर्जातील मुद्याबाबत अपीलकारास जन माहिती अधिकारी यांनी दि.२०.०६.२००९ च्या पत्रान्वये समर्पक उत्तर दिले आहे.  त्यानुसार अपीलकाराने संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून आवश्यकती माहिती प्राप्त करुन द्यावी.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०७.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८९०/०२**

**श्री.शहिद रझा बुरने**
**डी/३, अमर क्लासीक,**
**हडपसर, पुणे ४११ ०२८.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ०३९.**

**जन माहिती अधिकारी,**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ०३९.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.शहिद बुरने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०६.२००८ रोजी अर्ज करुन, उच्चश्रेणी लघुलेखकाची / स्विय सहाय्यकाची एकाच ठीकाणी किती कालावधीकरिता नेमणूक करण्यात येते. उच्चश्रेणी लघुलेखक श्री.राजेंद्र घाडगे यांना IGP कोल्हापूर यांचे PA म्हणून १८ वर्षे पूर्ण झाले आहेत. तरी अद्याप त्यांची बदली करण्यात आली नाही. कोणत्या नियमानुसार श्री.घाडगे हे एकाच ठीकाणी कार्यरत आहे. त्याचप्रमाणे उच्चश्रेणी लघुलेखक श्री.सी.एस.तांबोलकर यांचाही एकाच ठीकाणी अधिक कालावधी झाला आहे. याबाबत अपीलकाराने एकूण ६ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.०६.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती पुरविण्यात आली. दिशाभूल करणारी खोटी अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.११.०७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल

केले.  जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.०२.०९.२००८ रोजी आदेश पारित केले व प्रथम अपील फेटाळ्ले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते.  सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, उच्चश्रेणी लघुलेखकास एकाच ठिकाणी किती कालावधीकरिता ठेवण्यात येते.  Home District मध्ये दोन वेळा कशी पदस्थापना करण्यात येते.  याबाबत एकूण ६ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिका-यांनी दि.१२.०६.२००८ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती अपीलकारास पुरविली असल्याचा लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले.  जन माहिती अधिका-यांनी सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याचे दिसते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३५७०/०२**

**श्री.रमेश बा. पटेल**
**रूम नं.१०, दुसरा मजला,**
**विजय अपार्टमेंट को.ऑप.हौ.सो.विराट नगर,**
**पी.पी.मार्ग, विराट मित्र मंडळ कार्यालय समोर,**
**विरार (प) ता.वसई, जि.ठाणे ४०१ ३०३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक (पणन)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (पणन)**
**मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ,**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.रमेश पटेल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. दि.१९.०५.२००९ रोजी बांद्रा येथील रंगशारदा सभागृहात काढण्यात आलेली सोडत मध्ये अल्पगट उत्पन्न, मध्य गट उत्पन्न, उच्च गट उत्पन्न यांच्या योजना कोड क्रमांक मधील सर्व अनुसूचित जामाती (ST) आरक्षण गटामधील प्रतिक्षाधीन उमेदवार आणि यशस्वी लाभाथी उमेदवारांची योजना कोड क्रमांक २१६ संपूर्ण नावे आणि पत्रे यांची माहिती मिळावी.

२. योजना कोड क्रमांक २२५ मध्ये अनुसुचित जमाती (ST) यशस्वी लाभार्थी उमेदवारांच्या अर्जाचा नमूनाची (Application Form) झेरॉक्स प्रत मिळावी.

३. संदर्भाधीन यशस्वी उमेदवाराकडून त्यांची पात्रता निश्चित करण्यासाठी कागदपत्र पुरावे आपल्या कार्यालयाकडून केव्हा मागविले जाईल.

४. योजना कोड क्र.२२५ अनु.जमाती (ST) यशस्वी लाभार्थी उमेदवार यांच्याकडून त्यांच्या पात्रता निश्चित करण्यासाठी आपल्या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या पत्राची सत्य प्रत पाठवावी. अधिक माहितीसाठी अपीलकाराचे दि.२२.०५.२००९ चे अर्ज पहावे.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०६.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. माहिती अधिका-यांनी दिशाभूल करणारी विसंगत माहिती पुरविली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.०६.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३०.०७.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. अपूरी माहिती मिळाली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, दि.१९.०५.२००९ रोजी बांद्रा येथील रंगशारदा सभागृहात काढण्यात आलेल्या सदनिकेच्या सोडंतीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विसंगत माहिती दिली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपूरी माहिती दिली

असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे उपलब्ध माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १६.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३३/०२**

**श्री.लोहार शंकरलिंग अर्जुन**
**शासकीय औद्योगिक प्रशिक्षक संस्था,**
**विजापूर रोड, सोलापूर ४१३ ००४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, टपाल पेटी व**
**क्रमांक १००६३६, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सह संचालक,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, टपाल पेटी व**
**क्रमांक १००६३६, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.लोहर शंकरलिंग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.११.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. कर्मचा-यास न्याय हक्कासाठी खात्याअंतर्गत अपील अर्ज करण्यासाठी विहीत पध्दतची माहिती मिळावी किंवा शासन निर्णय/ परीपत्रक मिळावे.
२. वरील मुध्दा क्र. १ ला अनुसरुन तशी तरतूद नसल्यास कोणाकडे दाद मागावी यांची माहिती माहिती द्यावी किंवा शा.निर्णय / परीपत्रक मिळावे.
३. ०८ मार्च, १९९९ च्या शासन निर्णयान्वये टेम्परारी कर्मचा-यांना नियमित करणेकामी मा.संचालक यांचे पत्र क्र.०८/स्थायी/अस्थायी/१०९७/७८९ दि.१२.०३.१९९९ व इतर पत्रानुसार पुणे विभागाकडून मागितलेल्या माहितीची प्रत मिळावी. (अस्थायी कर्मचा-यांच्या सहीसह).

४. पुणे विभागात ०८ मार्च, १९९९ नुसार नियमित केलेल्या कर्मचा-यांची यादी मिळाली यामध्ये मागासर्वीय किती व ओपन किती याचीही माहिती मिळावी.

अपीलकारास विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.१४.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती सहसंचालक, व्यवसाय शिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांचेशी संबंधीत असून सदर माहिती उक्त कार्यालयाकडून प्राप्त करुन घ्यावी असे सूचविले होते. सदर सूचना अपीलकाराने मान्य केली असल्यामुळे अपीलकाराचे प्रथम अपील दप्तरी दाखल करण्यात येत असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.३१.०१.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. अपीलकारास उपलब्ध करुन देणेबाबत अपिलीय प्राधिकारी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांना दि.०२.०३.२००९ च्या पत्रान्वये उपसंचालक तथा अपिलीय प्राधिकारी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविली. सूचनेप्रमाणे माहिती मिळाली नसल्याच्या करणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालयाच्या पुणे विभागातील नियमित केलेल्या १०७१ कर्मचा-यांची (मागासवर्गीस किती, खुल्या प्रवर्गातील किती) यादी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९२४/०२**

**श्री.सुनील बावधनकर**
**चोपडे एजन्सजी व कन्सल्टसीज,**
**हिरामण लांडे बिल्डींग,**
**मुंबई पुणे रोड, कासारवाडी, पुणे ३४. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सुनील बावधनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईचा तपशिलात्मक अहवाल लेखी स्वरुपात मिळावा. कारवाई दरम्याने संबंधीत घटकांना काढलेल्या नोटीसा त्यांचे घेतलेले जबजबाब, झालेल पंचानामा, कायदेशिर कारवाईच्या छायाकिंत प्रती, पिढीत घटकांना दिलेला न्याय निर्णय आणि दोषीवर झालेली दंडात्मक कारवाईच्या छायाप्रती मिळाव्यात. कर्तव्य अधिकार आणि शासनाकडून मिळाणारे वेतन व इतर भत्यांची तपशिलवार माहिती मागीतली होती. कारवाई दरम्यान संबंधीत पिडीतापैकी कोणचा मृत्यू अथवा आत्महत्या घडली असल्यास त्याची तपशिलवार लेखी माहिती मागितली होती. योग्य संपूर्ण माहितीसाठी अपीलकाराने दि.१६.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. महाराष्ट्र औद्योगि विकास महामंडळाचे वसाहतीसाठी पुन्हा टप्पा क्र.२ करिता १००० एकर जमिन संपादन करण्याकरिता संबंधीत शेतक-यांना नोटीसा देण्यात आल्या आहेत. यासंबंधीची कागदपत्र उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग वाई यांच्याकडे उपलब्ध नाहीत असे उपविभागीय अधिका-यांनी सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. महाराष्ट्र औद्योगि विकास महामंडळाच्या वासाहतीसाठी (टप्पा क्र.२) जमिन संपादन करु नये अशी ग्रामस्थांची सर्वसाधारण मागणी आहे. जिल्हयात औद्योगिकरण होणे महत्वाचे आहे. तथापि त्याकरिता कोणाही शेतक-यावर अन्याय करुन जमीनी संपादन केल्या जाणार नाहीत असे जिल्हाधिका-यांनी दि.२८.११.२००८ च्या ग्रामस्थांच्या बैठकीत सांगीतले आहे. यासंबंधी चर्चा करुन अपीलकारास माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरविण्यात यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३२/०२**

**श्री. सिताराम चिमाजी थोरात**
**श्री ऐ-३-८, रेणूका को.ऑप.हौ.सोसा.,**
**चिंतामणी नगर नं.१,**
**बिववेवाडी, पुणे ४११ ०३७. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,**
**प्रकाशगड, ४ था मजला, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,**
**प्रकाशगड, ४ था मजला, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अपीलकार श्री.सिताराम थोरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०१.२००८ रोजी अर्ज करुन, अपीलकाराची आई श्रीमती. लक्ष्मीबाई चीमाजी थोरात, चांदोली (बु.) ता.आंबेगांव, जि.पुणे यांना उस जळीत प्रकरणी रु.४५, ०००/- नुकसान भरपाई देणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१०.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या उस शेतात दि.२४.११.२००७ रोजी दुपारी १.०० वाजता महाराष्ट्र राज्य विज वितरित कंपनीच्या विजेची तार तुटुन शॉर्टसर्कीट झाल्याने आग लागून उस जळीत झाला. प्रकरणी पंचनामा करुन अर्ज ०४.१२.२००७ रोजी कार्यकारी अभियंता मंचर यांचेकडे पंचनामा ७/१२ उतारा व प्रतिज्ञापत्र आणि विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे जळीत उस वजन पावती अर्ज यासहीत सादर केला. या संदर्भात अर्जामधील त्रुटीबाबत अर्जदारास दि.१८.०९.२००८ च्या पत्रान्वये विचारणा केली होती. तथापि त्याची नियमनुसार वेळेत करण्यात आली नाही. अर्जदार त्रुटीची पुर्तता करु न शकल्याने हे उस जळीत नुकसान भरपाई प्रकरण मार्गी लागले नाही असे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास दि.११.१२.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. उस जळीत भरपाईचा दावा अर्जदाराकडून कागदपत्राची पूर्तता न झाल्याने प्रलंबित आहे असे अपीलकारास कळविले आहे. सदर पत्राची प्रत आयोगास उत्तरवादीने सादर केली व प्रकरण बंद करण्यात यावे अशी आयोगास विनंती केली. उत्तरदवादीची विनंती मान्य करण्यात येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १६.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३१/०२**

**श्री. सुरेश प्र.शिंदे**
**प्लॉट नं.३१, वायरलेस कॉलनी,**
**औंध, पुणे ४११ ००७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**जिल्हाधिकारी रायगड,**
**पो.अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.**

**जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय अलिबाग,**
**ता.अलिबाग, जि.रायगड.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अपीलकार श्री.सुरेश शिंदे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.१०.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.१२.२००६ रोजी अर्ज करुन, ज्ञानेश्वर तुकाराम जाधव यांचे अपघाती निधनाबदल चौकशी करुन मृत्यू प्रमाणपत्र दुरुस्त करण्याबाबत, श्री सुरेश शिंदे यांनी दि.२६.०६.२००६ रोजी दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागीतली होती. माहिती विहित कालावधीत मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.२०.०३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कै.ज्ञानेश्वर अर्ज उर्फ आत्माराम तुकाराम जाधव ऐवती कै.ज्ञानेश्वर तुकाराम जाधव अशी मृत्यू प्रमाणपत्रात दुरुस्ती करण्याबाबत अपीलकाराने मागणी केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी पत्र क्र.आस्था/कात-१/माअ/२००७, दि.१६.०४.२००७ अन्वये अर्जदार यांना जन्म मृत्यू नोंदवहीत एए.आस.२९३/९९ कडे नोंद दिसत असल्याचे कळविले. जन्म मृत्यू नोंदवहयामधील नोंदीमध्ये दुरुस्ती करणे अथवा नोंदी रद्द करण्याचे अधिकार निबंधक, जन्म व मृत्यू यांना आहेत. दाखल्यात दुरुस्तीबाबतची कार्यवाही संबंधीत निबंधक जन्म व मृत्यू म्हणजेच ग्राम विकास अधिकारी, गट ग्रामपंचायत थळ, ता.अलिबाग जि.रायगडे यांना करणे अपेक्षित असल्याचे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार अलिबाग यांनी आयेगास सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी कारवाई करणे अपेक्षित आहे असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

## आदेश

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९२३/०२**

**श्री. सुनिलकुमार बावधनकर,**
**चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टीज,**
**हिरामण लांडे बिल्डींग, मुंबई पुणे रोड,**
**कासारवाडी पुणे - ३४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव,**
**राज्यपाल यांचे कार्यालय,**
**राजभवन, महाराष्ट्र,**
**मलबार हिल, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**राज्यपाल यांचे कार्यालय,**
**राजभवन, महाराष्ट्र,**
**मलबार हिल, मुंबइ.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सुनिल बावधनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९/७/२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६/४/२००८ रोजी अर्ज करुन, दि. ७/४/२००८ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची तपशिलात्मक लेखी स्वरुपात अहवाल द्यावा. कारवाई दरम्यान संबंधीत घटकांना काढलेल्या नोटीसा, त्यांचे घेतलेले जाबजबाब, झालेला पंचनामा, कायदेशीर कारवाईच्या छायाप्रती, पिढीत घटकांना दिलेला न्याय निर्णय आणि दोषीवर झालेली दंडात्मक कारवाईच्या छायाप्रती, अधिकाऱ्यांची कर्तव्य शासनाकडून मिळणाऱ्या भत्त्यांची माहिती, संबंधीत पिडीतांपैकी मृत्यू अथवा आत्महत्या घडली असल्यास त्याची तपशिलवार माहिती लेखी स्वरुपात मिळावी अशी मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांना दिलेले अधिकार व कर्तव्य दर्शविणारी सूची तसेच त्यांचे वेतन व इतर भत्ते याबाबतची माहिती अपीलकारास दि. ७/५/२००८ च्या पत्रान्वये पुरविली. अपीलकाराचे

दि. ७/४/२००८ चे पत्र कार्यालयाची कॉम्प्लीमेंट्री स्लिप क्र. ०३/०८/एम/१३३८ दि. २१/४/२००८ रोजी सचिव कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले असल्याचेही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि. १६/५/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. १६/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचा विषय कृषी व पदुम विभागाशी संबंधीत असल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) अनुसार अपीलकाराचा अर्ज संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केला आहे. यावरुन जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जावर नियमानुसार समर्पक कार्यवाही केली असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३८/०२**

**श्री. महेंद्र कृष्णराव शितोळे,**
**बी-१६, गंगालहरी सहकारी**
**गृहनिर्माण सोसायटी,**
**समर्थ पथ, प्रतिज्ञा हॉलच्या मागे,**
**कर्वेनगर, पुणे ४११ ०५२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वित्त विभाग, कोषा (प्र-२),**
**मंत्रालय, मुंबई - ३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वित्त विभाग, कोषा (प्र-२),**
**मंत्रालय, मुंबई - ३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. महेंद्र शितोळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६/१०/२००७ रोजी अर्ज करुन, सन २००२, २००६ व २००७ वा त्या दरम्यान संचालक, लेखा व कोषागारे पदावर बदलीने नियुक्तीचा प्रस्ताव व त्याबाबतचया टिपण्या याची माहिती मागविली होती. सन एप्रिल मे २००६ मध्ये वा त्या दरम्यान संचालक, लेखा व कोषागारे या पदावर बदलीने नियुक्तीचा प्रस्ताव, सन सप्टेंबर ऑक्टोबर २००७ वा त्या दरम्यान संचालक, लेखा व कोषागारे या पदावर बदलीने नियुक्तीचा प्रस्ताव याबाबतच्या टिपण्यांच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि. २४/४/२००८ च्या पत्रानुसार उपलब्ध करुन दिल्या. सदर प्रकरणी मे २००२ मधील वा त्या दरम्यान संचालक, लेखा व कोषागारे या पदावर बदलीने नियुक्ती केलेल्या प्रस्तावासंदर्भातील नस्ती उपलब्ध झाली नसल्याने देता येत नसल्याचे अपीलकारास दि. २४/४/२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. मे २००२ शी संबंधीत नस्ती

उपलब्ध होताच आवश्यक माहिती अपीलकारास पुरविण्याबाबत सूचना दिल्याचे दि. १५/५/२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. त्यानंतर अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. १६/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, संचालक, लेखा व कोषागारे पदावर बदलीने नियुक्तीच्या प्रस्तावाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास सन २००६ व २००७ मधील आवश्यक ती माहिती अपीलकारास पुरविली आहे. सन २००२ मधील संबंधीत नस्तीचा कसून शोध घेतला असता नस्ती उपलब्ध झाली नाही. यामुळे सन २००२ शी संबंधीत माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देता आली नसल्याचे जन माहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकारास कळविले आहे. यावरुन अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी आवश्यक ती कार्यवाही केली असल्याने प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि. १५/५/२००८ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तरात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९३०/०२**

**श्री. शिवशंकर वि.घोलप**
**मु.महागांव, पो.बावी, ता.बार्शी,**
**जि.सोलापूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामान्य प्रशासन विभाग, कार्या-१८,**
**मंत्रालय, मुंबई - ३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामान्य प्रशासन विभाग, कार्या-१८,**
**मंत्रालय, मुंबई - ३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**शालेय शिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**आदिवासी विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई - ३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. शिवशंकर घोलप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. शासकीय कागदपत्रे जतन करणे आणि नष्ट करणे याकरिता कागदपत्रांचे वर्गीकरण ज्या संहितेच्या आधारे किंवा ज्या शासननिर्णयाच्या आधारे करण्यात येते त्यांची पहिल्या पानापासून शेवटच्य पानापर्यंत झेरॉक्स सत्यप्रत.

२. शासनमान्य असून नियमित अनुसार प्राप्त असलेल्या शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हजेरीपत्रकाचे वर्गीकरण कोणत्या वर्गात करण्यात येते त्याची माहिती द्यावी.

३. आश्रम शाळा हस्तांतरण प्रस्ताव कोणत्या वर्गीकरणात येतात ती माहिती द्यावी.

शासन परिपत्रकाच्या प्रतीसाठी एकूण रु.३०/- (टपालखर्चासह) शुल्क भरल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. उर्वरित मुध्दे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकाराच्या अर्जाच्या प्रती सर्व संबंधीत विभागाकडे पुढील आवश्यक कारवाईकरिता पाठविण्यात येत असल्याचे अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.३०.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२३.०४.२००९ च्या पत्रान्वये समर्पक उत्तर देउन दि.२५.११.१९५९, २१.०७.१९७६, २३.११.२०००, ०८.०१.२००८ च्या शासन परिपत्रक/शासन निर्णयाच्या प्रती अपीलकारास उपलब्ध करुन दिल्या असल्याचे नमुद करुन अपील अर्ज निकालात काढण्यात येत असल्याचे दि.१२ मे, २००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. १६/१२/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, १. शासन मान्य नियमित अनुदानीत शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर

यांच्या हजेरीपत्रकाचे वर्गीकरण कोणत्या वर्गात करण्यात येते. २. आश्रमशाळा हस्तांतरण प्रस्ताव कोणत्या वर्गीकरणात येतात. ३. शासकीय कागदपत्रे जतन करणे / नष्ट करणे याबाबतचे शासन निर्णय / परिपत्रकाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास, शासकीय कागदपत्रे जतन करणे / नष्ट करणे याबाबातच्या शासन निर्णय परिपत्रकाच्या प्रती दि.२३.०४.२००९ च्या पत्रानुसार उपलब्ध करुन दिल्या आहेत. वरील २ मुद्याची माहिती शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्यावयाची आहे. जन माहिती अधिकारी, सा.प्र.वि. यांनी अपीलकाराच्या अर्जाच्या प्रती वरील संबंधीत विभागाकडे आवश्यक कारवाईकरिता हस्तांतरित केलेल्या आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, संबंधीत विभागातील जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती हे आदेश प्राप्त झ्र ााल्यापासून १५ दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

**आदेश**

**अपील अंशः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १६.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९४१/०२**

**श्री. मोहन तु. चाळके**
**१३, पंचवटी, झुंजार कॉलनी,**
**गोडोली, सातारा ४१५ ००१. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,**
**हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**बँक ऑफ इंडिया इमारत,**
**३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग,**
**हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. मोहन चाळके यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०५.२००८ रोजी अर्ज करुन, राज्य सेवा मुख्य परिक्षा २००४ चा जाहीर करण्यात आलेत्या निकालाबाबत एकूण १६ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलाची कांहीच दखल न घेतल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. १६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.

अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, राज्य सेवा मुख्य परिक्षा २००४ च्या निकालाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग श्री.सं.च.सावंत यांनी अपीलकारास दि.०४.११.२००८ च्या पत्रान्वये मुद्‌देनिहाय माहिती पुरविली असल्याचे, व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी दि.०४.११.२००८ च्या पत्राची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक १६.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९१३/०२**

**श्री. सुनिलकुमार बावधनकर,**
**चोपडे एजन्सीज ॲण्ड कन्सल्टीज,**
**हिरामण लांडे बिल्डींग, मुंबई पुणे रोड,**
**कासारवाडी पुणे - ३४.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. सुनिल बावधनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, दि. ०४.१२.२००७ रोजी अपीलकार यांनी दाखल केलेल्या आणि श्री.प्रभू विश्वानाथ चोपडे यांनी दाखल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईचा लेखी अहवाल, चौकशी दरम्यान संबंधीत घटकांना काढलेल्या नोटीसा संबंधीत घटकाचे घेतलेले जबाब, पिडीत घटाकास दिलेला न्याय, तसेच दोषी घटकावर झालेल्या दंडात्मक कारवाईच्या न्याय निर्णयाच्या छायाप्रतीची मागणी केली होती. योग्य पूर्ण माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरून अपीलकाराने दि.०२.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी योग्य संपूर्ण माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. १५.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, नोंद रद्द केल्याची बाब जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे पाठवावी अशी अपीलकाराची विनंती दिसते. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविलेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १५.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.२००९/३८९२/०२

**श्री. संदीप गोविंद पिंगळे**
**३९५ विष्णुछाया अपार्ट,**
**मंगळवार पेठ, पुणे ११.** .... अपीलकार

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता**
**अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई (सा.बा.) मंडळ,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**इलाका शहर विभाग, मुंबई.** .... उत्तरवादी

**विवेचन**

अर्जदार श्री. सुनिल बावधनकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०६.२००९ रोजी अर्ज करुन, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, इलाका शहर विभाग, मुंबई अंतर्गत सर्व उप विभागात सुरु असलेली कामे व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. विहित कालावधीत माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०५.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने अपीलकाराने वेळ व तारिख ठरवून उत्तरवादीचे कार्यालयात जावे. उपलब्ध माहिती बघावी. त्यातील आवश्यक वाटणारी माहिती उत्तरवादींना दाखवावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकारास कार्यालयातील संबंधीत कागदपत्र निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन देणेबाबत प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश दिले होते. त्यानुसार अपीलकाराने उपस्थित राहून संबंधित कागदपत्र बघणे आवश्यक होते. परंतू अपीलकार कार्यालयाकडे फिरकलेच नाहीत. त्यामुळे अपीलकारास माहिती पुरविता आली नसल्याचे उत्तरवादीने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक १४.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८९१/०२**

**श्री. महेंद्र ज. शिरसाठ**
**३९५, विष्णुछाया अपार्ट,**
**मंगळवार पेठ, पुणे ११.** .... **अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता**
**अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**मुंबई (सा.बा.) मंडळ,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई.**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**इलाका शहर विभाग, मुंबई.** .... **उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. महेंद्र शिरसाठ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०६.२००९ रोजी अर्ज करुन, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, इलाका शहर विभाग, मुंबई अंतर्गत सर्व उपविभागासंबंधीची एप्रिल २००५ ते मार्च, २००८ या कालावधीची सुरु असलेली कामे व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालवधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.०५.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१४.१०.२००८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपीलकार्त्याने पूर्वनियोजित दिवशी उत्तरदवादीनी त्यांना माहिती पहाण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी. त्यातील अपीलकर्त्यास आवश्यक वाटणारी माहिती त्यांना उत्तरवादींनी सशुल्क उपलब्ध करुन द्यावी असे आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीचे स्वरूप मोठयाप्रमाणात असल्याने, अपीलकाराने प्रथम संबंधीत कागदपत्राची पहाणी करावी अशी अपीलकारास संधी उपलब्ध करून दिली होती. परंतू अपीलकाराने अद्याप कार्यालयास संपर्क साधाला नाही असा उत्तरवादीने आयेगास लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९०३/०२**

**श्री. सुनील सिताराम सुबंध**
**मु.पो.बडगावनिंबाळकर,**
**ता.बारामती, जि.पुणे. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण),**
**४ था मजला, प्रकाशगड,**
**स्टेशन रोड, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण),**
**४ था मजला, प्रकाशगड,**
**स्टेशन रोड, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.सुनिल सुबंध यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.बाळासाहेब लक्ष्मण धुमाळ आस्था.अधिक्षक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी MIDC पींपरी विभागीय कार्यालय, पुणे यांचे मालमत्ता विवरणपत्राबाबत, तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील न्यायप्रविष्ठ प्रकरणी वितरण कंपनीतर्फे बाजू मांडण्यात आली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०७.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी उचित माहिती पुरविली असल्याचे नमुद करुन प्रथम अपील निकालात काढण्यात येत आसल्याचे दि.१७.०३.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी राज्य माहिती आयुक्त खंडपीठ, पुणे यांनी अपील क्र.१३७९ संबंधी सुनावणी आयोजित करून दि.२७.१२.२००७ रोजी आदेश पारित केले आहेत. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १५.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९४२/०२**

**श्री. बापू हनुमंत बंडगर व इतर**
**राही नगर, बंडगर वस्ती, मु.पो.माळेगाव,**
**ता.बारामती, जि.पुणे ४१३ ११५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.बापू बंडगर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.११.२००८ रोजी अर्ज करुन, अपीलकार व इतर ७ कर्मचा-यांना नोकरीत कायम करण्यासाठी आणि महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार सेवाशर्तीसाठी केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. मागीतलेली माहिती विहित वेळेत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.१२.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकार व इतर ७ लोकांना नोकरित कायम करुन घेणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. तक्रार अर्जातील सर्व कर्मचारी वर्गाची सेवा ही संस्थेच्या वेगवेगळ्या युनिटला कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येते. मंडळामार्फत अभियांत्रिकी पदाविका अभ्यासक्रम, अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम, औषध निर्माणशास्त्र पदवी व पदविका अभ्यासक्रम, एम.बी.अे. अभ्यासक्रम इत्यादि अभ्यासक्रम एकाच परिसरात शिकविण्यात येतात. त्यामुळे गरजेप्रमाणे गट-ड च्या सेवा कंत्राटदारामार्फत प्रत्येक युनिटला उपलब्ध करुन देण्यात येतात. सदर प्रकरणी कंत्राटदाराने अपीलकार व इतर ७ कर्मचा-यांना कामावरुन कमी केले असल्याने सदर प्रकरणी संस्था काही करु शकत नाही. सदर प्रकरणी माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९४०/०२**

**श्री. महेश ज्ञा.यमजाळ**
**धायरी, ऋतुनगरी, कैलास जीवन,**
**फॅक्टरीमागे, सिंहगडरोड, पुणे. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिक्षक अभियंता,**
**पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,**
**खडकवासला, पाटबंधारे विभाग,**
**पुणे ११. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.महेश यमजाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०६.२००८ रोजी अर्ज करुन, खडकवासला कालवा उपविभाग, पुणे यांचे कार्यालयातील गट-ड चे कर्मचारी संस्थेचे सभासद श्री.सुधाकर दिनकर किर्वे, शिपाई यांच्या वर्तणुकीबाबत तक्रारी व त्याबाबतची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२१.०७.२००८ च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती पुरविली. यामुळे समधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०३.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपिलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकारास माहिती मिळाली असे गृहीत धरुन

प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपील निकाली काढले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकाराचे प्रतिनिधी उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.सुधाकर दिनकर किर्वे, शिपाई यांच्या वर्तणूकीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  सदर प्रकरणी अर्जावर जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही.   या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९२०/०२**
**अपील क्र.२००९/३९२२/०२**

**श्री. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील**
**शितल दामाणि हायस्कूलचे पूर्वेस,**
**चांदणी चौक, सांगली. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वैद्यमापनशास्त्र, शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग,**
**मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यमापनशास्त्र, शासकीय कुटीर क्र.७,**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग,**
**मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.महेश यमजाळ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०९.२००८ रोजी अर्ज करुन, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अनुसार फाईल जाहिर केलेची तारिख व त्यातील एकूण पानांची संख्या, सदर कालावधीत विभाग प्रमुख म्हणजे सद्याचे नियंत्रक असे आजपर्यंतचे प्रमुख होउन गेले व सद्या आहेत त्यांची नाव कालावधीची यादी, नियंत्रक ते निरीक्षक व त्याचे कार्यालयातील शेवटच्या पदापर्यंतच्या अधिकारी / कर्मचा-याचे कर्तव्य, जबाबदा-या, जॉबचार्ट तयार केलेले आदेश, परिपत्रकाचे दिनांक, क्रमांक व त्याची छायाप्रत, नियंत्रकांनी जिल्हयाचे ठीकाणचे सहा.नियंत्रक कार्यालयाची तपासणी करावी व करु नये यासंबंधीचे आदेश, परिपत्रक इत्यादीची छायाप्रत इत्यादी एकूण १० मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. विहित मुदतीत माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने

दि.२९.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास सांगीतले की, अपीलकाराने मागणी केलेल्या माहितीपैकी कांही माहिती देणे बाकी आहे. सदर बाब लक्षात घेउन मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास उर्वरित माहिती निशुल्करित्या अपीलकारास पुरवावी.

**आदेश**

**अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक १५.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४५/०२**

**श्री. सलिम बाबुभाई पठाण डावखर**
**रोड व्यापारी मंगल कार्यालय शेजारी,**
**वार्ड नं.६, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर ४१३ ७०९. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर)**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**अंधेरी, मुंबई ४०० ०५८.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग (उत्तर)**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**अंधेरी, मुंबई ४०० ०५८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.सलिम बाबुभाई पठाण डावखर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०६.२००९ रोजी अर्ज करुन, कार्यकारी अभियंता उत्तर मुंबई विभाग कार्यालयाच्या कक्षेत किती उपविभाग आहेत. कार्यालयाचे नाव पूर्ण पत्ता दूरध्वनी क्रमांक, कार्यरत असलेल्या उप अभियंत्याचे नाव, त्यांच्या नियुक्तीच्या (तारखासह) सदरील कार्यालयात रुजू होण्याअगोदर कार्यरत असलेल्या कार्यालयाचा सविस्तर पत्ता, कार्यालयात काम करत असलेल्या पदाचे नाव, नोकरीची सुरुवातीची तारिख, तीन वर्षे त्यांना असलेले एकूण फॅसिलीटीसह मासिक पगाराची रक्कम, आयकर, पॅन क्रमांक, पॅनकार्ड काढल्याची तारिख इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने अपीलकाराने दि.०५.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी

आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकारास अर्जात नमूद केलेली सर्व मुद्येवार माहिती कार्यालयात दि.०२.१२.२००९ रोजी समक्ष सर्व माहिती दाखविण्यात आली. दाखविलेली सर्व माहिती समाधानकारक आहे. आता कोणताही एक तक्रार राहिलेली नाही असे अपीलकार श्री.सलीम बाबुभाई पठाण यांनी दि.०२.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविलेले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८३८/०२**

**श्री.तक्वीर अहंमद चुत्तान**
**१०४/अे, रामचंद्र अपार्टमेंट,**
**मनीष नगर, कलवा, ठाणे. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक-२,**
**म्हाडा, बांद्रा (पू), मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**म्हाडा, बांद्रा (पू), मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.तक्वीर चुत्तान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०९.२००९ रोजी अर्ज करुन, मालमत्ता हस्तांतरित केलेल्या दि.०३.०८.२००९ च्या संबंधीत कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.०८.०९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावरुन असे दिसून येते की, अपीलकाराने एकाच दिवशी माहितीच्या अधिकारात अर्ज तसेच प्रथम अपील दि.०८.०९.२००९ रोजी दाखल केले. लगेच माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन दि.१६.०९.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मालमत्ता हस्तांतरित केल्याबाबत म्हाडाच्या जन माहिती

अधिका-याकडून माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२ मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांनी अपीलकारास दि.२७.११.२००९ च्या पत्रानुसार एकूण ५५ प्रती, रू.११०/- एवढे शुल्क आकारून माहिती पुरविली असल्याचा लेखी अहवाल आयोगास सादर केला आहे.  सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४०/०२**

**श्री.विनोदकुमार गो. जोशी**
**करंजीकर निवास, भगवान वाघमारेच्या बाजुस,**
**गणतपी चौक, जिंतूर रोड, परभणी ४३१ ४०१. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**म-५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**म-५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.विनोदकुमार जोशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयातील जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरी असणारे माहे-ऑक्टोंबर २००८ चे हजेरीपटाच्या एकाच पानाची सत्यप्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मला आपल्या मार्फत हवी असून महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्हाच्या जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील ही सत्यप्रत मला हवी आहे.

यासाठी लागणारे शुल्क शासन खाती बँकेत जमा करण्यास मी तयार आहे. तरी मला कृपया विहित शुल्क बँकेत भरण्यासाठी चालान उपलब्ध करून द्यावे ही, नम्र विनंती तसेच सदर रक्कम बँकेत भरण्यासाठी मला चालान उपलब्ध करून दिल्यास व मला भरणा करावयाच्या शुल्कची माहिती दिल्यास आणि शुल्क भरल्यानंतर लगेच मला माहिती उपलब्ध करुन दिल्यास मी आपला अत्यंत आभारी राहील.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.२६.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयातील हजेरीपटाच्या एका पानाची प्रत मागितीली होती. उत्तरवादीने अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०६.०९.२००८ च्या परिपत्रकाची प्रत उत्तरवादीने दि.२०.०३.२००९ च्या पत्रान्वये पुरविली आहे. यावरुन कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती उत्तरवादीने अपीलकारास पुरविली आहे. इतर सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता अपीलकाराने सर्व संबंधीत प्राधिकरणाकडे वेगळे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावयाची आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ०९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९१८/०२**

**श्री. ज्ञानचंद्र श्रीधर पाटील**
**शितल दामाणि हायस्कूलचे पूर्वस,**
**चांदणी चौक, सांगली.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव**
**राज्यपाल सचिव कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव**
**राज्यपाल सचिव कार्यालय,**
**राजभवन, मलबार हिल,**
**मुंबई ४०० ०३५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.ज्ञानचंद्र पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०९.२००८ रोजी अर्ज करुन, केमाअ ४ नुसार प्रसिध्द केलेली फाईलची तारिख, माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची यादी, कायदा-आदेश मा.राज्यपालांचे सहीने व मान्यतेने मंजूर होतात हे सिध्द करणारी माहिती, विद्यापीठ कायद्यानुसार विद्यापीठाचे कुलगुरुंनी पत्रास ४५ दिवसात उत्तर दिले नाही तर अशा कुलगुरुवर दप्तरदिरंगाई कायद्यानुसार कोणाकडे तक्रार दाखल करावी. त्या पदाचे नाव पत्ता, जर राज्यापाल असतील व नसतील तर ते सिध्द करणारे कागदपत्र, आज अखेर ज्या विद्यापीठाकडून उत्तर दिले नाही म्हणून दप्तरदिरंगाई कायद्यानुसार कारवाईची मागणी केली त्याची विद्यापीठानिहाय संख्या, राज्यपालानाच पत्र लिहिले व राज्यपालानीच ४५ दिवसात पत्रास उत्तर दिले नाही तर दप्तरदिरंगाईची कारवाई कोणाकडे मागायची त्याचे पद व नाव, दप्तरदिरंगाई कायदा राज्यपाल व त्यांचे कार्यालयास लागू आहे अथवा नाही. हे सिध्द करणारे आदेश

परिपत्रक, कुलगुरु शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरबाबत कोष्टकानुसार झालेल्या कामाची माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१५.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी, जन माहिती अधिका-यांनी पाठविलेल्या १९.११.२००८ च्या पत्राची प्रत पुन्हा दि.२५.११.२००८ च्या पत्रासोबत अपीलकारास पाठविले. जन माहिती अधिका-यांनी सर्व मुद्याची माहिती दिली असल्याचे नमूद केले. त्यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा उप सचिव श्री.च.म.अलेगाव यांनी क्र.सीएस/एसयू/३८/डी/आर/ ३४८२, दि.१९.११.२००८ च्या पत्रान्वये अर्जातील सर्व मुद्याबाबतची माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-याचे प्रतिनिधी श्री.देवेंद्र खाडे, अवर सचिव यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास अर्जातील सर्व मुद्याबाबत मुध्देसुद माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १५.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४२४/०२**

**श्री. नरेंद्रकुमार चौधरी**
**सी/२०३, भूमि एन्क्लेव्ह,**
**महावीर नगर, कांदीवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता**
**बृहन्मुंबई मुंबई महानगर पालिका,**
**आर दक्षिण विभाग इमारत, मुंबई,**
**एम.जी.क्रॉस रोड, क्र.२,**
**२ रा मजला, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.नरेंद्र चौधरी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०७.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता गैरतक्रारदार उपस्थित होते. तक्रारदार हजर नव्हते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) बृहन्मुंबई महानगरपालिका आर दक्षिण विभाग यांचेकडे खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

" महावीर नगर, कांदिवली (प) येथील भूमी एन्क्लेन संकुलातील विंग सी मधील सी/१०३ या सदनिकेतील अनधीकृत बांधकामाबाबत दि.०६.०२.२००६ पासून श्री.नरेंद्रकुमार चौधरी यांनी केलेल्या पत्रव्यवहारावर झालेल्या कार्यवाही संबंधीची माहिती मागीतली होती."

गैरतक्रारदाराने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील क्र.२३३६ दाखल केले होते. सदर अपीलावर सुनावणी आयोजित करुन दि.२७.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मुध्देनिहाय माहिती ३० दिवसाचे आत पुरवावी असे आयोगाने गैरतक्रारदारास आदेश दिले होते. त्यानंतरही माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीचेवेळी गैरतक्रारदार हजर होते. मागणीप्रमाणे तक्रारदारास माहिती पुरविली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगास सांगीतले. तक्रारदार सुनावणीस अनुपस्थित होते. सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०११/०२**

**श्री. अनिल उकेश**
**एल-१, भास्कर भागिरथी अपार्टमेंट,**
**बोरकुटे ले.आउट, नरेंद्रनगर,**
**नागपूर १५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कला संचालक**
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**कला शाळा आवार,**
**डॉ.दा.नो.मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**कला शाळा आवार,**
**डॉ.दा.नो.मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.अनिल उकेश यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.११.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. कला संचालनालयात दि.२२.०८.१९८४ आणि दि.२५.०७.१९७६ रोजी सहा.अधिव्याख्याता, चित्रकला विभाग, पदासाठी प्रत्यक्ष मुलाखती झाल्या व अनुक्रमे दि.२२.०८.१९८४ रोजीच्या प्रत्यक्ष मुलाखतीतून चार व दि.२५.०७.१९८६ रोजीच्या प्रत्यक्ष मुलाखतीतून दोन असे एकूण सहा उमेदवार निवडण्यात आले. या सहाही उमेदवारांच्या अर्जाची व या अर्जासोबत पात्रतेसाठी त्यांच्या अर्जाला जोडलेल्या संपूर्ण कागदपत्राची साक्षांकित प्रत (सर्टीफाईड कॉपी) मिळणेबाबत.

२. उपरोक्त निवड झालेल्या सहाही उमेदवारांना कामावर रूजु होण्याकरिता दिलेल्या आदेशाची साक्षांकित प्रत (सर्टीफाईड कॉपी) मिळणेबाबत.

३. दि.२२.०८.१९८४ रोजीच्या प्रत्यक्ष मुलाखतीतून निवड झालेल्या चार उमेदवारांपैकी दोन उमेदवार १) श्री.पी.टी.पाटील २) श्री.एस.डी.यादव यांच्या नियुक्तीबाबत पद मंजुरीच्या शासन आदेशाची साक्षांकित प्रत (सर्टीफाईड कॉपी) मिळणेबाबत.

४. महाराष्ट्र प्रशासकीय लवाद, नागपूर बेंचच्या आदेशान्वये (क्र.१७५/९५ दि.०४.०८.१९९५) श्री.संजय रामचंद्र जठार, अधिव्याख्यात, चित्रकला कमी करण्यात आले नाही. त्यांना नियमित करण्यात आल्याबाबतचा शासनाच्या आदेशाची साक्षांकित प्रत (सर्टीफाईड कॉपी) मिळणेबाबत.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२२.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मागणीतील दस्ताऐवजच्या नस्तीस सुमारे २४ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यामुळे शोध घेवुनही कार्यालयात सदर नस्ती उपलब्ध झाली नाही व त्यामुळेच आपल्या अर्जास उत्तर देणे अडचणीचे झाले आहे व विलंब झाला आहे. तरीही उक्त नस्ती मिळाल्यास त्या नस्तीतील आपण माहिती अधिकारात मागितलेल्या मुद्या क्र. अ, ब व क संदर्भातील माहिती आपणाला उपलब्ध करुन देवू.

मुद्या क्र. ड बाबत कळविण्यात येते की, शासकीय कला संस्थात दिर्घमुदतीवर (नियमित) शिक्षकिय पदांच्या नियुक्त्या देणे ही बाब कला संचालक यांच्या अखत्यारितील नाही, अधिव्याख्याता या पदावर नियमित नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या

उमेमदवारातुन केली जाते. श्री.संजय रामचंद्र जठार यांची नियमित नियुक्ती दि.०८.११.२००१ पासून शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण क्र.एडीआर/१०९९/५०७२३ (४२१)/साशि-५, दि.१०.०९.२००१ अन्वये अधिव्याख्याता पदावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने दि.२१.०२.२००९ रोजी पत्र पाठविले आहे. शोध घेउनही कार्यालयात नस्ती सापडली नाही असे जन माहिती अधिका-यांनी अर्जातील अ, ब व क मुद्याबाबत अपीलकारास कळविले आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी. सदर प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिका-यांनी कारणासह आयोगाकडे १५ दिवसाचे आत खुलासा सादर करावा. या परिस्थितीत मी खालीलप्रामणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०१०/०२**

**श्री. रामसागर पु.पिलेवान**
**८३, हिंदूस्थान कॉलनी,**
**वर्धा रोड, नागपूर १५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**नवि-१८, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**नवि-१८, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.रामसागर पिलेवान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२९.०२.२००८ रोजी अर्ज करुन, मौ.पवनी, जि.भंडारा येथील भु.क्र.२३८२/२ या मिळकतीवर मुख्याधिकारी पवनी यांनी गैरअर्जदारास नियमबाहया व बेकायदेशिर अवैद्य बांधकामाची मंजूरी देउन अर्जदाराची झालेली नुकसानभरपाई व दोषी कर्मचा-यावर कारवाई करणेबाबत मुख्याधिकारी न.प.पवनी आयुक्त व संचालक न.प.प्र.संचालनालय, मुंबई यांनी केलेल्या चौकशी अहवालासहित केलेली कार्यवाही व सदर अर्जावर घेतलेल्या निर्णयासहित केल्या असलेल्या कार्यवाहीची साक्षांकित प्रत पुरवावी अशी मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांन विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास सदर प्रकरणी नवि-१८ कार्यासनाच्या जन माहिती अधिका-यांनी १५ दिवसात अपीलकारास माहिती पुरवावी असे आदेश पारित केले. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी क्र.एम.यु.एन.१००७/११२५/नवि-१८, दि.३० जून, २००९ च्या पत्रानुसार अपीलकारास सविस्तर माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४००९/०२**

**श्री. सुनिल वि.तायडे**
**सी-१/२ मेडीकल क्वॉर्टर्स,**
**राजबक्ष, पो.अजनी,**
**नागपूर ४४० ००३.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सुनिल तायडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०१.०६.२००७ रोजी अर्ज करुन, खाली मुदद केलेली माहिती मागीतली होती.

१. ज्या विषयाबाबत सुदूर केंद्राचे स्वतःचे नियम नाहीत, त्याबाबतीत शासनाचे नियम केंद्राला लागू होतात काय?

२. शासनाच्या नियमाप्रमाणे, प्रशासकीय व वित्तीय नियमापेक्षा वेगळे नियम असल्यास केंद्राला आपल्या अखत्यारित अनिर्बंधपणे व मुक्तपणे वापर करण्याचे अधिकार आहेत काय?

३. सदरहू संस्थेच्या कार्यकारिणीने प्रत्येक विषयाचे स्वतंत्र नियम तयार करण्याचे ठरविले अथवा राज्य शासनाचे आदेश लागू करण्याचे ठरविले तर नियंत्रण विभाग म्हणून नियोजन विभाग त्याबाबत काय कारवाई करेल?

४. ज्या विषयांबाबत संस्थेचे स्वत:चे नियम नाहीत त्या बाबतीत, राज्य शासनाचे वेळोवेळी काढलेले आदेश, परिपत्रक अशा प्रकारच्या निमशासकीय कार्यालयांना जसेच्या तसे लागू होतात का?

माहितीपोटी टपालखर्चासह रु.५४/- एवढे शुल्क भरल्यानंतर चौकशी अहवालाची प्रत पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकारास दि.१५.०६.२००७ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यांनी कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.१३ मार्च, २००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली. असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४००४/०२**

**श्री. सत्तार खान अब्बास खान**
**पांडे महाल समोर,**
**भंडारा.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप महाव्यवस्थापक**
**(कर्मचारी वर्ग), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**कर्मचारी वर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**कर्मचारी वर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.सत्तारखान अब्बास खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.मोहमद इकबाल खान अब्बास खान यांचे नोकरीबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले त्याच्या अमंलबजावणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.१२.२००८ रोजी पत्र पाठविले. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विभागीय स्तरावरील असल्याने अपीलकाराचा मुळ अर्ज विभाग नियंत्रक, राज्य परिवहन भंडारा विभाग यांच्याकडे पाठविण्यात आला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली

नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

श्री. माहेम्मद इक्बाल खान हे सन १९७३ पासून जी.जी.तिवारी ट्रान्सपोर्ट, भंडारा या खाजगी कंपनीत चेकर काम करित होते. शासकीय कामगार अधिकारी भंडारा यांनी दि.१०.१०.१९७४ अन्वये रेकॉर्ड तपासून भंडारा विभागास इतर भूतपूर्व खाजगी कंपनीतील कर्मचा-यांचे माहितीसह कळविले. याचिका क्र.२६८८/७९ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिलेल्या आदेशान्वये व महामंडळ अधिनियम, १९५० मधील खंड १९ (अ) च्या तरतुदीनुसार श्री.मोहम्मद इक्बाल खान अब्बास खान यांना महामंडळामध्ये त्यांच्या योग्यतेनुसार मदतनीस या पदावर दि.१९.०१.१९८० रोजी समावून घेण्यात आले होते. श्री.मोहम्मद इक्बाल खान अब्बास खान हे नियत वयोमानानुसार दि.३१.०१.२००८ रोजी महामंडळाचे सेवेतून निवृत्त झाले असल्याचे विभाग नियंत्रक, भंडारा यांनी अपीलकारास कळविले असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४००३/०२**

**श्री. सत्तार खान अब्बास खान**
**पांडे महाल समोर,**
**भंडारा. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप महाव्यवस्थापक**
**(कर्मचारी वर्ग), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**कर्मचारी वर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य कर्मचारी वर्ग अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**कर्मचारी वर्ग खाते, मध्यवर्ती कार्यालय,**
**महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,**
**मुंबई ४०० ००८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.सत्तारखान अब्बास खान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.११.२००८ रोजी अर्ज करुन, एस.टी.चे वाहक वाहेदखान, रा.भंडारा यांनी सरकारला खोटी माहिती पुरवून, खोटे कायम अपंगत्व दाखवून अनुकंपा तत्वावर घेतलेल्या लाभाबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१२.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

श्री.वाहेदखान, रा.भंडारा यांनी अपंगत्वाचे खोटे प्रमाणपत्र दिल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली असल्याने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. अपीलार्थीने याच विषयासंबंधी अपील क्र.३९४/२००८ व अपील क्र.३९५/२००८ राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचेकडीही व्दितीय अपील केले आहेत. या प्रकरणी मागणीप्रमाणे अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक २२.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८५३/०२**

**श्रीमती. यशश्री चंद्रकांत हेंद्रे**
**१७१/१७२ बुधवार पेठ, माधवनगर,**
**ता.मिरज, जि.सांगली. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली,**
**ता.जि.सांगली.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कर्मचारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली,**
**ता.जि.सांगली. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती. यशश्री हेंद्रे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०७.२००९ रोजी अर्ज करुन, ग्राम विकास अधिकारी श्री.एस.के.माने यांनी नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसात लेखी खुलासा काय दिला? श्री.माने यांचेवर नोटीसमध्ये नमुद केल्यानुसार कोणती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात आली. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१०.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, ग्राम विकास अधिकारी श्री.एस.के.माने यांचेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे अपीलार्थीच्या प्रतिनिधीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिकारी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८५४/०२**

**श्री. नंदकुमार दा.भोसले**
**रा.राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१,**
**खोली नं.१२८/२, बी एरिया, रामटेकडी,**
**पुणे ४११ ०२२.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा निबंधक**
**महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,**
**लाल बहादूर शास्त्री मार्ग,**
**मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,**
**लाल बहादूर शास्त्री मार्ग,**
**मुलुंड (प), मुंबई ४०० ०८०.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.नंदकुमार भोसले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. श्रीमती राजेश्री मनोहर देवकुळे यांच्या विरुध्द दाखल गुन्हयाच्या संबंधीत (कामी) मा.निबंधक महाराष्ट्र परिचयी मुलूंड यांनी नेमलेल्या चौकशी संदर्भात मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलूंड यांच्या ०२.०९.२००८ या पत्रानुसार नेमलेली चौकशीची समितीची कार्यवाही.

२. तसेच वरिष्ठ पो.नि.मुलूंड यांच्या पत्राची प्रमाणित व खरी नक्कल तसेच सदर समितीपुढे सादर केलेल्या माहितीचा तपशीलावर समितीने घेतलेल्या अंतिम निर्णयाची चौकशी पटला वरील माहिती खरी व प्रमाणित प्रती.

३. तसेच वरिष्ठ, पो.नि.विश्रामबाग पोलीस स्टेशन पुणे यांनी गु.रं.नं.३३०/०८, दि.३१.०८.२००८ च्या तपासाअंतर्गत माहिती मागविण्यासाठी सादर केलेल्या पत्राची खरी व प्रमाणित नक्कल.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०८.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०२.०९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२०.०८.२००९ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे अपीलकारास दि.१५.०९.२००९ च्या पत्रान्वये कळविले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी न्याय दिला नसल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिका-यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.राजेश्री मनोहर देवकुळे यांच्या विरुध्द दाखल गुन्हाच्या संदर्भात अनुषंगीक माहिती मागीतली होती. श्रीमती.राजश्री देवकुळे यांनी जन्मतारखेची खोटी नोंद असलेली शाळा सोडल्याचा दाखला सादर करुन परिचारीकेची नोकरी मिळविली आहे. याबाबत तक्रार अर्ज सादर केला आहे. या प्रकरणी मी असे आदेश देतो की, अपीलकाराने सादर केलेल्या तक्रार अर्जावर कार्य कार्यवाही केली याबाबत जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील अशंतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८५५/०२**

**डॉ.दिलीप सिताराम देशपांडे**
**मालोजीनगर कोळकी,**
**ता.फलटण, जि.सातारा. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**एम.एस.ई.डी. कंपनी लिमिटेड,**
**तेजस्वी बिल्डींग ग्राउंड फ्लोअर,**
**कर्निक रोड, कल्याण (प) ४२१ ३०१.**

**जन माहिती अधिकारी,**
**एम.एस.ई.डी. कंपनी लिमिटेड,**
**तेजस्वी बिल्डींग ग्राउंड फ्लोअर,**
**कर्निक रोड, कल्याण (प) ४२१ ३०१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार डॉ.दिलीप देशपांडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. मिटीर व मटिरिअल, अकौट प्रमाणे आपले कार्यालयात सन ००७-२००८ मध्ये किती ग्राहकांची कोणत्या तारखेला नोंद झाली? अ, दाखल अर्जदारांची तारखेसह नावे व पत्ते द्यावेत, ब, कोणत्या ग्राहकाला कोणत्या तारखेला कनेक्शन देणेत आली? क, कोणत्या ग्राहकाला अध्याप मिळाले नाही? न मिळणेचे कारण? दाखल झालेल्या अर्जाच्या सर्व इनव्हर्डच्या सत्य प्रती मिळाव्यात.

२. विद्युत पुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांच्या व इतर बाबत आलेल्या तक्रारी (कम्पलेंट) ब्या २००७-२००८ मधील सत्यप्रती मिळाव्यात.

३. मिटर बसवणेचे निकष कोणते? अर्ज दाखल झालेनंतर किती दिवसात मिटर बसवणेचे बंधन असतात का, असे कोणतेच बंधन नसते याचा जी.आर. मिळावा.

४. असे किती ग्राहक आहेत की ज्यांना विजेचे बिलच येत नाही.

५. सन २००० ते २००८ मध्ये आपल्या अख्त्यारित असलेल्या विभागाला विद्युत कंपनीला मिळालेले मटिरिअल किती? त्याचा विनियोग कसा झाला? कोठेकोठे वापरला? याची कागदोपत्री माहिती द्यावी?

६. सन २००० ते २००९ माहे मे, पर्यंत आपल्या सबडिव्हीजनला किती थ्री फेज मिटर बसवले? अ मिटर नंबर, ब. ग्राहकांच्या पूर्ण नाव-पत्यासह माहिती द्यावी.

७. कृपया विनंती की वरील १ अ.ब.क. २, ३, ४, ५, ६ अ.ब.क. अशा सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रति सही शिक्क्यासह द्याव्यात.

अपीलकाराने मागीतलेल्या माहितीच्या ३२९७ सत्यप्रतीच्या दस्तऐवज काढण्याचा खर्च रू.६५९४/- कार्यालयात भरणा करावा. त्यानंतर माहिती अपीलकारास व्यक्तीश: देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०७.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मोफत द्यावयाचा आदेश व्हावा म्हणून अपीलकाराने दि.२२.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती अपूर्ण दिली असल्याच्या कारणावरून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकाराने मागणी केलेली माहिती विहित शुल्क भरल्यानंतर व्यक्तिश: उपलब्ध करून देण्यत येईल असे जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत दि.०७.०७.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले आहे. परंतू अपीलकाराने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली नाही. उलट माहिती मोफत मिळावी म्हणून प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. तसेच माहिती मोफत मिळावी असा व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे.

सदर प्रकरणी उत्तरवादीने जाणीवपूर्वक किंवा सुबुध्दीने अपीलकारास माहिती देण्याचे नाकारलेले नाही. माहिती पोटी अपीलकाराने शुल्क भरणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने विहित शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन द्यावी. शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४१/०२**

**श्री.सुरेश ज्ञानदेव वाघमारे व इतर**
**श्री.श्रीनिवास, रोड लाईन्स,**
**व्ही.सी.आय.कंपाउंड कोपर बस स्टॉप जवळ,**
**कोपर पो.काल्हेरख ता.भिवंडी,**
**जि.ठाणे. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन**
**माल वाहतुक कामगार मंडळ, बृहन्मुंबई**
**१०२/१०३, स्ट्रील चेबंर्स,**
**देवगी रातनशी मार्ग, दाणाबंदर, मुंबई ४०० ००९.**

**जन माहिती अधिकारी,**
**माल वाहतुक कामगार मंडळ, बृहन्मुंबई**
**१०२/१०३, स्ट्रील चेबंर्स,**
**देवगी रातनशी मार्ग, दाणाबंदर, मुंबई ४०० ००९. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.सुरेश वाघमारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०२.०७.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१. मुकादम पांडूरंग यशवंत येसले व ज्ञानदेव यशवंत येसले यांनी आम्ही कामाला लागले पासून बिन काम करता पगार घेतला याचे बाबत.
२. गणपत पांडुरंग थोडपळ या टोळीच्या कामगारास मुकादमाने स्वत:च्या घरी खाजगी कामाकरिता वापरले त्याबाबत.
३. मुकादमाने टोळीतील ५ कामगार स्वत:च्या खाजगी टेम्पोवर दोन महिने वापरले त्याबाबत.

४. रोकडीतील पैशाचा गैरवापर केलेबाबत.

५. मे.चेतक रोडवेज ट्रान्सपोर्टचे काम करणेबाबत.

६. नम: शिवाय रोडवेज चे रजि. झाले ते कसे झाले याबाबत.

७. टोळीच्या मुकादमाने काम करणे / न करणे या बद्‌दल मंडळाने आपली भुमिका स्पष्ट करणेबाबत.

या सर्व बाबींची मंडळाने काय चौकशी केली याचा खुलासा करावा.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३१.०७.२००९ च्या पत्रान्वये अर्जातील मुध्दा क्र.६ वगळता इतर मुद्याबाबत माहिती देता येत नाही / अखत्यारित येत नाही असे अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन अपीलकाराचे प्रथम अपील फेटाळण्यात येत असल्याचे दि.३०.०९.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, मुकादम पांडुरंग यशवंत येसले व ज्ञानदेव यशवंत येसले यांनी सन १९९० पासून काम केलेले नाही. कामगारावर दादागिरी करून स्वत:च हजेरी लावलेली आहे. तसेच टोळीतील ५ कामगारांनी सुध्दा २ महिने मुकादमाच्या टेंपोवर काम केले. त्यांना सुध्दा मजूरी, इतर कामगाराच्या मजूरीतून दिली इत्यादि अनुषंगीक मुद्याबाबत अपीलकाराने जन माहिती अधिकारी, माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई यांच्याकडे तक्रार केली. सदर तक्रारीवर केलेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. अपीलकारास, माल वाहतूक कामगार मंडळाने माहिती देणे आवश्यक आहे. मंडळाच्या

कार्यवाहीबाबत विचारलेल्या खुलाशाचीही अपीलकारास माहिती देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४३/०२**

**श्री.मनोहर नानाजी निकम**
**माल प्लाझ्झ को.ऑ.हौ.सोसा.,**
**बी.२०२ सुभाष नगर, कर्जर रोड,**
**कुळगांव-बदलापूर (पू),**
**ता.अंबरनाथ, जि.ठाणे. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**नाशिक विभाग, नाशिक,**
**ता.जि.नाशिक.**

**जन माहिती अधिकारी तथा सदस्स सचिव**
**विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,**
**नाशिक विभाग, नाशिक,**
**ता.जि.नाशिक. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.मनोहर निकम यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२८.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१२.०३.२००९ रोजी अर्ज करुन, बृहन्मुंबई महानगरपालिका (शिक्षण) विभाग खात्यामार्फत EOB/OD/३४५, दि.१७.१२.२००४ या क्रमाने कार्यालयाकडे पाठविलेल्या अपीलकाराच्या जात पडताळणी फाईलबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.०९.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि.१५.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या जाती दाव्याच्या पडताळणीबाबत माहिती मागीतली होती. सन २००७ मध्ये समितीचे विभाजन होउन धुळे, नंदुरबार, जळगांव या जिल्हयासाठी स्वतंत्र धुळे येथे समिती निर्माण झाली. नाशिक अहमदनगर या जिल्हयासाठी स्वतंत्र समिती नाशिक येथे आहे. समितीचे विभाजनामध्ये प्रकरणाची अदलाबदल झाली. त्यामुळे अपीलकारास वेळेत प्रकरणावर समितीने निर्णय घेउन अपीलकारास वैद्यता प्रमाणपत्र क्र.३१७७५ दि.०२.१२.२००९ रोजी निर्गमित केले असा प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०८.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास लेखी अहवाल सादर केला आहे. यावरुन सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०९.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४२/०२**

**श्री.प्रमोद म.शिरसाठ**
**श्री.श्रीधर कचरू दाणी**
**रूम नं.२३ ब्लॉक-५,**
**नवीन भाजी मार्केट जवळ,**
**उपनगर, नासिक ४२२ ००६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण निरीक्षक**
**शिक्षण निरीक्षक यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई उत्तर विभाग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**सम्यक दिप विद्यामंदिर,**
**पी.एस.लोखंडे मार्ग, राहूल नगर,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०८९.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.प्रमोद शिरसाठ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०६.२००९ रोजी अर्ज करुन, जून १९९७ ते डिसेंबर २००८ या कालावधीत शाळेत हजेरीपटावर असलेल्या शिक्षक / शिक्षिकांची एकूण ४ मुद्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.१७.०८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सम्यक दिप विद्या मंदिर चेंबूर, मुंबई या शाळेतील शिक्षक/शिक्षीकाबाबत अनुषंगीक ४ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. तसेच सदरहू शाळेस अनुदान प्राप्त झाले असल्याचेही आयोगाच्या निदर्शनास आणले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०९.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४४/०२**

**श्री.भानुदास राजेकर**
**मु.पो.सेमनाथपूर, ता.उदगीर,**
**जि.लातूर.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विभाग,**
**लातूर, ता.जि.लातूर.**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विभाग,**
**लातूर, ता.जि.लातूर.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.भानुदास राजेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१) श्री.भानुदास कुंडलीकराव राजेकर यांचे सेवापुस्तीकांची सत्य प्रत २) सेवा निवृत्तीची देय रक्कम कोणकोणत्या रेकाडीकवरुन देण्यात आली त्याची सत्य प्रत ३) सेवानिवृत्त देय रक्कमेतून कोणकोणत्या प्रकारची रक्कम कपात करण्यात आली त्यांची सत्य माहिती देण्यात यावी ४) भ.नि.नि रक्कम व ग्रॅज्युटी रक्कम व रजेची रक्कम किती देण्यात आली त्यांची सत्य प्रत देण्यात यावी. ५) पेन्शन कार्यालय सोलापूर यांच्याकडे किंवा पेन्शनची रक्कम केव्हा पासून किती रक्कम कपात केलेली आहे त्यांची सविस्तर माहिती देण्यात यावी. ६) श्री.साहेबराव मस्के चालक क्र.९५५० कलमजूरी आगार यांना मि जामीन दिलेली आहे सादर चालक कर्तव्यावर असतांना जामिन दाराची रक्कम कपात करण्यात आलेली आहे. तरी सदर चालकास

एस.टी.सी.बी.सी.सी.एस. व जि.पी.एफ कोणत्या नेमाने देण्यात आले त्याची माहिती देण्यात यावी.

मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.११.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितयी अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सेवापुस्तकाची सत्यप्रत, सेवानिवृत्ती लाभ कोणकोणत्या कागदपत्रानुसार देण्यात आला इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने माहिती पुरविली असल्याचे अपीलकाराने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती पुरविण्याची दक्षाता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे. या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०९.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८३९/०२**

**श्री.वसंतराव शि.नागपूरे**
**डॉ.भलगट हॉस्पीटल मागे,**
**वार्ड नं.७, मु.पो.श्रीरामपुर,**
**जि.अहमदनगर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.वसंतराव नागपूरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.१२.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.१०.२००६ रोजी अर्ज करुन, गुंठेवारी योजनेत श्रीरामपूर नगरपरिषदेने (जि.अहमदनगर) सौ.हिरावती नागपूरे या महिलेच्या जाणे येण्याच्या वहिवाटीचे जागेमध्ये बांधकामकरुन गुंठेवारी नियमाचे उल्लघन केलेल्या जागा मालकावर व त्यांना सहकार्य करणा-या अधिका-यावर नियमानुसार योग्य कार्यवाही होउन महिलेस न्याय मिळावा अशी मागणी केली होती. यासंदर्भात दि.१६.०७.२००६ रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. विहित कालावधीत मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०४.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सौ.हिरावती नागपूरे यांच्या जाण्या येण्याच्या वहिवाटीचे जागेमध्ये श्रीरामपूर नगरपरिषदेने गुंठेवारी योजनेनुसार अनधीकृत बांधकाम केले. यामुळे गुंठेवारी नियमाचे उल्लंघन केलेल्या जागा मालकावर योग्य कारवाई करुन सौ.नागपुरे यांना न्याय मिळावा म्हणून केलेल्या अर्जावरी कारवाईची माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने दि.०४.१२.२००९ च्या पत्रान्वये लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. सौ.हिरावती वसंतराव नागपूरे यांनी श्रीरामपूर नगर परिषद यांच्याकडे प्रश्नाधीन जागेच्या सहमिळकतधारकाच्या स्वाक्षरीसह बांधकाम नकाशे सादर केल्यानंतर त्यावर श्रीरामपूर नगर परिषदेकडून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. प्रस्तूत प्रकरणी सद्यस्थितीत शासनस्तरावर कार्यवाही अपेक्षीत नसल्याने अपीलकाराचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला असल्याचे उत्तरवादीने दि.३१.०८.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ०९.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८५०/०२**

**श्रीमती.माधुरी प्रदीप मायनील**
**आर-३९/१०२, रोहीता को.ऑ.हौ.सोसा.,**
**सुदर्शन नगर, एस.आय.डी.सी.,**
**डोंबिवली (पू) ४०० २०३,**
**जि.ठाणे.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**मुंबई विभागीय मंडळ, वाशी,**
**नवी मुंबई ४०० ७०३.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**मुंबई विभागीय मंडळ, वाशी,**
**नवी मुंबई ४०० ७०३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती. माधुरी मायनील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०६.०६.२००९ व दि.२२.०७.२००९ रोजी अर्ज करुन, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेच्या (१२ वी) फेब्रुवारी, २००९ च्या गणित व संख्यीकी विषयाच्या उत्तरदपत्रिकाची प्रत, रसायनशास्त्राच्या उत्तरपत्रिकाच्या प्रतीची मागणी केली होती. नियम १०४ मधील ३ नुसार विभागीय मंडळाकडून उत्तरपत्रिका अत्यंत गोपनीय समजल्या जात असल्याने त्या उघड करण्याची किंवा त्याची तपासणी करण्याची कोणत्याही उमेदवारास मागणी करता येणार नाही किंवा त्यास तसा हक्क असणार नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.०६.२००९, दि.०४.०८.२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील सादर न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने उच्च माद्यमिक प्रमाणपत्र परिक्षेच्या (१२ वी) गणित, सांख्यीकी, रसायनशास्त्राच्या उत्तरपत्रिकाच्या प्रतीची मागणी केली होती. सदर प्रकरणी उत्तरपत्रिका अत्यंत गुप्त म्हणुन समजल्या जात असल्याने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, नवीन मुंबई यांनी अपीलकारास कळविले आहे. सदर प्रकरणी उत्तरवादीने माहिती नाकारली आहे. जन माहिती अधिका-यांनी योग्यतो निर्णय घेउन माहिती नाकारली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०९.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४८/०२**

**श्री.सखाराम अनंत मालाडकर**
**एच.आय.जी.१/१ कोंकण हौ.बॉर्ड कॉलनी,**
**कल्याण (प), बिर्ला कॉलेज सोसायटी,**
**जि.ठाणे .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय,**
**मुलुंड, मुंबई**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय,**
**मुलुंड, मुंबई. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सखाराम मालाडकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०८.२००९ रोजी अर्ज करुन, इ.मा.व. जातीचा दाखला मिळण्यासाठी अर्ज क्र.१०१, १०२, १०३ दि.०७.०१.२००९ कु.समृध्दी २) सुखदा ३) अनंत महादेव मालाडकर यांना दाखला देण्यात झालेल्या विलंबाबतची माहिती, जाती प्रमाणपत्राकरिता अर्जदारांनी दि.०७.०१.२००९ रोजी अर्ज करून सुध्दा १० महिने होउनही इमाव जाती प्रमाणपत्र दिले नाही. जाती दाखला वितरण करण्याकरिता शासकीय कालावधीची माहिती इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१३.०९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादीचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, इ.मा.व.च्या जाती दाखला विलंबाने मिळाल्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अर्जासोबत उत्पन्नाचे पुरावे सादर करणे आवश्यक असतांनाही अपीलकाराने पुरावे सादर केलेले नव्हते. अपीलकाराने माहे ऑगष्ट मध्ये उत्पन्नाचे पुरावे सादर केल्यानंतर जातीचे प्रमाणपत्र तयार करुन क्र.१०१/०९, १०२/०९ चे अर्ज दि.३०.०४.२००९ रोजी व अ.क्र. १०३/०९ चा अर्ज दि.०१.०८.२००९ रोजी विहित नमुन्यात दाखला तयार करुन मा.उपजिल्हाधिकारी विशेष भुसंपादन अधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे सादर केले होते. विधानसभा निवडणूक कामी उपजिल्हाधिकारी तथा विशेष भुसंपादन अधिकारी, तहसिलदार व नायब तहसिलादर हे अधिकारी वर्ग व्यस्त असल्याने अर्जदारास दाखला देण्यास विलंब झाला असल्याचा जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी खुलासा सादर केला आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४७/०२**

**श्री.जॉन मिरांडा**
**५६५, इल्सीड अपार्ट.,**
**फ्लॅट नं.१०१, दुसरा मजला, पाली,**
**डॉ.आंबेडकर रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय,**
**ता.पनवेल, जि.रायगड.**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय,**
**ता.पनवेल, जि.रायगड.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.जॉन मिरांडा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०६.२००९ रोजी अर्ज करुन, मौजे पेंधरे सर्व्हे क्र.२६७/१ या जमिनीस वारस लागण्यासाठी दाखल केलेला अर्ज व त्याबरोबरचे कागदपत्र, त्यावेळचे तलाठी, मंडळ अधिकारी यांची नावे इत्यादि अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.२४.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी राज्य माहिती आयोगाकडे व्हीडीओ कॉन्फरर्स व्दारे सुनावणी आयोजित केली असल्याची उत्तरवादींना दि.२०.११.२००९ रोजी नोटीस पाठविण्यात आली. त्यानंतर प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी घेउन अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना सूचना दिल्या. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी दि.०२.१२.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. अपीलकारास माहिती पुरविल्याची पोच प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०२.१२.२००९ च्या पत्रासोबत आयोगाकडे पाठविली आहे. सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०९.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४६/०२**

**श्रीमती. वर्षाराणी प्र.जाधव**
**प्लॉट नं.८, रूईकॉलनी, गावडेवाडी,**
**मु.पो.कलमठ, ता.कणकवली,**
**जि.सिंधुदुर्ग. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, मुंबई (१) शहर,**
**मल्होत्रा हाउस, ६ वा मजला, जीपीओ समोर,**
**फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा),**
**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,**
**यशवंतराव चव्हाण नाय्य संकुल,**
**बॉम्बे ग्लास वर्क्स समोर,**
**जे.के.सावंत मार्ग, माहिम (प),**
**मुंबई ४०० ०१६. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्रीमती.वर्षाराणी जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०६.२००९ रोजी अर्ज करुन, चिमणे सन्मित्र सहकारी पतसंस्था मर्या. मुंबई हिरा अपार्टमेंट, जनता सोसायटी मार्ग, घाटकोपर (पू), मुंबई या संस्थेने कार्जदार वसूली आवश्यक माहिती विहित कालावधीत दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.१ ते ११ बाबत खुलाशासह आवश्यकती माहिती /कागदपत्रे १ महिन्याचे आत देण्याची कार्यवाही करावी असे नमुद करुन दि.२६.०८.२००९ रोजी आदेश पारित केले. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विलंबाने दि.२८.०८.२००९ रोजीच्या पत्रान्वये अपीलकारास मुध्देनिहाय माहिती पुरविली. माहिती

विलंबाने मिळाली. अपूर्ण माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, कर्जदार श्री.संजय विष्णू व्हरंबळे यांचे थकबाकी वसूलीसाठी दाखल केलेल्या वसूली अर्जामधील कागदपत्रांची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास विलंबाने कार्यालयाशी संबंधीत माहिती पुरविली आहे. अर्जातील उर्वरित मुद्यासबंधी अर्जाची प्रती इतर संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तांतरित करुन अपीलकारास पुरविण्याबाबत सूचना द्याव्यात. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती कार्यवाही वेळीच करण्याची दक्षता घ्यावी अशी जन माहिती अधिका-यांना समज देण्यात येत आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ०९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८९७/०२**

**श्री.गणेश ग.पवार**
**ग.आपलेघर सोसा.,**
**स.नं.५६, नगर रोड,**
**चंदनगर, पुणे ४०० ०१४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**इलाखा शहर विभाग,**
**सा.बा.विभाग, विकास विभाग इमारत,**
**३ रा मजला, जुने जकात घर, मुंबई ४०० ०२३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता पश्चिम उप विभाग,**
**उव विभागीय अभियंता यांचे कार्यालय,**
**पश्चिम (सा.बां) उप विभाग, मलबार हिल,**
**मुंबई ४०० ००६.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.गणेश पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०५.२००९ रोजी अर्ज करुन, शासकीय सेवाबाबी उप कार्यकारी अभियंता सा.बां.वि. यांच्या नियंत्रणातील संपूर्ण उप विभागीय कार्यालयांना कलम ६ पोट कलम (३) खंड (एक) व (दोन) अन्वये हस्तांतरण केल्याची तारिख, उप अभियंते यांच्याविरुध्द लेखी किंवा वृतपत्रात आलेल्या तक्रारीच्या छायाप्रती, मिळालेला निधी कोणत्या लेखशिर्षाखाली कोणकोणत्या कामावर खर्च झाला. त्याकामाची निवीदा नोंदवहीची प्रत, उप विभागीय अभियंते, शासकीय सेवेत हजर झाले पासून अजतागायत गोपनिय अहवाल, सी.आर.डी.ई. व त्यांचेकडे असलेली बेहीशोबी मालमत्ता शासनास विवरणपत्राव्दारे सादर केली आहे काय? शासन आदेशान्वये स्वत: व पत्नीकडून जवळच्या नातेवाईकाच्या नावे केलेली संपत्ती स्थावर मालमत्ता शासनास जाहिर केली आहे काय? इत्यादि गोपनीय अहवाल व

विवरण पत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. अपीलकाराने मागीतलेली माहिती अतिशय विस्तृत स्वरूपाची असून कागदपत्रे ही प्रतीत संख्येने जास्त आहेत. त्याचप्रमाणे दैनंदिन कामकाज व अपुरा कर्मचारी वर्ग लक्षात घेता विस्तृत स्वरुपाची माहिती संकलित करुन देणे अवघड आहे. कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राची तपासणी करावी त्यानंतर निवड कागदपत्राच्या प्रती अपीलकारास उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, उप अभियंत्याबाबत अशासकीय व्यक्तीने केलेल्या तक्रारी व इतर अनुषंगीक माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. तरी अपीलकाराने आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्राची तपासणी करावी. त्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास निवडक कागदपत्राच्या छायाप्रती पुरवाव्यात. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>**आदेश**</u>

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १४.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८३७/०२**

**श्री. हेमचंद्र ज.काळे**
**३१/समर्थ कॉलनी, एम.जे.कॉलेज रोड,**
**ता.जळगाव, जि.जळगाव. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा,**
**वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हेमचंद्र काळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०४.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. मा.बबनराव पाचपुते मंत्री वन विभाग यांनी त्यांच्या मतदार संघात आणि अहमदनगर जिल्हयात सन २००१ ते २००५ या कालावधीत विनापरवाना, संगनमताने आरा गिरण्या यांना विद्युत पुरवठा करण्यासाठी पदाचा गैरवापर केला. म्हणुन मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या सेंट्रल एम्पॉवरमेन्ट कमिटी नवी दिल्ली यांचेकडे स्वयंसेवी संघटनेने सन २००६ मध्ये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणी समितीने जारी केलेल्या नोटीसची प्रत त्या सहच्या कागदपत्रांसह सर्व प्रति संकलित व साक्षांकित करुन पुरवाव्यात. नमुना दाखल दि.०३.०२.२००१ च्या उत्तरची प्रत जोडली आहे.

२. मा.मुख्य वन संरक्षण नागपूर यांनी आरा गिरण्याबाबत आजपावेतो शासनाकडे सादर केलेले सर्व Action Taken Report बाबत आपण केलेल्या कारवाईचा बाबनिहाय तपशिल मला पुरवावा. एकुण ७८९ आरा गिरण्या या मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी

संगनमताने / अलिखित भागीदारीत अवैद्यपणे सुरु ठेवल्या आहेत.  अशा आरा गिरण्यांचा विद्युत पुरवठा बंद करण्याबाबत आपण केलेला आणि करावयाच्या कारवाईचा तपशिल कळवावा.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.१८.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.  प्रथम अपील मुदतीपूर्व आल्याचे नमुद करुन ते विचारात घेण्यात आले नाही असे दि.०४.१२.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.  अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आर गिरण्यांना विद्युतपुरवठा केल्याप्रकरणी अनुषंगीक माहिती मागीतली होती.  प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती दिली.

१. अर्जात नमूद केलेनूसार, स्वयंसेवी संघटनेने सन २००६ मध्ये केंद्रीय उच्चधिकार समिती, दिल्ली यांजकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने समितीकडून शासनास नोटीस प्राप्त झालेली नाही.
२. अर्जातील मुद्या क्र.२ च्या अनुषंगाने नमूद करण्यात येत की, अपीलकाराच्या दि.१८.०४.२००८ च्या अर्जासोबत जोडलेल्या आरागिरण्याबाबत Action Taken Report  व्यतिरिक्त अन्य कुठलाही Actiopn Taken Report मुख्य वनसंरक्षक (संरक्षण) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडून शासनास प्राप्त झालेला नाही.

उत्तरवादीने अपीलकारास वर नमुद केल्यानुसार माहिती पुरविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ०९.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८४९/०२**

**श्रीमती. रजनी केतन दोशी**
**६/४० गणेश को.ऑ.सोसा.,**
**सृष्टी, म्हाडा फेज-२,**
**आय.सी.आय.सी.आय.बॅंक जवळ,**
**मिरा रोड (पू), जि.ठाणे. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधिश**
**जिल्हा व सत्र न्यायालय,**
**ठाणे, जि.ठाणे.**

**जन माहिती अधिकारी,**
**जिल्हा व सत्र न्यायालय,**
**ठाणे, जि.ठाणे. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती.रजनी दोशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०९.२००८ व दि.१७.११.२००८ रोजी अर्ज करुन, दि.१७.११.२००८ च्या माहिती अधिकारातील माहिती मॅजस्ट्रेट साहेब श्री.भोईर, तसेच न्यायाधिश श्रीमती.भारती काळे तसेच तत्कालीन पिठासीन जज्ज श्री.देशापांडे साहेब यांच्या अनुषंगाने माहिती मिळाली नाही. १) १३९/०५-४९८ अ काशीमीरा पो.ठाणे ज्युडीशिएल कोर्ट क्र.२ मध्ये दोन जमिनदार माहिती अधिकारान्वये खोटे निघाल्याने कोर्ट अपहार प्रकरणी १४.०२.२००७ रोजी प्रतीज्ञापत्र रजिस्टर केले असून त्यांना सोडण्यात आले. त्याची माहिती २) १८.०८.२००६ कोर्ट रजिस्ट्रारकडे त्यांना तसेच त्या वकीलासंबंधी CID चौकशी अर्ज केला तो रद्दबातल करण्याची ठोस माहिती देणे ३) दि.२४.०६.२००८ रोजीच्या अर्जानुसार ठाणे प्रधान न्यायाधिश यांना कोर्ट अपहार प्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.१०.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे

समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन दि.१२.०१.२००९ रोजी आदेश पारित केले व प्रथम अपील फेटाळ्ले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक माहिती दिली असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ०९.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०१२/०२**

**डॉ.सुधाकर ना.गुंबळे**
**प्लॉट नं.६८, जय बजरंग सोसा.,**
**व्हेटर्नरी कॉलेजच्या मागे,**
**सेमिनरी हिल्स, नागपूर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व**
**मत्स्य व्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी,**
**पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय विकास व**
**मत्स्य व्यवसाय विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार डॉ.सुधाकर गुंबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.११.२००८ रोजी अर्ज करुन, पदनाम, एकूण पदे, भरलेली पदे, कार्यरत अधिका-यांचे नाव, अधिका-यांचे जात व प्रवर्ग, ज्या बिंदूवर पदोन्नती दिली तो बींदू इत्यादि माहिती विहित तक्त्यात मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे यांनी त्यांच्या दि.२६.०२.२००८ व दि.२४.०७.२००८ च्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे अपीलकाराला सहाय्यक पशुसंवर्धन या संवर्गाचे बिंदुनामावलीच्या छायाप्रती पाठविलेल्या आहेत. अपीलकारांनी ज्या पदनामाची माहिती मागीतलेली आहे ती पदनाम सद्या अस्तीत्वात नाहीत. त्या पदाचे नाम बदलेले आहेत. संचालक, सह संचालक नसून ते पद सह आयुक्त असे आहे. उर्वरित म्हणजेच ज्य बिंदूवर अधिका-याला पदोन्नती दिली तो बिंदू ज्या वर्षापासून बिंदूनामावली अस्तित्वात आली तेव्हापासून अधिका-याच्या नावासह माहिती असलेला उप संचालक (उप आयुक्त) सह संचालक (सह आयुक्त), अतिरिक्त संचालक (अतिरिक्त आयुक्त) या पदाच्या संदर्भात विवरणपत्रातील स्तंभ.क्र.८, ९, १० मध्ये माहिती दर्शविणा-या नस्त्या तात्काळ शोधण्यात याव्यात. उपलब्ध माहिती तात्काळ देण्यात यावी असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०१.२००९ रोजी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी उत्तरवादीने प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास उर्वरित माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०२३/०२**
**अपील क्र.२००९/४०२४/०२**

**श्री.यशवंत तु.दौंडे**
**सह आयुक्त यांचे कार्यालय,**
**अन्न व औषध प्रशासन, जवादे कपांउंड,**
**बस स्टँडजवळ, अमरावती. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह आयुक्त (विधी)**
**अन्न व औषध प्रशासन, स.क्र.३४१,**
**बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
**अन्न व औषध प्रशासन, स.क्र.३४१,**
**बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.यशवंत दौंडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.१२.२००८ रोजी अर्ज करुन, अन्न व औषध प्रशासनातील मुंबई येथे कार्यतर असलेले श्री.प्र.रा.उत्तरवार सह आयुक्त (विधी), श्री.मोमीन-सह आयुक्त (मुख्यालय), श्री.एस.डी.चौधरी-सह आयुक्त (बृहन्मुंबई) व ठाणे येथे कार्यरत असलेले श्री.एच.डी.साळुंखे-सह आयुक्त (कोकण विभाग) बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०५.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०९.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२१.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने प्रशासनातील ४ वरिष्ठ अधिका-यांची माहिती मागीतली आहे. अशा माहितीने प्रशासनात सौहार्दाचे व सामंजस्याचे वातावरण राहिल का? याबाबत शंका निर्माण होते. त्या माहितीने कोणत्याही प्रकरणी त्याचा दुरुपयोग होउ शकतो. माहितीतील संबंधीत अधिका-याने याबाबत निवेदन दिलेले आहे. त्यामुळे प्रशासनात दैनंदिन कामकाज, समज-गैरसमज निर्माण होउ शकतो. या प्रकरणातील स्थिती व नैसर्गिक न्याय विचारात घेउन प्रशासन सुरळीत चालावे, सर्वांशी निकोप संबंध राहून कामकाज एकरुपपणे व जोमाने करावे याबाबत ही माहिती दिल्याने बाधा येईल, असे अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०४.२००९ च्या आदेशात नमुद करुन अर्जातील मुध्दा क्र.३ बाबत माहिती नाकारली आहे. अपीलकाराने त्रयस्थ पक्षाची माहिती मागीतली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ अनुसार, सदर प्रकरणी त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने नाकारण्यात आली आहे. यामुळे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२१.०४.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०२१/०२**

**श्री. राजेश पू. सोनोने**
**गजानन महाराज मंदीराजवळ,**
**भगतसिंग चौक उमरी लहान अकोला.**
**ता.जि.अकोला. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग, (व्यशि-४),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग, (व्यशि-४),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.राजेश सोनोने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०७.०८.२००९ रोजी अर्ज करुन, शिल्प निदेशक किंवा समकक्ष पदावर समायोजनाबाबत अपीलकाराने एकूण १३ अर्ज सादर केले होते. सदर अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी मागणीप्रमाणे अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१७.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२३.१०.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. दि.२९.११.२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षणाच्या दृष्टिने नियमित कर्मचारी उपलब्ध होइपर्यंत अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात अस्थायी कर्मचारी म्हणून अपीलकारांची शिल्प निदेशक पदावर दि.१५.११.१९९५ ते दि.०१.०९.२००८ या कालावधीत नियुक्ती केली होती. प्रादेशिक दुय्यम सेवा निवडमंडळाकडून सदर पदांवर नियमित कर्मचारी उपलब्ध झाल्याने अपीलकाराच्या सेवा समाप्त करण्यात आल्या. प्रादेशिक विभागात कोठेही तात्पुरती नियुक्ती मिळावी म्हणून अपीलकाराने विनंती केली होती. त्यानुसार अपीलकारास भांडारपाल पदावर नियुक्ती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८५६/०२**

**श्री. सचिन भानुदास गोडांबे**
**धावडे आळी, गोडांबे वाडा,**
**भोसरी पुणे ४११ ०३९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सचिन गोडांवे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३०.०३.२००९ रोजी अर्ज करुन, मा.जयंत पाटील (तात्कालीन गृह मंत्री) यांना अपीलकाराने दि.१९.०२.२००९ रोजी पत्र पाठवून "स्फोटकाचे अंतरंग" या पुस्तकातील आक्षेपार्ह मचकुराबाबत सदर पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी केली होती. त्या पत्रावर काय कार्यवाही झाली याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२०.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, "स्फोटकाचे अंतरंग" या पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी केली होती. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चित योग्य नाही. सदर प्रकरणी अपीलकाराने "स्फोटकाचे अंतरंग" या पुस्तकावर बंदी घालण्याबाबत केलेल्या सूचनावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास पुरवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८५८/०२**

**श्रीमती.सुनिता अशोक ति-हेकर**
**शांताबाई काशिनाथ कोरे,**
**११६, विजापूर नाका,**
**झोपडपट्टी नंबर-१,**
**मस्जिदच्या मागे, सोलापूर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर,**
**ता.जि.सोलापूर.**

**जन माहिती अधिकारी तथा अतिक्रमण प्रतिबंधक अधिकारी**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर,**
**ता.जि.सोलापूर.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती. सुनिता ति-हेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२५.०६.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. मार्च २००७ ते जून २००९ पर्यंतचे सविस्तर व कंपनीसह पगार पत्रक सही शिक्का सहीत.
२. सेवा पुस्तकाचे सर्व पाने झेरॉक्स सत्यप्रतीसह.
३. ज्या बँकेत पगार आहे त्या बँकेचे नाव व खाते क्रमांक माहिती सही शिक्का सहीत.
४. मार्च २००७ ते जून २००९ पर्यंत फंडाची सविस्तर जमा किती काढले किती प्रत्येक महिन्याची माहिती व फंड खाते क्रमांकासहीत.
५. आपल्या कार्यालयात जा.क्र.१११०/०६ CJM कोर्ट सोलापूर दि.१२.०४.२००६ च्या आदेशाने MA ३३४१०३ या केस क्रमांकाने दर महा ७००/- रुपये कपातीचे आदेशाची

कार्यवाही कोठे पर्यंत झाली याचे लेखी स्पष्टीकरण देणे वरील सर्व माहिती हि सक्षम अधिका-यांने आपल्या सही व शिक्काने सर्व माहिती देणे आवश्यक आहे.

अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही वैयक्तिक असल्याने सदरची माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.०७.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१३.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीची असून, सदर त्रयस्थ व्यक्तीने माहिती देउ नये असे कळविले असल्याने सदरची माहिती देता येत नाही असे दि.३०.०७.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने श्री.अशोक ज्ञानोबा ति-हेकर या त्रयस्थ व्यक्तीची माहिती मागीतली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ११ मधील तरतुदीनुसार त्रयस्थ पक्षाची संम्मती घेणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यास त्रयस्थ पक्षाने हरकत घेतली असल्याने माहिती नाकारण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अर्जावर नियमानुसार व समर्पक उत्तर अपीलकारास दिले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८५९/०२**

**श्री.अरविंद लक्ष्मण कोगेकर**
**गर्व्हमेंट कॉलनी, मिरज कुपवाड रोड,**
**प्लॉट नं.५७, मु.पो.मिरज, जि.सांगली ४१६ ४१०. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली,**
**ता.जि.सांगली.**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली,**
**ता.जि.सांगली. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.अरविंद कोगेकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०७.२००९ रोजी अर्ज करुन, श्री दत्त नागरी सहकारी पत संस्था मर्या.मीरज यांचेकडून श्री.शंकर हिंदुराव पाटील रा.पाटगाव ता.मिरज यांनी मोटार सायकलसाठी १९९६ मध्ये कर्ज घेतले. सदर कर्जासाठी अपीलकार श्री.अरविंद कोगेकर जामीन होते. संस्थेने सहकार न्यायालयात केस दाखल केली. अपीलकाराविरुध्द कर्ज वसूलीबाबत कार्यवाही सुरु केली. त्याबाबत अपीलकाराने संस्थेकडे दि.१६.०६.२००९ रोजी अर्ज करुन एकूण आठ मुद्यावर लेखी माहिती मागितली होती. संस्थेने अपीलकारास माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१५.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. दि.२५.०९.२००९ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित होते. जन माहिती अधिकारी हे नागपूर येथे

विधानमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात व्यस्त होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत आवश्यकती माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी संस्थेकडून माहिती गोळा करुन अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६०/०२**

**श्री. सुकुमार नाबु चौगुले**
**बुर्ल्ली, ता.पालुस,**
**जि.सांगली. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**मा.उच्च न्यायालय,**
**मुंबई फोर्ट, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**मा.उच्च न्यायालय,**
**मुंबई फोर्ट, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.सुकुमार चौगुले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, अपीलकार यांचे भाउ श्री.भाउसाहेब नाबू चौगुले यांचेसह इतर आठ व्यक्तीविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.१९८८/८६ व १९९०/८६ ते १९९५/८६ आणि २०७०/८४, २०७१/८६ ही एकूण ९ अपीले दाखल केलेली होती. यामधील ८ रिट याचिका निकाल झालेला आहे. यातील रिट याचिका क्र.१९९३/१९८६ बाबत कोणतीही माहिती किंवा निकालाची तारिख संगणकावर उपलब्ध होत नाही. प्रस्तूत याचिकेच्या निकालाच्या सही-शिक्कासहीत नक्कला उपलब्ध करून देण्याची अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मुंबई उच्च न्यायालय माहितीचा अधिकार अधिनियम, २००६ मधील नियम १९ च्या परंतुकानुसार न्यायालयीन प्रक्रीयेसंबंधीची अथवा कागदपत्रासंबंधीची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत पुरविता येत नाही. अशी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता मुंबई उच्च न्यायालयाचे नियम आणि आदेशानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन प्राप्त करुन घेता येईल असे जन माहिती अधिका-यांनी दि.२५.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले असल्याचे आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०२०/०२**

**श्री. धनंजय म.चित्रीव**
**प्लॉट नं.१२, प्रोसेस कॉलोनी,**
**स्वावलंबीनगर, नागपूर २२. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस महासंचालक**
**ॲन्टीकरप्शन ब्युरो, मुंबई**
**मधु इंडस्ट्रीयल इस्टेट, १ ला मजला,**
**लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक**
**ॲन्टीकरप्शन ब्युरो, वरळी, मुंबई. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.धनंजय चित्रीव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, दि.२७.१२.२००९ ला पोलीस उप आयुक्त श्री.राजेंद्रसिंग गौत्तम यांची विभागीय चौकशी करणेबाबत. पोलीस उप आयुक्त श्री.राजेंद्रसिंग गौत्तम यांचे स्वत:ची पत्नी, मुले यांचे नावे असलेली चल /अचल संपत्तीचा तपशिल वर्णन व खरेदीचा कालावधी. पो.उप अधिक्षक श्री.मिलिंद तोतरे यांचे स्वत:चे पत्नी, मुले यांचे नावे असलेल्या चल/अचल संपत्तीचा तपशिल वर्णन व खरेदीचा कलावधी इत्यादी माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने नियमानुसार प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक होते. परंतू अपीलकाराने प्रथम अपील दाखल न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकारास जा.क्र.१७६, दि.०५.०३.२००९ अन्वये मुध्दा क्र.१ बाबत माहिती पुरविली. अर्जातील मुध्दा क्र.२ बाबत माहिती उपलब्ध नाही. गृह विभाग यांचेशी संपर्क करावा. मत्ता व दायित्वाचा सिलबंद लाखोटा सादर केलेला आहे असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. सदर तीन्ही मुद्यावर जन माहिती अधिकारी, ॲन्टी करप्शन ब्युरो महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी माहिती दिली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. ॲन्टी करप्शन विभागात पोलीस अधिका-यांनी सादर केलेले मत्ता व दायित्वाचे सिलबंद लखोटे हे त्यांच्या सक्षम प्राधिकरणाकडे म्हणजेच शासनाच्या गृह विभागाकडे तथा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर करण्यात येतात असेही प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी आयोगास लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. यावरून सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०२६/०२**

**श्रीमती.रतना ना.जाधव**
**कमलाबाई मडके**
**महात्मा फुले चौक,**
**गड्डीपूरा, वाशिंम,**
**ता.जि.वाशिंम ४४४ ५०५.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**३ रा मजला, बँक ऑफ इंडियाची इमारत,**
**म.गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,**
**३ रा मजला, बँक ऑफ इंडियाची इमारत,**
**म.गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती.रतना जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०४.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.११.२००९ रोजी अर्ज करुन, १) उपजिल्हाधिकारी पदावर निवड झालेल्या अपंग अस्थिव्यंग उमेदवाराबाबत २) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ आणि महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब पदावर निवड झालेल्या अपंग अस्थिव्यंग उमेदवाराबाबत ३) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब पदावर निवड झालेल्या अपंग अस्थिव्यंग उमेदवाराबाबत सन २००४ ते २००८ या कालावधीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.१२.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास राज्य सेवा मुख्य परिक्षा २००४ च्या अधिसूचनेची प्रत उपलब्ध करुन दिली. वास्तवीक अपंगाच्या आरक्षित पदासाठी आवेदन पत्र करतांना अपंग उमेदवारांनी सदर अधिसूचित केलेल्या पदाकरिता विहित केलेल्या अपंगत्वाच्या प्रकारात ते पात्र ठरतात का याची खात्री करुन तसा दावा आवेदनपत्रात करणे आवश्यक असते. तसे समजूनच त्यांची उमेदवारी विचारात घेण्यात येते. प्रस्तूत परीक्षेकरिता अस्थिव्यंगाचा विहित दावा केलेल्या उमेदवारानाच संबंधीत पदाकरिता पात्र म्हणून त्यांची शिफारस केली. तथापि अपंगत्वाचा दावा उमेदवारांनी नियुक्ती प्राधिकारी शासनाकडे सिध्द करणे आवश्यक असते कारण नियुक्तीचे अधिकार शासनाचे आहेत. यामुळे अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडे उपलब्ध नसल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२५३७/०२**

**श्री. डी.के.भोयर**
**गुरूकृपा नगर,**
**पुन्यधाम मंदिर,**
**हुडकेश्वर रोड, नागपूर. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.,**
**२०१ जॉली भवन नं.७, नवीन मरीन लाईन्स,**
**सर.वल्लभदास ठाकरसी मार्ग, चर्चगेट,**
**मुंबई ४०० ०२०.**

**जन माहिती अधिकारी तथा झोनल अकांउट अधिकारी**
**महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि.,**
**२०१ जॉली भवन नं.७, नवीन मरीन लाईन्स,**
**सर.वल्लभदास ठाकरसी मार्ग, चर्चगेट,**
**मुंबई ४०० ०२०. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.डी.के.भोयर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, अपीलकाराची सेवेतील रूजू तारिख, कार्यमुक्तीची तारिख व पगार दर अपीलकारासोबत कार्यरत असलेले श्री.नथ्थू नारायण डोळसकर सेवकाची व अपीलकाराची एकच असतांना श्री.डोळसकर यांना पेन्शन जास्त मिळते. अपीलकारास कमी मिळते. श्री.डोळसकर यांना दि.०५.०१.२००६ पासून प्रतिमहा रू.११६८/- पेन्शन मिळते. अपीलकारास उशिराने दि.२२.०६.२००६ पासून रु.१०७९/- (प्रतिमहा) इतकी कमी पेन्शन मिळते. याबाबत अपीलकाराने अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकार व श्री.डोळसकर यांच्या सेवानिवृत्ती वेतनाची परिगणना मुंबई प्रादेशिक कार्यालयाने केली असल्याचे नमुद करुन जन माहिती अधिका-यांनी परिगणनेचे तक्ते अपीलकारास पुरविले.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अपीलकारा उपस्थित होते. सदर प्रकरणी माहिती प्राप्त करण्याकरिता पाठपुरावा करण्यात स्वारस्य नसल्याचे अपीलकाराने आयोगासमोर सांगीतले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्र.२००९/४०१५/०२

**श्री. राजेश नारनवरे**
**कॉटर्स नं.बी/०६/९३ हुडको कॉलनी,**
**एम.आय.जी जरीपटका, नागपूर ४०० ०१४.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग,**
**१३ वा मजला, सेंटर नं.१, वल्ड ट्रेट सेंटर,**
**कफप्रेड, कोलाबा, मुंबई ४०० ००५.**

**जन माहिती अधिकारी तथा झोनल अकांउट अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग,**
**१३ वा मजला, सेंटर नं.१, वल्ड ट्रेट सेंटर,**
**कफप्रेड, कोलाबा, मुंबई ४०० ००५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.राजेश नारनवरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०५.२००९ रोजी अर्ज करुन, ८ युडीसी पदाव्यतिरिक्त इतर पद मंजूरी नसतांना विनापरवानगीने पदे कळविणे, महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोगाचे दि.२७.०९.२००६ चे आदेशाचा भंग होईल किंवा नाही. याबाबत माहिती मागीतली होती. आयोगाचे नियम व सर्व आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in. या संकेत स्थळावर विनामुल्य उपलब्ध असल्याचे व ते downloadable असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.०६.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने महाराष्ट्र विज नियाकत आयोगाच्या, प्रकरण क्र.११/२००६ संबंधीच्या आदेश दि.२७.०९.२००६ बाबत स्पष्टीकरण मागीतले होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (एफ) अनुसार स्पष्टीकरण देण्याची बाब माहितीच्या अधिकारात मोडत नाही. म्हणून जन माहिती

अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०७.२००९ रोजी आदेश काढून प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे / प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे अर्ज करुन महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोगाच्या दि.२७.०९.२००६ च्या आदेशाबाबत स्पष्टीकरण अभिप्राय मागीतले होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मध्ये माहितीची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास पुरविणे बंधनकारक आहे. माहितीबाबत जन माहिती अधिका-याकडून स्पष्टीकरण अथवा अभिप्राय मागण्याची अधिनियमात तरतुद नाही. सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाबाबत स्पष्टीकरण/अभिप्राय देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उत्तर दिले आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०७.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०१५/०२**

**श्री. राजेश नारनवरे**
**कॉटर्स नं.बी/०६/९३ हुडको कॉलनी,**
**एम.आय.जी जरीपटका, नागपूर ४०० ०१४.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग,**
**१३ वा मजला, सेंटर नं.१, वल्ड ट्रेट सेंटर,**
**कफप्रेड, कोलाबा, मुंबई ४०० ००५.**

**जन माहिती अधिकारी तथा झोनल अकांउट अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग,**
**१३ वा मजला, सेंटर नं.१, वल्ड ट्रेट सेंटर,**
**कफप्रेड, कोलाबा, मुंबई ४०० ००५.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.राजेश नारनवरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०५.२००९ रोजी अर्ज करुन, ८ युडीसी पदाव्यतिरिक्त इतर पद मंजूरी नसतांना विनापरवानगीने पदे कळविणे, महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोगाचे दि.२७.०९.२००६ चे आदेशाचा भंग होईल किंवा नाही. याबाबत माहिती मागीतली होती. आयोगाचे नियम व सर्व आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in. या संकेत स्थळावर विनामुल्य उपलब्ध असल्याचे व ते downloadable असल्याचे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.०६.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकाराने महाराष्ट्र विज नियाकत आयोगाच्या, प्रकरण क्र.११/२००६ संबंधीच्या आदेश दि.२७.०९.२००६ बाबत स्पष्टीकरण मागीतले होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (एफ) अनुसार स्पष्टीकरण देण्याची बाब माहितीच्या अधिकारात मोडत नाही. म्हणून जन माहिती

अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०७.२००९ रोजी आदेश काढून प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२२.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे / प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे अर्ज करुन महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोगाच्या दि.२७.०९.२००६ च्या आदेशाबाबत स्पष्टीकरण अभिप्राय मागीतले होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ मध्ये माहितीची व्याख्या स्पष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास पुरविणे बंधनकारक आहे. माहितीबाबत जन माहिती अधिका-याकडून स्पष्टीकरण अथवा अभिप्राय मागण्याची अधिनियमात तरतुद नाही. सदर प्रकरणी आयोगाच्या आदेशाबाबत स्पष्टीकरण/अभिप्राय देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास उत्तर दिले आहे. यावरुन जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास नियमानुसार समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०७.२००९ रोजी पारित केलेल्या आदेशात कोणताही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०२७/०२**

**श्री. मनिष ओ.खेतान**
**ओम लॉटरी सेंटर, मेन रोड,**
**खामगाव, ता.खामगांव,**
**जि.बुलढाणा. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वित्त विभाग,**
**महाराष्ट्र राज्य लॉटरी,**
**८ वा मजला, नविन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वित्त विभाग,**
**महाराष्ट्र राज्य लॉटरी,**
**८ वा मजला, नविन प्रशासकीय भवन,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.मनिष खेतान यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०७.२००९ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र राज्य लॉटरीच्या नव्याने सुरु करण्यात आलेल्या पारंपारिक सोडत योजनेकरिता दि.१६ जुलै, २००८ रोजी केलेल्या करारपत्राबाबत अनुषंगीक एकूण १३ मुद्याबाबत माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०२.०९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

महाराष्ट्र राज्य लॉटरीबाबत विविध एकूण १३ मुद्याबाबत अपीलकाराने माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२८.१०.२००९ च्या पत्रान्वये मुध्देनिहाय माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने दि.२८.१०.२००९ च्या पत्राची प्रत आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी उत्तरवादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०३४/०२**

**श्री. वामन ए.उगले**
**जनार्दन नारायण भोईर,**
**चाळ नं.२०८/६ भोईर रेशन दुकानाच्या बाजुला**
**कानसाई गांव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिलदार कार्यालय, सिंदखेड राजा,**
**ता.सिंदखेड राजा, जि.बुलडाणा.**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिलदार कार्यालय, सिंदखेड राजा,**
**ता.सिंदखेड राजा, जि.बुलडाणा. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.वामन उगले यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०४.२००८ रोजी अर्ज करुन, निमखेड, ता.सिंदखेड जि.बुलढाणा येथील गट क्र.८९ मधील जमिन संपादीत करून पाडलेल्या २० प्लॉट हाराशी करून वाटप करणे व इतर १ ते २० प्लॉटच्या खोटया हराशी बध्दल एकूण १० मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२१.०४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

निमखेड येथील प्लॉटच्या वाटपाबाबत अपीलकाराची काहीही आता तक्रार राहिलेली नाही. सदर प्रकरणी प्रश्न सोडविण्यात आला आहे असे उत्तरदवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकार व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अनुपस्थित होते. तसेच सदर प्रकरणी उत्तरवादीने आयोगापुढे सादर केलेले प्रतिपादन लक्षात घेउन मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०३५/०२**

**श्री.हरिश्चंद्र गोपिसिंग पवार**
**सी/१६, हुडको कॉलनी, मंगरूळपीर,**
**ता.मंगरूळपीर, जि.वार्शिम. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नियोजन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हरिश्चंद्र पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०४.२००९ रोजी अर्ज करुन, रोजगार हमी योजनेबाबत एकूण ८ विविध मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१५.०४.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०१.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.बा.बा.नारायणकर यांनी सुनावणी आयोजित केली. दि.१८.०७.२००९ रोजी सविस्तर आदेश पारित करुन कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलकारास पुरविली. यामुळे समाधान झाले नाही म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित नव्हते. उत्तरवादीने सुनावणी पुढे ढकलण्याबाबत आयोगास विनंती केली. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अर्जातील मुध्दा क्र. १ ते ४ मुद्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी स्तरावरील असल्याने याबाबतची माहिती स्वतंत्रपणे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ ची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन दिली मुध्दा क्र.५ बाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन द्यावी. मुध्दा क्र.६ व ७ बाबतही अपीलकारास माहिती प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पुरविली असल्याचे दिसते. सदर व्दितीय अपीलासोबत आवश्यकती कागदपत्र जोडलेली नाहीत. अर्जाची प्रत नाही. जन माहिती अधिका-यांने अपीलकारास लिहिलेल्या पत्राची प्रत नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे सादर केलेल्या प्रथम अपिलीची प्रत व्दितीय अपीलासोबत जोडलेली नाही. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/४०३६/०२**

**श्री.हरिश्चंद्र गोपिसिंग पवार**
**सी/१६, हुडको कॉलनी, मंगरूळपीर,**
**ता.मंगरूळपीर, जि.वाशिंम. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा अधिदान व लेखा अधिकारी,**
**लेखा कोष भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पु),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिदान व लेखा अधिकारी**
**अधिदान व लेखा कार्यालय, शासकीय कुटीर क्र.११/१२,**
**फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हरिश्चंद्र पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०३.२००९ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र मंत्रीमंडळ व विधानमंडळ सदस्यांच्या मासिक वेतनातून कपात झालेल्या व्यवसायकर व आयकराचे विवरणाची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०६.०४.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२०.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने व्दितीय अपीलासोबत अर्जाची प्रत जोडल नाही. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०६.०४.२००९ च्या पत्रान्वये एकूण ४ मुद्यावर माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिका-यांनी आयकर व व्यवसायकर कपातीबाबत दिलेली माहिती धादांन्त खोटी असल्याचा मुध्दा व्दितीय अपीलात उपस्थित केला आहे. सदर प्रकरणी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, जन माहिती अधिका-यांनी पुरविली असल्याचे दिसते. सदर माहिती खोटी असल्याचा अपीलकाराचा दावा दिसतो. याबाबत शहानिशा करण्याकरिता अपीलकाराने सक्षम प्राधिका-याकडे संपर्क साधावा, या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९०४/०२**

**श्री.कयामुद्दीन शेख**
**मु.पो.माळेगांव, बु.ता.बारामती,**
**जि.पुणे ४१३ ११५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त**
**दक्षिण प्रादेशिक नियंत्रण कक्ष,**
**सर.जे.जे.रोड, भायखळा,**
**मुंबई ४०० ००८.**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त**
**दक्षिण प्रादेशिक नियंत्रण कक्ष,**
**सर.जे.जे.रोड, भायखळा,**
**मुंबई ४०० ००८. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.कयामुद्दीन शेख यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०७.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.१२.२००७ रोजी अर्ज करुन, अपीलकार दि.२२.१०.२००७ रोजी आझाद मैदान पोलीस ठाणे येथे अमरण उपोषणास बसले होते. अपीलकार पोलीस शिपाई असून पुणे शहर पोलीस दलात नोकरीवर असतांना त्यांना अचानक दि.०४.१०.१९९५ रोजी नोकरीतून कमी केले. नोकरीवरुन कमी करतांना अपीलकारास पूर्व सूचना दिली नाही. नोटीस दिली नाही. भरतीच्यावेळी साक्षांकन फॉर्म मध्ये काही माहिती भरुन घेतली नाही. साक्षांकन फॉर्ममधील जे काही समजत नाही ते नंतर भरुन द्यावे असे सांगीतले होते. परंतू तेच कारण देवून नोकरीतून कमी केले. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होते. माहिती पोटी रु.१८/- इतके शुल्क भरण्याबाबत अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२३.०१.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०४.०२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय

प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन दि.०५.०३.२००८ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने मागीतलेली माहिती देणे सोईचे व्हावे म्हणून माहिती पोटी शुल्क भरण्याबाबत अपीलकारास कळविण्यात आले होते. पंरतू अपीलकाराने माहिती पोटी शुल्क भरुन माहिती स्विकारलेली नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.१४.१२.२००९ च्या पत्रानुसार आयोगाकडे लेखी खुलासा सादर केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलार्थीने माहितीपोटी कार्यालयात शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२७८४/०२**

**श्री.पंढरीनाथ महिपती बांदल**
**रा.७९/४९५, भागिरथी निवास,**
**कोथरूड, पी.एम.टी.डेपोमागे,**
**पुणे २९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**मुंबई ४०० ००३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक (विशा)**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**मुंबई ४०० ००३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक (पुनर्रचना)**
**पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**मुंबई ४०० ००३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.पंढरीनाथ बांदल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.१०.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागितली होती.

१. दि.२४.०९.२००८ रोजीचे श्री.पंढरीनाथ महिपती बांदल या अर्जदाराचे तक्रारी अर्जावर आपणाकडून झालेल्या दैनंदिन तपासाबाबतच्या कारवाईचा तपशीलात्मक अहवाल लेखी स्वरूपात मिळावे.

२. तक्रारी अर्जावरील कारवाई दरम्यान संबंधीत घटकांना काढलेल्या नोटीसा, त्यांचे घेतलेले जाबजबाब, संबंधीत घटनेबाबतचा पंचनामा, दोंषीवरील दंडात्मक कारवाई व

पिडीतास दिलेला न्याय निर्णय इत्यादी सर्व कागदपत्राच्या छायाकिंत प्रती तात्काळ मिळाव्यात.

३. मा.पोलीस महासंचालक श्री.ए.एन.रॉय साहेब या अधिका-यांचे कर्तव्य व शासनाकडून सन २००८ मध्ये घेतलेल्या वेतनाची तपशीलात्मक माहिती मिळावी.

४. म.श्री.ए.एन.रॉय साहेब यांनी वरील कालावधीत आयकर विभागास दिलेले विवरण पत्र, स्थावर मीळकंतीची तपशीलात्मक माहिती, शासनाकडून घेतलेल्या TA बिले व इतर सवलती इत्यादी सर्व कागद पत्राच्या झेरॉक्स प्रती मिळाव्यात.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत योग्य पूर्ण माहिती दिली नसल्याने अपीलकाराने दि.१५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०९.०१.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने एकूण ४ मुद्यावर माहिती मागीतली आहे. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपूर्ण, अयोग्य माहिती दिली असा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, पोलीस महासंचालक कार्यालयातील जन माहित अधिका-यांनी सदर प्रकरणी अपीलकारास ४ मुद्याबाबतची माहिती हे आदेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसाचे आत पुरवावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९२१/०२**

**श्री.ज्ञानचंद्र श्रीधर पाटील**
**शितल, दामाणि हायस्कूलचे पूर्वेस,**
**चांदणी चौक, सांगली.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.ज्ञानचंद्र पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१४.११.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. केमाअ ४ म्हणजे केंद्रिय माहिती अधिकार कायदा कलम ४ ची माहितीची फाईल प्रसिध्द केलेची तारिख व त्याच्या छायांकित प्रती.
२. ब्रेड या बेकरी उत्पादनाच्या पॅकिंगवर उत्पादनाची तारिख अथवा दिनांक छापण्याची अट शिथिल करणेसाठी बेकरी उत्पादक असो.संघटक, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, आमदार, मंत्रीमंडळ आदेश, मंत्र्यांनी दिलेली पत्र, आदेश, आपल्या विभागाने घेतलेला विधिज्ञ व इतर तज्ञांचा सल्ला, झालेला पत्र व्यवहार, ग्राहक-संघटनांचा सल्ला, त्यासाठी झालेल्या बैठकांचा इतीवृत्त अहवाल इत्यादीची कागदपत्र छायांकित प्रती.
३. नि.था.मराळे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांना महाराष्ट्र शासन, क्र.एफ.डी.एस.२००५/६३५/प्र.क्र.२२४/०५ औषधे-२ वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई ३२, दि.३०.०६.२००५ चे पत्र ज्या आधारे काढले त्यासबंधीचे

कार्यालयीन टिप्पनी व त्या पत्र व्यवहाराच्या छायांकित प्रती. तसे हे पत्रक कक्ष अधिका-यांना काढण्यास ज्यांनी आदेश दिले त्याचे पदनाम व नाव. त्या आदेशाची छायांकित प्रती.

४. वरील मुध्दा क्र २ व ३ हे ज्याचे अधारे उत्पादनाचा दिनांक छापण्यासाठी अट शिथील केली त्यास ज्या कायद्याचा अधार घेतला त्याच्या छायांकित प्रती.

५. वरील मुध्दा निहाय छायांकित प्रती किती होतात हे कळवावे म्हणजे गरजेनुसार पैसे शुल्क पाठविले जाईल.

जन माहिती अधिका-यांनी दि.१०.१२.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले की, माहिती पोटी रु.७१/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल. अपीलकाराने दि.१९.१२.२००८ रोजी Money Order रु.७१/- पाठविली. परंतू अपीलकारास माहिती मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०८.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी नोंदणीकृत टपालाव्दारे एकूण १३ पाने अपीलकारास दि.१५ जानेवारी, २००९ च्या पत्रासोबत पाठविली. अत्यंत कमी अपु-या आणि अस्पष्ट अर्थबोध न होण्यासारखा तारिखनिहाय क्रमवारीतील माहिती नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१५.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, बेकरी उत्पादक समस्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. दिलेली माहिती अपुरी अस्पष्ट अर्थबोध न होण्यासारखी दिली. माहितीपोटी रु.५/- अधिक घेतले. अर्जातील मुध्दा क्र.१ ते ४ बाबतची माहिती पुरविली नाही. उत्तरवादीनी त्रास दिला. मनस्ताप दिल्याबध्दल उत्तरवादीला शास्ती करावी. अर्जातील मुध्दा क्र.१ ते ४ बाबत माहिती देणेबाबत आदेश द्यावेत असे अपीलकाराने व्दितीय अपीलाल मुध्दे उपस्थित केले आहेत. या परिस्थितीत मी असे आदेश

देतो की, जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्रीमती.नेहा चोचे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, श्री.हि.रा.सुर्यवंशी यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास मुध्देनिहाय माहिती पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२८०/०२**

**श्रीमती.संध्या शरद कोढांळकर**
**मिथील, जुल्या व्हि.आय.पी.गेस्ट हाउस मागे,**
**रूम नं.८/१९, कृषि महाविद्यालय पुणे,**
**शिवाजीनगर, पुणे ५. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**वित्त विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती.संध्या कोंढाळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.०९.२००७ रोजी अर्ज करुन, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी यांनी कृषी विभाग, मंत्रालय यांना पाठविलेल्या प्रस्ताव क्र.आस्था/ब-४/वर्ग-४/प्रशा.सेवक/१८३४, दि.०४.०९.२००१ आणि जा.क्र./आस्था/ब-४/वर्ग-४/प्रशा.सेवक/५२७/२००३, दि.०४.०४.२००३ हे दोन प्रस्ताव वित्त विभागाने मंजूर का केले नाही? याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१८.१०.२००७ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती दिली. अपूरी, दिशाभूल करणारी माहिती दिली म्हणून अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

कृषी विद्यापीठ व सलग्न महाविद्यालयातील पदांच्या वेतनत्रुटीचा प्रस्ताव प्रशासकीय विभागाकडून प्राप्त झाला. प्राप्त प्रस्तावाबाबत वेतनत्रुटी उच्चस्तर समिती व वेतन असमानता समितीने दि.१८.०८.१९९९ रोजी सर्व संबंधीताशी विचारविनियम करून शिफारशी केल्या. या शिफारशीच्या प्रती अपीलकारास पुरविण्यांत आल्या आहेत. अपीलकाराने माहितीच्या अधिकारातील अर्ज, प्रथम अपील तसेच व्दितीय अपीलात नवीन मुध्दे उपस्थित केले असल्याचे दिसते. सदर प्रकरणी जन माहित अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती पुरविली असल्याने सदर प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९४४/०२**

**श्री.दत्ताजीराव वि.देसाई**
**रा.माडीलगे, ता.भुदरगड,**
**जि.कोल्हापूर ४१६ २०९.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मॅनेजींग डायरेक्टर**
**दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह**
**मार्केटिंग फेडरेगशन लि.**
**मुंबई ४०० ००९.**

**जन माहिती अधिकारी,**
**दि.महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह**
**मार्केटिंग फेडरेगशन लि.**
**मुंबई ४०० ००९.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.दत्ताजीराव देसाई यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, गोकुळ शिरगाव एमआयडीसी कोल्हापूर, येथील फेडरेशन गोडावूनच्या विशेष दुरुस्तीच्या कामाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१७.०२.२००७ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०७.०३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१७.०२.२००९ च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती पुरविली. सदर माहिती विसंगत असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती पुरविण्यास जाणिवपूर्वक विलंब केल्याचे दिसून येत नाही. उत्तरवादींने अपीलकारास दि.१७.२.२००७ च्या पत्रान्वये सविस्तर माहिती पुरविली असल्याचे उत्तरवादीने आयेगास दि.१७.०२.२००७ ची प्रत सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९४३/०२**

**श्री.राजाभाउ कांबळे**
**गाळा क्र.एम-६१,**
**नवीन म्हाडा सहयोग नगर,**
**जुळे सोलापुर, सोलापूर ४१३ ००४.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव (सहकार)**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.राजाभाउ कांबळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२२.०५.२००६ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

मा.सहकार आयुक्त, पुणे यांनी दि.३०.०१.२००६ रोजी विषय अनुसुचित जाती, जमाती, भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था इतर सहकारी संस्थांमधील आरक्षण अंमलबजावणी (आरक्षण लागू असताना) करण्यासंदर्भात व वेळकाढूपणा करण्यासाठी मुद्दाम आपल्याकडे मार्गदर्शन मागितलेले आहे. तेव्हा त्या संदर्भात आपण मा.सहकार आयुक्त, पुणे यांना त्या पत्रासंदर्भात आपण मार्गदर्शनाबाबत पत्र दिले का? दिले असेल तर त्याची प्रत संघटनेस द्यावी. जर का दिले नसेल तर? मार्गदर्शन अद्यापपर्यंत आपण का केले नाही त्यामागील कारण किंवा आपली काही अचडण असल्यास लेखी स्वरुपात संघटनेस पत्राव्दारे कळवावे.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला. सदर प्रस्तावावर अद्यापी निर्णय झालेला नाही. या प्रकरणी शासनाचा निर्णय होताच अपीलकारास कळविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.०६.२००६ च्या पत्रान्वये कळविले होते. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०२.१२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. विचाराधीन प्रस्तावावर आद्याप निर्णय झाला नसल्याचे पुन्हा अपीलकारास कळविण्यात आले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकाराने विचारलेली माहिती दि.१४.०५.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास उपलब्ध करुन दिली असल्याचा दि.१७.१२.२००९ रोजी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. व्दितीय अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित नव्हते. उत्तर वादीने अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९४७/०२**

**श्रीमती. सुमन बा.खरात**
**भगवान दाजी करे रा.वडूज,**
**ता.खटाव, जि.सातारा. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. महाव्यवस्थापक (परिवहन अभियांत्रिकी)**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, टपाल पेटी क्र.१९२,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम**
**बेस्ट भवन, बेस्ट मार्ग, टपाल पेटी क्र.१९२,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती. सुमन खरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करुन, श्री.बापू देवबा खरात, बसवाहक १९७२५३ यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या वारसा हक्कात सौ.सत्वशिला बापू खरात ऐवजी सौ.सुमन बापू खरात नाव दाखल करण्याबाबत अनुषंगीक माहितीची मागणी केली. जन माहिती अधिका-यांनी दि.०६.०२.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे माहिती पुरविली.

उपक्रमातील कर्मचारी स्वेच्छेने स्वत:च्या भविष्य निर्वाह निधीचा वारसा हक्कांची नोंद प्रपत्राव्दारे स्वत:च करत असल्याने तसेच केलेले वारसा हक्क रद्दबातल करण्याचा अधिकार हा कर्मचा-यास स्वत:चा असल्याने याबाबत उपक्रमातर्फे संबंधित कर्मचा-यांच्या वारसा हक्का बदलाबाबत काहीही कार्यवाही होउ शकत नाही. परिणामी सौ.सुमन बापू खरात यांच्या भविष्य

निर्वाह निधीच्या वारसा हक्कावर नोंद करता येणे शक्य नाही. आपले अपील फेटाळण्यात येत आहे.

यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.बापू देवबा खरात, बस वाहक यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या वारसा हक्काबाबत अर्जदार लग्नाची पत्नी हयात आहे. म्हणून सत्वशिला बापू खरात ऐवजी श्रीमती.सुमन बापू खरात हिचे नाव दाखल करणेबाबत अपीलकाराची मागणी आहे. सदर प्रकरणी भविष्यनिर्वाह निधी चे Nomination बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम यांना बदलता येणार नाही. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२९.०४.२००९ च्या पत्रान्वये योग्य ती माहिती कळविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** — **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** — **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९५४/०२**

**श्री. शिवशंकर वि.घोलप**
**मु.महागांव, पो.बावी, ता.बार्शी,**
**जि.सोलापूर. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**उप सचिव,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री. शिवशंकर घोलप यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०२.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क.व्ही.एएस-१०९०/४५४४/(१४५)/मावक-४ दि.२२ जून, १९९० ची झेरॉक्स सत्यप्रत.
२. शासन निर्णय, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क.व्ही.एएस-१०९०/४५४४/(१४५)/मावक-४ दि. ०६ सप्टेंबर, १९९४ ची झेरॉक्स सत्यप्रत.
३. शासन निर्णय दि.१६.१०.२००५ प्रस्तावित संस्था हस्तांतरण अर्ज संख्याची अर्ज संख्याची झेरॉक्स सत्यप्रत.
४. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक विभशा-१०९८/प्र.क्र.३९/मावक-६ मुंबई दि.०५.०५.१९९८ शासन निर्णय ज्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात आला त्या संपूर्ण फाईलची झेरॉक्स सत्यप्रती.

५. वरील मुद्दयांच्या माहितीसाठी किती रक्कम पाठवावयाची त्याची पूर्वसूचना देण्यात यावी आणि मी आपणाकडे पाठवावयाच्या रक्कमेचे मुद्दनिहाय रक्कम विवरण द्यावे.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२१.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि.२२.०६.१९९०, दि.०६.०९.१९९४, दि.१६.१०.२००५ व दि.०५.०५.१९९८ च्या शासन निर्णयाच्या प्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कलावधीत आवश्यकती कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक १६.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९५६/०२**

**श्री.दशरथ ना.राउत**
**खंडाज, ता.बारामती,**
**जि.पुणे ४१३ ११६.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**तंत्रशिक्षण संचलनालय (एम.एस),**
**३, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचलनालय (एम.एस),**
**३, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.दशरथ राउत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२८.०२.२००९ रोजी अर्ज करुन, शिवनगर विद्याप्रसारक मंडळाच्या टेक्नॉलॉजी आणि अभियांत्रिकी पॉलीटेक्नीक करिता शिक्षकांची नेमणूक करण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार पात्र उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलावण्यात आले होते. यासंबंधी अपीलकाराने एकूण ४ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.०९.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित होते.

सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराने शिक्षकाच्या मुलाखती संदर्भात ४ मुद्यावर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी श्रीमती. अैतूल अत्तार यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८९६/०२**

**श्री.गणेश ग.पवार**
**आपले घर सोसा.,**
**सर्व्हे नं.५६, नगर रोड,**
**चंदननगर, पुणे १४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**इलाखा शहर विभाग, सा.बा.विभाग, विकास विभाग इमारत,**
**३ रा मजला, जुने जकात घर, मुंबई ४०० ०२३.**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता**
**मध्य उप विभाग,**
**उप अभियंता यांचे कार्यालय, मध्य उप विभाग,**
**सा.बा.विभाग, विकास विभाग इमारत,**
**३ रा मजला, जुने जकात घर, मुंबई ४०० ०२३.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.गणेश पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०५.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

कलम ६ पो कलम (३) खंड (एक) व (दोन) अन्वये आपल्या नियंत्रणातील संपुर्ण उपविभागीय कार्यालयांना हस्तांतरण करुन, केल्याची तारीख पत्राव्दारे कळवावी.

१. आपल्या नियंत्रणातील उपअभियंते यांचे विरुध्द लेखी किंवा वृत्तमान पत्राव्दारे झालेल्या तक्रारीच्या झेरॉक्स प्रती देणे.
२. आपल्या उपविभागाला मिळालेला निधी कोणत्या हेडखाली कोण-कोणत्या कामावर खर्च झाला त्याकामाची नीविंदा नोंदवहीची झेरॉक्स प्रती देणे.

३. उपविभागीय अभियंते, शासकीय सेवेत हरज झाले पासुन ते आजतंगायत गोपनिय अहवाल, सी.आर.डी.ई. व त्यांचेकडे असलेली बेहिशोबी मालमत्ता शासनास विवरण पत्राव्दारे सादर केली आहे काय, मालमत्ता खरेदी करताना शासनाची परवानगी घेतली आहे काय, शासनआदेशा अन्वये, स्वत: व पत्नीकडून जवळच्या नातेवाईकांच्या नांवे केलेली संपती स्थावर मालमत्ता शासनास जाहिर केली आहे काय? इत्यादी गोपनिय अहवाल व विवरण पत्राच्या झेरॉक्स प्रतीत माहिती देणे.

उप विभागात उपस्थित राहून माहिती तपासावी. तसेच आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती साधन सामुग्रीचा खर्च भरल्यानंतर उपलब्ध करुन देण्यात येतील असे जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी अपीलकारास दि.३०.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.१७.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलावर दि.०३.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन आदेश पारित करुन अपील फेटाळ्ले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१४.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, शासकीय सेवा बाबी बाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती कार्यलयात येउन बघण्याची जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.३०.०५.२००९ च्या पत्रान्वये कळविले होते. अपीलकार माहिती बघण्याकरिता कार्यालयाकडे फीरकले नाहीत. कार्यालयात येउन संबंधीत कागदपत्राची तपासणी करुन निवड केलेल्या कागदपत्राच्या छायाप्रती शुल्क भरुन प्राप्त

करुन घ्याव्यात असे उत्तरवादीने अपीलकारास कळविले होते. अपीलकार माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता आले नाहीत असे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९५१/०२**
**अपील क्र.२००९/३९५०/०२**

**श्री.बापू बंडगर**
**राही नगर, बंडगर वस्ती,**
**मु.पो.माळेगाव,**
**ता.बारामती, जि.पुणे ४१३ ११५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**तंत्रशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री. बापू हनुमंत बंडगर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.११.२००८, ०७.११.२००८ रोजी अर्ज करुन, नोकरीवर पुन्हा रुजू करुन घेवून नियमानुसार कायम करणेसाठी आदेश देणेबाबत अपीलकाराने एकूण ५ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.१२.०१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी चौकशी करण्याकरिता चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालाची प्रत अपीलकारास उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे उत्तरवादीने ब्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९५२/०२**

**श्रीमती. दिपाली अ.खुस्पे**
**विलासराव शिंदे,**
**७ शिवनगर हौसिंग सोसा.,**
**कृष्णानगर, सातारा ४१५ ००३. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्रीमती.दिपाली खुस्पे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०१.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. मा.गृहमंत्री यांनी सोलापूर जिल्हयातील संजय गाधी निराधार योजनेअंतर्गत असणारा घोटाळा याची संपूर्ण चौकशी सी.आय.डी (आर्थिक) पुणे याचे मार्फत करणेचे आदेश पारित केले होते त्याची प्रत.
२. सदर जिल्हयाची संपूर्ण चौकशी करुन सी.आय.डी. (आर्थिक) पुणे यांनी संपूर्ण चौकशी करुन अहवाल आपणास सादर केला आहे. त्याची संपूर्ण माहिती व प्रती.
३. सदर चौकशी अहवालाच्या प्रती व सोलापूर जिल्हयातील सर्व तालुका निहाय चौकशी अहवालाची प्रती मिळाव्यात.
४. संबंधीत दोषीवर केलेली कारवाई व प्रस्तावित कारवाईची माहिती व त्यांच्या प्रती मिळाव्यात.

जन माहिती अधिका-यांनी दि.१२.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती दिली. सी.आय.डी.पुणे यांच्या चौकशी अहवालाची प्रत गृह विभागाकडून प्राप्त करुन घेण्यात यावी. संबंबधीत दोषीवर केलेली कारवाई व प्रस्तावित कारवाईची माहिती संबंधीत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यात यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी खोटी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन दि.२०.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे कळविले.

सोलापूर जिल्हयातील सामाजिक अर्थसहाय्य योजनेतील राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना व राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना या योजनांच्या अनुदानामध्ये झालेल्या उपहाराबाबतची चौकशी सी.आय.डी.मार्फत करण्याचे आदेश गृह विभागाकडून देण्यात आले असले तरी याबाबतच्या चौकशीचे अहवाल हे सी.आय.डी.कडून वरील योजनांची अंमलबजावणी करणा-या विभागाकडे म्हणजेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे थेट सादर केले जातात. त्यामुळे असे अहवाल गृह विभागाकडून उपलब्ध करुन देता येणार नाहीत. आपण या संदर्भातील कार्यवाही आणि अनुषंगीक माहिती मिळण्याबाबतची अपीलात केलेली विनंती वरील कारणास्तव मान्य करणे या विभागास शक्य नाही. एकूणच आपण आपल्या अपिलात मागितलेली माहिती या विभागाकडे उपलब्ध नसल्याने तसेच या विभागाच्या कक्षे बाहेरील असल्यामुळे देणे शक्य नाही. करिता मी आपले अपील फेटाळत आहे.

यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सोलापूर जिल्हयातील संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत असणारा

घोटाळ्या संदर्भात सी.आय.डी. (आर्थिक) पुणे यांचे मार्फत चौकशीच्या आदेशासंदर्भात तसेच सदर प्रकरणातील संबंधीत दोषीवर केलेली कारवाई बाबतची माहिती मागीतली होती. सोलापूर जिल्हातील राष्ट्रीय सामाजिक अर्थसहाय्य योजनेच्या निधीच्या अपहाराबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शिफारशीनुसार गृह विभागाने दि.२१ मे, २००९ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सी.आय.डी. मार्फत चौकशी आदेश दिलेले आहेत असा उत्तरदवादीने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी सी.आय.डी. मार्फत केलेल्या चौकशीचा अहवाल सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे पाठविला जाईल. सदर वस्तुस्थिती उत्तरवादीने अपीलकारास कळविली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९५३/०२**

**श्री.शिवाजी सुगरे**
**सलगर वस्ती,**
**डोणगाव रोड, सोलापूर. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त भवन,**
**३ रा मजला, ८३ डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**जन माहिती अधिकारी,**
**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय,**
**धर्मादाय आयुक्त भवन,**
**३ रा मजला, ८३ डॉ.ॲनी बेझंट रोड,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.शिवाजी सुगरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०१.२००८ रोजी अर्ज करुन, श्री.बोराडे, सहा.धर्मादाय आयुक्त यांचे विरुध्द खटला दाखल करण्यास परवानगी मागणी संदर्भातील पत्रव्यवहारावरील कारवाईबाबत अनुषंगीक ३ मुद्यावर माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.२६.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते.

सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, सहा.धर्मादाय आयुक्त यांच्या विरुध्द खटला दाखल करण्यास परवानगी संदर्भात केलेल्या पत्रव्यवहारासंबंधी ३ मुद्यावर माहिती मागीतली होती. अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे उत्तरवादीने व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल आयोगास सादर करुन प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९४८/०२**

**श्री.रमेश दि.पुंडे**
**३, धनदा अपार्ट,**
**भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड,**
**एरंडवन, पुणे ४११ ००४.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.रमेश पुंडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०३.०१.२००९ रोजी अर्ज करुन, आय.जी.आय. कार्यालयाला, दि.०१.०१.२००८ ते दि.३१.१२.२००८ या कालावधीत पाठविलेल्या पत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०७.०२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.१६.०४.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकाराने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे. उत्तरवादीस असलेली कामे/ उपलब्ध साधन सामुग्री याचा विचारकरता कलम ७(९) च्या तरतुदीनुसार माहिती देण्यास उत्तरवादीने दाखविलेल्या असमर्थतेचे समर्थन करुन प्रथम अपील दि.१८.०५.२००९ रोजी आदेश काढून फेटाळ्ले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, आय जी आर कार्यालयात पाठविलेल्या पत्राच्या छायाप्रतीची अपीलकाराने मागणी केली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास अर्जातील मुध्दा क्र.२ बाबत माहिती पुरविली.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८२४/०२**

**श्री.रसिक शेठ**
**१८, लिला मंदिर, पेस्तोमसागर,**
**रोड नं.०४, चेंबूर, मुंबई ४०० ०८९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**जालना नगर परिषद, जालना,**
**ता.जि. जालना.**

**जन माहिती अधिकारी,**
**जालना नगर परिषद, जालना,**
**ता.जि. जालना.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.रसिक शेठ यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०३.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०१.२००७ रोजी अर्ज करुन, प्रोप्रायटर, रेशनल इंडस्ट्रीयल कारर्पोरेशिन, जालना, यांनी अर्ज दि.२५.०६.१९९६ व तत्पुर्वीच्या अर्जान्वये नगरपरिषद जालना कडील जकाती पोटी भरण्यात आलेली रक्कम रु.२, ३९, २१६.७५ परत मिळण्याबाबत विनंती केली होती. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, जालना यांचे न्यायालयाने क्र.१९९५/नपाप्र/कार्या ३/३८६ अनुसार दिलेल्या निर्णयावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-याने विहित कालावधीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.२७.१२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जिल्हाधिकारी, जालना यांचे न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीची अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८२२/०२**

**श्री.राजु शि.पिल्लेवार**
**राजेंद्रनगर कितवट ता.कितवट,**
**जि.नांदेड. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा-परिषद, नांदेड,**
**जि.नांदेड.**

**जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मीक बाल विकास सेवा योजना,**
**प्रकल्प कितवट, जि.नांदेड. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.राजू पिल्लेवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

संबंधीत लाभार्थ्यांची देयकाचे स्वरूप? कोणास अदा केले याचा तपशिल १७ CDP स्कीम अंतर्गत शासनाकडून आलेली निधी किती? व त्याचा नाव निहाय तपशील? कार्यालयाअंतर्गत खादीलवार बजट अंतर्गत त्याचा वापर कुठे केला त्याचा लेखी खुलासा? व पंचशिल महिला बचट गट चिखली येथील यांची शासनाकडून आलेली निधी किती व त्यांची निधी किती उचल केली व त्यांचा पूर्ण तपशिल या सर्व छायांकित प्रती इ.बाबी.

मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत मिळाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०७.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. परंतू सुनावणी घेण्यात आली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सदर प्रकरणी अपीलकारास जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी विहित कालावधीत माहिती पुरविलेली नाही. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची काटेकोरपणे अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलकारास पोस्टाने माहिती पाठवावी. सदर प्रकरणी माहिती पुरविण्यास जाणीवपूर्वक विलंब केल्याचे दिसून येत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८२१/०२**

**श्री.धनराज. उ. गिते**
**मिश्रा निवास पंचशिलनगर परळी.**
**जि.बीड ४३१ ५१५. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.धनराज गिते यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.११.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०८.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

१. विधीमंडळ अधिवेशन मे, २००४ मधील तारांकित प्रश्न क्र.४२०९४ (विधान परिषद) मध्ये आपण दिलेल्या आदेशाचे, आलेल्या चौकशी अहवालाच्या व सभागृहात दिलेल्या उत्तराच्या सत्य प्रती.
२. विधीमंडळ अधिवेशन डिसेंबर, २००५ मधील विधान परिषद तारांकीत प्रश्न क्र.१०, ००७ व १०, ११ या तारांकित प्रश्नाच्या बाबतीत आपण दिलेल्या आदेशाच्या, चौकशी अहवालाच्या व सभागृहास / आमदारास आपण दिलेल्या उत्तराच्या सत्यप्रती.
३. विधी मंडळ अधिवेशन मार्च २००७ मधील विधानसभा तारांकित प्रश्न/कपात सुचना क्र.५० बाबत उपरोक्त प्रमाणे माहितीच्या सत्यप्रती.

४. विधीमंडळ अधिवेशन डिसेंबर, २००० मधील अतारांकित प्रश्न क्र.१०, ५०६ बाबत आपल्या कार्यालयाने चौकशी कामी दिलेल्या आदेशाच्या व प्राप्त चौकशी अहवालाच्या व दि.०७.१२.२००० रोजी विचारलेल्या प्रश्नास मा.मंत्री महोदयांनी दि.०४.०४.२००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या सत्यप्रती देणेस विनंती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२६.०८.२००८ रोजी पत्र पाठविले. प्रश्नाची माहिती हवी असेल तर तो प्रश्न क्रमांक व त्याच्याशी संबंधीत विषयाचा उल्लेख व आमदार महोदयांच्या नावाचा उल्लेख करुन शासनास पाठवावे व सदर माहिती कोणत्या कारणासाठी हवी आहे याचा उल्लेख करावा. त्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असेही उत्तरवादीने अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-यांकडे दि.१३.०९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. दि.०८.०८.२००८ च्या अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रश्नाचे विषय काय आहेत याचा उल्लेख करावा त्या अनुषंगाने प्रश्नाची माहिती घेउन त्यांच्या प्रती अपीलकारास देण्यात येतील असे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२६.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विधानमंडळाचे मे २००० ते २००७ मधील तारांकित प्रश्नाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहितीच्या अधिकारातील अर्जामध्ये विधानमंडळातील अधिवेशन सन २००० ते २००७ पर्यंत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाचा क्रमांक नमूद केला असून त्या प्रश्नाची संबंधीत असलेला विषय नमूद केलेला नाही. ते कोणत्या अमदारांनी

उपस्थित केला आहेत ते देखील नमूद केलेले नाही. यामुळे अपीलकारास माहिती देता आली नसल्याचे उत्तरवादीने दि.२६.०८.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. तसेच प्रथम अपिलीय प्राधिका-यांनीही अपीलकारास दि.२६.०९.२००८ च्या पत्रान्वये कळविले. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९५५/०२**

**श्री.दशरथ ना.राउत**
**खंडाज, ता.बारामती,**
**जि.पुणे ४१३ ११६.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा संचालक**
**तंत्रशिक्षण संचलनालय (एम.एस),**
**३, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी,**
**तंत्रशिक्षण संचलनालय (एम.एस),**
**३, महापालिका मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.दशरथ राउत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०६.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.११.०१.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे इन्स्टीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲड इंजिनिअरिंग, माळेगाव, ता.बारामती, जि.पुणे या तंत्रनिकेतनमधील गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी चौकशी समिती नेमून चौकशी केली. चौकशी समिती अध्यक्ष प्रा.सौ.एम.ए.चिगटेरी शासकीय तंत्रनिकेतन पुणे यांनी चौकशी दरम्यान संस्थेला दिलेली प्रश्नावली व त्यास अनुसरून संस्थेने सादर केलेली सर्व कागदपत्रे अहवालासोबत जोडलेली आहेत. तरी चौकशी समिती अहवालासोबत जोडलेली सर्व कागदपत्रांची छायाप्रत मिळावी ही विनंती.

जन माहिती अधिका-यांनी नियमानुसार कोणतीही माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.०९.०४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, प्रा.सौ.चिटगेरी, समिती अध्यक्ष यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची सहपत्रासह छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास प्रा.चिटगेरी समितीच्या अहवालाची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

**<u>आदेश</u>**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९६०/०२**

**श्री.तुषार झेंडे**
**मु.पो.म्हसोबाचीवाडी,**
**ता.इंदापूर, जि.पुणे ४१३ १०५.** **.... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.तुषार झेंडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०७.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२४.०२.२००६ रोजी अर्ज करुन, श्री.भाउसाहेब हरिबा चांदगुडे यांच्या विनंतीप्रमाणे पुर्ननिरीक्षण अर्जावर विचार करुन उप आयुक्त (पुरवठा) पुणे विभाग, पुणे व जिल्हापुरवठा अधिकारी, पुणे यांच्या आदेशांना अंतरिम स्थगिती दिली. अंतरिम स्थगिती आदेशाबाबत एकूण ११ अनुषंगीक मुद्यावर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने दि.२०.०४.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, रास्तभाव दुकानासंदर्भात अंतरिम स्थगीती आदेश दिले. अंतिम आदेश का देण्यात आले नाहीत याबाबत एकूण ११ मुद्यावर अपीलकाराने माहिती मागीतली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती विहित वेळेत दिली नाही. चुकीची माहिती दिली. सदर दोन्ही अधिका-याची कृती निश्चितच योग्य नाही. माहिती पोटी व पोस्टाचा खर्च रू.४०/- इतके शुल्क अपीलकाराने भरले आहे. अपीलकारास मुद्येनिहाय माहिती उत्तरवादीने पुरविलेली नाही. पुरविलेली माहिती चुकीची असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुध्दा उपस्थित केला आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराचे रू.४०/- शुल्क परत करावे. अपीलकारास ११ मुद्यावर मुद्येनिहाय माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८३०/०२**

**श्री.सुधाकर मोतीराम करोडे**
**३२, राजीव गांधी नगर,**
**मुकूंदवाडी, औरंगाबाद. .... अपीलकार**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सुधाकर करोडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०२.०७.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०८.०४.२००९ रोजी अर्ज करुन, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सदस्यपदी नियुक्तीसाठी अपीलकाराने दिलेल्या कार्य आढावा प्रस्ताव अर्जा संबंधी एकूण ९ मुद्यावर माहिती मागीतली होती. सदर प्रकरणी मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.१४.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सदस्य पदी नियुक्तीसाठी अपीलकाराने अर्ज केला होता. अर्जानुसार बनवलेल्या निवड यादीत अपीलकाराच्या नावाचा समावेश आहे का? अर्ज नाकारला असेल तर त्याची कारणे द्यावीत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास त्यांच्या महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सदस्य पदावरील नेमणूकीबाबत काय झाले या संबंधीची माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८२७/०२**

**श्री.कन्हैय्यालाल जळगांवकर**
**१९/१, राजलक्ष्मी, राधाकृष्णनगर,**
**दूध फेडरेशन रोड, जळगांव. .... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.कन्हैय्यालाल जळगांवकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१.०४.२००७ रोजी अर्ज करुन, पाटबंधारे विकास महामंडळाची रचना, कामकाज आणि त्याच्या सदस्यांच्या कार्य-कर्तव्यासंबंधी एकूण १५ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१८ हा रद्द झाला असून त्या ऐवजी सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ प्रख्यापित झाला आहे असे जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव अ.अ.सबनीय यांनी अपीलकारास कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन दि.१०.०६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.०२.०८.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. अपीलकार प्रथम अपिलावरील सुनावणीकरिता अनुपस्थित होते. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास पुरविलेल्या माहितीचे समर्थन करुन त्यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे दि.०६.०९.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे व्यथीत होउप अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, पाटबंधारे मंडळाच्या रचना व कामकाजाबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी लेखी अहवाल सादर करून प्रतिपादन केले. सदर प्रकरणी उपलब्ध माहिती अपीलकारास पुरविली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८२६/०२**

**श्री. ओमप्रकाश सिताराम अग्रवाल**
**१२२ नवी पेठ, जळगांव ४२५ ००१. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.ओमप्रकाश अग्रवाल यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१३.०८.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

जळगांव शहराची (वाढीव हद्द) विकास योजना शासनास मंजूरीसाठी सादर करतांना महानगरपालिकेने मेहरूण स.नं.४१५ (भाग) मधील आ.क्रं.१४३ (प्रा.शाळा) व आ.क्र.१४४ (खेळाचे मैदान) हे आरक्षणातून वगळून रहिवास क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत कळविले होते, त्यास बदल (मॉडीफिकेशन) क्रं.८७ व ८८ दिला होता.

परंतु शासनाने सदरचा नगरपालिकेचा प्रस्ताव मंजूर न करता सदर आरक्षात लक्षणीय बदल करण्याचे ठरवून सदर आरक्षणातून काही भाग वगळून काही भागात आरक्षण कायम करण्याचे ठरवून त्या बदलास इ.पी.३४ व ३५ देण्यात आला होता.

१. सदरचा निर्णय म्हणजेच, काही भाग आरक्षण मुक्त करण्याचा व काही भागात आरक्षण कायम करण्याबाबत, शासन स्तरावर घेण्यात आलेल्या निर्णयास आधार / पुरक /

कारणीभूत अशी सचिव, संचालक, नगररचना अगर अन्य सक्षम अधिकारी यांनी केलेली टिपणीची नक्कल पुरविण्यात यावी.

२. तसेच आरक्षणातून वगळण्यात आलेल्या जागेचा नकाशा / आकृती ज्या आधारावर तयार केलेली आहे त्या संबंधीची आपल्या कार्यालयात उपलब्ध दस्त अगर नकाशाची नकल पुरविण्यात यावी.

३. तसेच सदर इ.पी.३४ व ३५ चे बाबतीत मे.संचालक नगररचना, पुणे यांनी कलम ३१ चे अनुषंगाने शासनास पाठविलेल्या दि.३०.०४.२००३ चे अहवालात इ.पी.३५ चे आरक्षण वगळून ते क्षेत्र रहिवास विभागात सामाविष्ट करण्याची शिफारस केली होती. मात्र संचालक यांचे अभिप्रायानंतर विकास योजना (इ.पी.) मंजूर करताना मंत्री महोदय यांनी सदर आरक्षण कायम करणेबाबत केलेली टिपणी व अन्य सक्षम अधिकारी यांचा, आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेला, सदर निर्णयास पूरक/आधारभूत/कारणीभूत दस्त ची नकल पुरविण्यात यावी.

मागणीप्रमाणे माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.०३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, जळगाव शहराच्या (वाढीव हद्द) विकास योजनेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे

आदेश प्राप्त झाल्यापासून ६ आठवडयाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार जन माहिती अधिका-याविरुध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८२०/०२**

**श्री.अनिल भास्कर भोळे**
**सत्यम चाळ, शॉप नं.२,**
**आंबेडकर नगर बस स्टाप समोर,**
**पि.एल.लोखंडे मार्ग,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०८९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नंदुरबार,**
**ता.जि.नंदुरबार.**

**जन माहिती अधिकारी,**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नंदुरबार,**
**ता.जि.नंदुरबार.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.अनिल भोळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०९.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२६.०५.२००८ रोजी अर्ज करुन, खानदेशातील महादेव कोळी/टोकरे कोळी जमातीची सेवा व शैक्षणिक प्रकरणे ठाणे, नंदुरबार व नाशिक या कार्यालयात किती प्रकरणे प्रलंबित आहेत त्याची सविस्तर माहिती. प्रलंबित प्रकरणापैकी किती प्रकरणामध्ये पोलीस दक्षता विभागामार्फत चौकशी झालेली आहे. त्या प्रकरणाची उमेदवाराची नावे व पत्ते इत्यादी एकूण ६ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती.

मागणीप्रमाणे आवश्यकती माहिती विहित कालावधीत पुरविण्यात आली नाही. यामुळे अपीलकाराने दि.३०.०६.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, खानदेशातील महादेव कोळी/ टोकरे कोळी जमातीच्या प्रलंबित जमातीदाव्याच्या पडताळणीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (च) या व्याख्येत बसत नाही. माहिती उपलब्ध करून देण्यास समितीकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही. कार्यालयात उपस्थित राहून नस्त्याचे निरीक्षण करावे. त्यानंतर निवडक माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०८.०८.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सदर पत्राची प्रत आयोगास सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, अपीलकाराने मागणी केलेली माहिती नाकारण्याऐवजी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ४ आठवडयाचे आत अपीलकारास उपलब्ध करून द्यावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३६७२/०२**

**श्री.पांडुरंग देवकाते**
**प्लॉट नं.१७४, प्राईम रेसिइन्सी समर्थ नगर,**
**पोस्ट ऑफीस जवळ, सुपरव्हिजन संगणक केंद्र,**
**समर्थनगर, औरंगाबाद. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन)**
**राज्य गुप्तवार्ता विभाग,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने विधान भवन, २ रा मजला,**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक**
**राज्य गुप्तवार्ता विभाग,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,**
**जुने विधान भवन, २ रा मजला,**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.पांडूरंग देवकाते यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.०१.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. सहाय्यक गुप्तवार्ता अधिकारी सरळ सेवा भरती २००८ मध्ये आतापर्यंत झालेली एकुण भरती बाबतची पुढील प्रमाणे माहिती पाहिजे. यामध्ये लेखी स्वरुपात संख्याची नोंद असलेली छायांकित प्रत प्रमाणित केलेली पाहिजे. केवळ या क्रमांकाच्या माहितीत झ ालेले शारीरिक मोजमाप चाचणी, पूर्व परिक्षा (वस्तुनिष्ठ स्वरुपाची चाचणी), मुख्य परीक्षा (लेखी स्वरुपाची चाचणी) व मुलाखत चाचणी या सदर भरतीच्या प्रक्रियेत

उपस्थित उमेदवारांची संख्या तसेच एकुण अनुउपस्थित उमेदवारांची एकुण संख्या, पात्र उमेदवारांची एकुण संख्या, अपात्र उमेदवारांची एकुण संख्या अनुक्रमे देण्यांत यावी.

सदर प्रकरणी अपीलकाराने एकूण १२ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. उत्तरवादीने अपीलकारास खालीलप्रमाणे उत्तर दिले.

१. आपण मागितलेली माहिती उघड केल्यास अधिकाअधिक लोकहिताची हमी मिळेल अशी जन माहिती अधिका-यांची खात्री पटत नाही. कारण आपण मागितलेली माहिती ही आपल्या वैयक्तिक हिताकरिता मागितलेली आहे. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(१) (ई) च्या तरतुदी अन्वये मी आपण मागितलेली माहिती नाकारत आहे.

२. त्याचप्रमाणे आपण मागितलेली माहिती कोणताही व्यापक लोकहिताच्या दृष्टीने उघड करणे समर्थनीय दिसून येत नाही. तसेच आपण मागितलेली माहिती दिल्यास अन्य कोणत्या वैयक्तिक माहितीशी संबंधित असल्याने त्या व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लघंन होईल. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(१) (जे) व कलम ११ च्या तरतुदी अन्वये मी आपण मागितलेली माहिती नाकारत आहे.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.२६.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, अपीलकाराने वेयक्तिक हीताकरिता माहिती मागीतली असल्याच्या करणावरुन माहिती नाकारण्यात आली आहे. अपीलकाराने मागीतलेली माहिती कोणताही व्यापक लोकहिताच्या दृष्टीने उघड करणे समर्थनीय दिसून येत नाही. मागीतलेली माहिती दिल्यास अन्य कोणत्या वैयक्तिक माहितीशी संबंधीत असल्याने त्या व्यक्तीच्या खाजगीपणाचे

विनाकारण उल्लघन होईल म्हणून उत्तरवादीने उक्त अधिनियमातील कलम ८(१) (जे) व कलम ११ च्या तरतुदीनुसार माहिती नाकारण्यात आली आहे. सदर प्रकरणी जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले असल्याने त्यामध्ये कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. याप्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९६५/०२**

**श्री.शिवाजी हणमंत सुगरे**
**सलगर-वस्ती, डोणगांव रोड,**
**सोलापूर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.शिवाजी सुगरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०४.०१.२००८ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. सोलापूर जिल्हा परिषदेतील शिक्षक श्री.सुनिल शिवाजी सुगरे व श्रीमती. शोभना शिवाजी सुगरे यांची सेवा बाहेरील कालावधी सेवाकालावधी घोषित करुन सदर कालावधीचे वेतन व इतर आर्थिक लाभ देणे वा इकडील दि.३०.०५.२००५, दि.०५.०८.२००५, दि.२१.०९.२००६, दि.१६.११.२००५ व दि.०६.११.२००६ या पत्रावर वेळोवेळी ठेवलेली कार्यालयीन टिप्पणी त्या अनुषंगाने संबंधिता बरोबर झालेला पत्रव्यवहार त्यावर घेतलेला निर्णय त्या प्रमाणे संबंधितास व अर्जदारास कळविलेले पत्र इत्यादीची सविस्तर माहितीसह सर्व कागदपत्राच्या प्रमाणित नकला द्याव्यात.

२. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण/४००७/(२५१/०७)/प्राशां-५, दि.०५.१२.२००७ नुसार श्री.शि.ह.सुगरे, से.नि.व.ली.जि.प.सोलापूर यांच्या सेवा निवृत्ती नंतरच्या आर्थिक लाभा संदर्भात दिलेल्या

पत्रावर ठेवलेली टिप्पणी, दिलेल्या कालमर्यादेत संबंधिता बरोबर केलेला पत्रव्यवहार व राष्ट्रीय अनु.जनजाती आयोग भारत सरकार यांच्याकडे पाठविलेला अहवाल इत्यादी सर्व कागदपत्राच्या प्रमाणित नकला द्याव्यात.

मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. प्रथम अपीलावरील सुनावणीकरिता अपीलकार उपस्थित राहीले नाहीत. सदर प्रकरणी माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करून, श्री.सुनिल शिवाजी सुगरे व श्रीमती. शोभना शिवाजी सुगरे यांच्या सेवा कालावधी/वेतनाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (आस्था-२) यांनी अपीलकारास दि.०८.०२.२००८ च्या पत्रान्वये मुध्दा क्र.१ बाबत माहिती पुरविली आहे. मुध्दा क्र.२ बाबत दि.२८.०४.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती उपलब्ध करून दिली असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव श्री.प्रकाश हिर्तेकर यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करून प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९७४/०२**

**श्री.विष्णु कृष्णा सोनावणे**
**मु.पो.ओझेंर्ड ता.वाई,**
**जि.सातारा.** **.... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य अधिकारी**
**गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य अधिकारी**
**गृह निर्माण भवन,**
**वांद्रे (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.विष्णू सोनावणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.११.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२७.०३.२००६ रोजी अर्ज करुन, अपीलकाराने नाव खोली क्र.९ वरील मी कसे झाले. नारायण उमा गायकवाड यांचे नाव नोंद कसे झाले. याबाबतची माहिती, यासंबंधी साक्षांकित नक्कलाची मागणी केली होती. मागणी केलेली माहिती विहित कालावधीत प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती दिली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, खोली क्र.९ वर अपीलकाराचे नाव होते ते कमी करुन श्री.नारायण उमा गायकवाड यांचे नाव का दाखल केले याबाबत माहिती मागीतली होती. जन माहिती

अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही. सदर दोन्ही अपीलका-याची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थिती सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९७१/०२**

**श्री.भास्कर का. गायकवाड**
**बी-६ अेबीसी एम्प्लॉईस हौसिंग सोसा.,**
**पवनानगर, चिंचवड, पुणे ३३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.भास्कर गायकवाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०५.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.११.२००६ रोजी अर्ज करुन, खाली नमुद केलेली माहिती मागीतली होती.

१. श्री.शशीकांत छबुराव ढवळे, अधिव्याख्याता यांनी शासनाच्या सेवेत रुजू होण्यापूर्वी अथवा रुजू होताना, त्यांच्या पूर्वीच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर केले. सदर अनुभवाच्या प्रमाणपत्रामध्ये नमुद केलेल्या नियुक्तीस संबंधित विद्यापीठाचे मान्यता पत्राची सत्यप्रत आपले कार्यालयास सादर केली असेल तर त्याची सत्यप्रत मिळावी.
२. अधिव्याख्यात्यांच्या नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता नसतानाही, त्यांची सेवा वेतननिश्चितीसाठी ग्राहय धरण्याबाबत शासनाचे काही आदेश असतील (शासन निर्णय) तर त्याची सत्यप्रत मिळावी.
३. मा.अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, यांचे पत्र क्र.१५(२) (१८६)/१४५१३/दहा, दि.१०.०१.२००२ च्या पत्राची सत्यप्रत मिळावी.

४. मा.संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आपले कार्यालयास पाठविलेले पत्र क्र.४/आस्था/२००२/शा.४५२, दि.०४.०३.२००२ च्या पत्राची सत्यप्रत मिळावी.

५. आपले विभागाचे शासन निर्णय क्र.वेतनि ६५०२/४७ (८/०२) तांशि-४, मंत्रालय, मुंबई ३२ दि.१८.०९.२००३ मधील अनु.क्र.३ मध्ये नमुद केलेला, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२७६ सेवा ३, दि.२३.०४.२००३ ची सत्यप्रत मिळावी.

६. श्री.एस.पी.ढवळे यांना लोकसेवा आयेगाने अथवा इतर प्राधिकरणाने ६ वेतनवाढी देण्याबाबत शिफारस केली असल्यास त्याची माहिती सत्यप्रतींसह मिळावी.

७. श्री.एस.सी.ढवळे, अधिव्याख्याता यांची खाजगी विना अनुदानीत संस्थेतील सेवा लक्षात घेउन सुधारित वेतन निश्चित करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती सह माहिती मिळावी.

८. एखाद्या अधिका-यांने अवैध व खोटे कागदपत्र शासनास सादर करुन आर्थिक लाभ घेतले व शासनाची फरसवणूक केली तर फसवणूक करणा-या अधिका-यांविरूध्द काय कारवाई करण्यात येते. याबाबतची माहिती सत्यप्रतींसह मिळावी.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) (घ) (त्र) विचारात घेता, सदर प्रकरणी अपीलकाराने मागीतलेली माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य होत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.१६.०१.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.१५.०१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.२०.०२.२००७ रोजी कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, श्री.एस.सी.ढवळे, अधिव्याख्याता, शासकीय औषधनिर्माण शास्त्र

महविद्यालय, कराड यांचे वेतननिश्चितीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती दिलेली नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९६८/०२**

**श्री.गणेश ग.पवार**
**ग.आपलेघर सोसा.,**
**स.नं.५६, नगर रोड,**
**चंदनगर, पुणे ४०० ०१४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव (सेवा)**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (दक्षता)**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.गणेश पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०३.२००९ रोजी अर्ज करुन, खाली नमूद केलेली माहिती मागीतली होती.

शासकीय सेवेत हजर झाले पासून आजतगायत आपल्या कार्यालयाचे सक्षम अधिकारी तथा अधिक्षक अभियंता हे शासकीय सेवेत हजर झाले पासुन ते आजतगायत गोपनीय अहवाल कॅरेक्टर रिपोर्ट आणि डिपार्टमेन्ट इन्क्वॉरी व त्यांचेकडे असलेली बेहिशोबी मालमत्ता शासनास विवरण पत्राव्दारे सादर केली आहे काय, शासन आदेशा अन्वये स्वत: व पत्नीकडून जवळच्या नातेवाईकांच्या नावे केलेली संपत्ती स्थावर मालमत्ता शासनास विवरण पत्राव्दारे जाहिर केली आहे काय इत्यादी गोपनीय अहवाल विवरण पत्राच्या झेरॉक्स प्रती कलम ११ पो.कलम (१) अन्वये देण्यात यावी व कलम ६ पो.कलम (३) खंड (एक) व (दोन) अन्वये पुढील कार्यवाई करण्यात आली.

राजन र.शहा, अधिक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ११ नुसार श्री.शहा यांनी शासनास नियमानुसार सादर केलेले मत्ता व दायित्व विवरणपत्राची प्रत उपलब्ध करुन देण्यास हरकत घेतली असल्याने ती अपीलकारास उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी दि.२४.०६.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. माहिती मिळाली नसल्याने अपीलकाराने दि.३०.०६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याचे दि.०६.०८.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी उत्तरवादी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अधिक्षक अभियंता श्री.शहा यांचेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. अपीलकारास जन माहिती अधिका-यांनी दि.२४.०६.२००९ च्या पत्रान्वये समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९६७/०२**

**श्री.हेमंत दि.शिवदास**
**एफ १, एम.एस.प्लाझा,**
**६ क कामाठीपुरा, सातारा. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.हेमंत शिवदास यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०४.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९.०२.२००७ रोजी अर्ज करुन, १) विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांच्या माहे डिसेंबर, २००६ व जानेवारी, २००७ च्या बैठकीच्या इतिवृत्ताची साक्षांकित नक्कल. २) विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांनी तपासणीसाठी मिळालेल्या अर्जाची अध्यक्षोन विहित केलेल्या नोंदवहीची माहे जुलै, २००६ ते सप्टेंबर, २००६ ची छायाप्रत मागीतली होती. अपीलकाराने मागणी केलेली माहिती वि.जा.प्र.प.समिती, पुणे यांचेशी संबंधित असल्याने आवश्यक माहिती समितीकडून उपलब्ध करुन घ्यावी असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.०७.०३.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील दाखल केले. विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांचेकडे अपीलकाराने माहितीची मागणी करावी. आवश्यक माहिती उपलब्ध करुन देणेबाबत समितीस कळविण्यात आले असल्याचे प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास दि.१९.०४.२००७ च्या पत्रान्वये

कळविले.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित नव्हते.  सुनावणीचेवेळी अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांचेकडील बैठकीच्या इतिवृत्ताची / नोंदवहीची छायाप्रत मागीतली होती.  अपीलकाराने मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.  सदरहू माहिती समितीकडून प्राप्त करून घ्यावी असे अर्जाची प्रत समितीकडे पाठवून अपीलकारास दि.०७.०३.२००७ व दि.१९.०४.२००७ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**          **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९**          **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९७८/०२**

**श्री.नंदकिशोर वि.थोरात**
**देवी लिंक हौसिंग सोसा.,**
**ई-८, लिंक रोड, चिंचवड,**
**पुणे ४११ ०३३.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**कामगार-८, उद्योग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**कामगार-८, उद्योग उर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.नंदकिशोर थोरात यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०८.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१६.१०.२००८ रोजी अर्ज करुन, पुणे कार्यालयात लिपीक-टंकलेखक या पदासाठी निवडलेल्या उमेदवाराचे आदेश संशयास्पद असल्याने व गैरमार्गाचा अवलंब केला असल्याने आदेश त्वारित रद्द करण्याबाबत केलेल्या दि.१७.०७.२००८ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कारवाईची माहिती, प्रधान सचिवांनी कार्यभार स्विकारल्यापासून कर्मचा-याच्या तक्रारीच्या अनुषंगाने काय चौकशी केली व त्यांना न्याय देण्यास काय निर्णय घेतले त्याचा तपशिल, किती जिल्हयातील कार्यालयास भेटी दिल्या, त्या दौ-याचा तपशिल, अधिकारी / कर्मचा-याच्या अडचणी व ग्रा-हाणी सोडविण्यासाठी कोठकोठे बैठका घेतल्या, प्रधान सचिव यांनी संपूर्ण महाराष्ट्रात केलेल्या दौ-याच्या तपशिल व कामाचा तपशिल, महिने व तारिख निहाय माहिती, प्रधान सचिवांचे मासिक वेतन किती याचा तपशिल, तसेच त्यांनी वापरलेल्या शासकीय वाहनावरील इंधनाच्या खर्चाचा तपशिल, श्री.लाकसंवार कामगार उप आयुक्त, पुणे यांना कामगार उप आयुक्त पदी मे, ०७ मध्ये बढती दिल्यानंतर लगेच

जून, ०७ मध्ये अप्पर कामगार आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार जवळजवळ ११ महिने देउन त्यांचेकडे तो कार्यभार ठेवण्याचे शासनाचे धोरणाचा व उध्देशाचा तपशिल इत्यादी माहिती मागीतली होती. माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.०२.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी दि.२२.०६.२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, लिपीक-टंकलेखक पदासाठी निवडलेल्या उमेदवाराचे आदेश संशयास्पद असल्याने आदेश रद्द करण्याबाबत व इतर विविध अनुषंगीक मुद्याबाबत माहिती मागीतली होती. अपीलकारास दि.१३.०७.२००९ च्या पत्रान्वये विनाशुल्क माहिती पुरविण्यात आली असल्याचा उत्तरवादीने आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्यात आली असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३३७२/०२**

**श्री.सुरेश वासुदेवराव पाटील**
**घर क्र.१२ जूनी ठवरे कॉलनी,**
**नागपूर १४.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक (मांस)**
**महानिर्मिती, एस्ट्रेंल बॅटरीज,**
**विस्तारीत इमारत,**
**धारावी रोड, मांटुंगा, मुंबई ४०० ०१९.**

**जन माहिती अधिकारी तथा आस्थापना अधिकारी (मासं-२) व (मासं-८)**
**महानिर्मिती प्रकाशगड,**
**२ रा मजला, प्लॉट नं.जी-९, अनंत काणेकर मार्ग,**
**स्टेशन रोड, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सुरेश पाटील यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१७.०५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१०.०१.२००८ रोजी अर्ज करुन, श्रीमती.टी.एन.मुधोळकर, उप मुख्य लेखाधिकारी, श्री.व्ही.एच.मानवटकर, सहाय्यक लेखापाल यांच्यावर संचालक (दक्षता व सुरक्षा) मुंबई यांनी दि.०५.०४.२००६ अन्वये राबविलेल्या कार्यवाहीचे दस्तऐवज पुरविण्याबाबत मागणी केली होती. मागणीप्रमाणे दस्तऐवज पुरविण्यात आले नसल्याने अपीलकाराने दि.२४.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. श्रीमती.मुधोळकर यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची आवश्यकता नसल्याचे संबंधीत सक्षम अधिका-यांने निर्णय घेतल्याने त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही केलेली नाही. श्री.मानवतकर यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्यांना ताकीद देण्यात आलेली आहे. सदर पत्राची प्रत अपीलकारास पाठविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले. दि.०९.०४.२००८ रोजी

आदेश पारित केले. यामुळे समाधान झाले नसल्याने व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०७.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

जन माहिती अधिका-यांनी दि.१७.०३.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित करून आदेश पारित केले. यावरुन अर्जावर जन माहिती अधिका-यांनी दि.१७.०३.२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली असल्याने प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी पारित केलेल्या आदेशात बदल करण्याची आवश्यकता नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** | **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** | **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२८१/०२**

**श्री.नामदेव दगडूजी क्षीरसागर**
**संत ज्ञानेश्वर नगर, हुतात्मा चौक,**
**आंळदी रोड, भोसरी, पुणे ३९.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**महावितरण प्रकाशगड,**
**४ था मजला, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.**

**जन माहिती अधिकारी,**
**महावितरण प्रकाशगड,**
**४ था मजला, बांद्रा (पू),**
**मुंबई ४०० ०५१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.नामदेव क्षीरसागर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१७.११.२००७ रोजी अर्ज करुन, व्यापक स्वरुपात विधान मंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीस सन २००३ ते २००६-०७ या वर्षाचा पाठविलेल्या अहवालाची सहपत्रासह प्रतीची मागणी केली होती. महाराष्ट्र विधान मंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीस पाठविलेल्या अहवालावर आद्याप काही निर्णय झाला नाही. सदर अहवाल समितीच्या विचाराधीन असल्याने अहवालाची प्रत अपीलकारास उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२२.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

मागील परिणामाने (Retrospective effect) पदोन्नती मिळावी यासाठी अपीलकाराने महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीकडे दि.०५.०४.२००७ रोजी निवेदन सादर केले होते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विधान मंडळ अनुसूचित जाती कल्याण समितीच्या अध्यक्षांनी दि.०४.०६.२००७ च्या पत्रान्वये ७ दिवसाचे आत अहवाल मागीतला होता. उत्तरवादीकडून क्र.२८९०७, दि.१७.०७.२००७ च्या पत्रानुसार समितीस अहवाल सादर करण्यात आला. सदर अहवालाची प्रत सहपत्रासह उपलब्ध करुन देण्याची अपीलकाराची मागणी आहे. सदर अहवालावर समितीने निर्णय घेतल्यानंतर अपीलकारास मागणीप्रमाणे तात्काळ माहिती पुरविण्यात येईल असे लेखी म्हणने उत्तरवादीने आयोगास दि.१०.१२.२००९ रोजी सादर केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी, अपीलकाराच्या मागणीबाबत अनुसूचित जाती कल्याण समितीशी संपर्क साधावा. त्यानंतर अनुसूचित जाती कल्याण समितीच्या सल्ल्यानुसार सदर प्रकरणी अपीलकारास माहिती पुरविण्याची आवश्यकती पुढील कार्यवाही करावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३८६१/०२**

**श्री.सुरेशबाबु तळभंडारे**
**१४३, बुधवार पेठ मिलींद नगर,**
**सोलापुर ४१३ ००२. .... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप महानिरीक्षक (प्रशासन)**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहिंद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१.**

**जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहिंद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१. .... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.सुरेशबाबु तळभंडारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१०.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१५.०४.२००९ रोजी अर्ज करुन, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयातील कार्यरत विधी अधिकारी यांनी तयार केलेली एकूण ७ पानाची छाननी टिप्पणीच्या छायाप्रतीची मागणी केली होती. विधी अधिका-यांने तयार केलेली Scrutiny Note ची प्रत गोपनीय असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी तथा उप सहाय्यक (वि.चौ.) श्री.भा.स.निकम यांनी नाकारले. तसे अपीलकारास दि.२४.०४.२००९ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२३.०५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम क्र.८(१) (ड) (छ) (त्र) मधील तरतुदीनुसार माहिती नाकारली. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलकार उपस्थित नव्हते. सुनावणीचेवेळी जन माहिती अधिकारी यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

अपीलकारास स्वत:चे निर्दोषत्व सिध्द करण्यासाठी संबंधीत फाईलवरील पान क्र.५२७ ते ५३३ वरील कागदपत्राच्या / टिप्पणीच्या प्रतीची मागणी केली होती. गोपनीय माहिती असल्याच्या कारणावरुन माहिती नाकारण्यात आली. अपीलकारास स्वत:च्या बचावासाठी माहिती हवी आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती पुरवावी.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२७९/०२**

**श्री.तुकाराम विष्णू कवडे**
**१७/अे.सी/ ३ इमारत,**
**सूर्यलोकनगरी हडपसर,**
**पुणे ४११ ०१३.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव**
**महसूल विभाग, (कक्ष ल-४),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल विभाग, (कक्ष ल-४),**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.तुकाराम कवडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०१.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१८.१०.२००८ रोजी अर्ज करुन, पोट हिस्सा ७१/१ ते ७१/२३ घोपरडीगाव पुणे या पाटील वतन जमिनी होत्या काय? शासनाने पोलीस पाटील वतन रद्द कायद्या १९६२ चा पास केला आहे काय? या कायद्याची अमंलबजावणी दि.०१.०१.१९६३ पासून करण्यात आली आहे काय? इत्यादी एकूण २२ मुद्यावर अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकाराने दि.१९.११.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वतन जमिनीचा वापर शेतीसाठी करावा. वतन जमिनीचा वापर बगर शेतीसाठी केल्यास ५०% दंड करण्याची अधिनियमात तरतुद होती. वतन जमिन धारकांनी अधिनियमातील तरतुदीचे उल्लघंन केलेल्या विरुध्द काय कारवाई करण्यात आली याबाबतची माहिती अपीलकारास उपलब्ध करुन देणेबाबत संबंधीत तहसिलदारास महसूल व वन विभागाने सूचना द्याव्यात. हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरविण्यात यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२७०/०२**

**श्री.दिगंबर शंकर गिरमे**
**सी.टी.एस.४२२, कसबा पेठ,**
**पुणे ४११ ०११.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी,**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.दिगंबर गिरमे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०५.०६.२००७ रोजी अर्ज करुन, पोलीस आयुक्त, पुणे यांच्या अखत्यारितीतील फरसाण, पोलीस ठाणे या कार्यालयातील पोलीस अधिका-यांनी सन १९९३ मध्ये केलेल्या कार्यवाहीबाबत दोन मुद्यावर माहिती मागीतली होती. १) फौजदारी दंड प्रक्रिया संहिता नियम ११० (ई) (जी) आणि भ.दं.वि.कलम ३२५ अन्वये कारवाई करण्यापूर्वी अपीलकारास नोटीस देणे आवश्यक होते. तसेच या कलमाखाली करण्यात येणारी कारवाई ही सराईत गुन्हेगारासाठी करण्यात येते. तसेच दोन्ही कायद्याच्या कलमाखालील एकत्रित कारवाई कशी होउ शकते. २) विधी व न्याय विभागाकडून आलेल्या दि.२२.०८.२००३ च्या पत्रावर काय कार्यवाही करण्यात आली. याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी दि.१६.०४.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास सविस्तर माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.०५.०७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयेगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, अपीलकाराच्या तक्रार अर्जावर काय कारवाई केली याबाबत अपीलकाराने जन माहिती अधिका-याकडे मागणी केली होती. अपीलकाराने सन १९९३ साली त्यांच्या स्वत:च्या जन्मदात्या आईच्या हातावर जबर मारहाण केल्याची फरसाणा पोलीस स्टेशन, पुणे येथे तक्रार प्राप्त झाली होती. तेथील पोलीसाकडून गु.र.क्र.६७/९३ भा.द.वि.कलम ३२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यावरही अपीलकारापासून फिर्यादीस धोका होण्याची शक्यता वाटल्याने कसबा पेठ, पुणे येथील तात्कालीन पोलीस अधिका-याने विशेष कार्यकारी दंडाधिकारी, शहर विभाग, पुणे यांच्या न्यायालयात चॅप्टर केस क्र.१५३/९३ फौ.दं.प्र.स.११० (ई) (जी) अन्वये प्रोसिडींग पाठवून प्रतिबंधक कारवाई केली होती. त्यात अपीलकाराकडून चांगल्या वर्तणुकीचा रु.३०००/- चा बॉण्ड दि.०४.०५.१९९३ रोजी घेण्यात आला. ही कारवाई विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांना मिळालेल्या अधिकारात व तात्कालीन परिस्थितीनुसार करण्यात आल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून आले असे उत्तरवादीने अपीलकारास दि.१६.०४.२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. यावरुन अपीलकारास उत्तरवादीने माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२२६९/०२**

**श्री.दिगंबर शंकर गिरमे**
**सी.टी.एस.४२२, कसबा पेठ,**
**पुणे ४११ ०११.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**गृह विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.दिगंबर गिरमे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०९.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.१९.०४.२००७ रोजी अर्ज करुन, संबंधीत फाईल, पत्रव्यवहार, टिप्पण्या, आदेश, कागदपत्राची पहाणी करुन आवश्यक उत्तारे, टिप्पणी, आदेश, पत्रव्यवहाराच्या साक्षांकित प्रती मिळण्याची मागणी केली होती. अपीलकारास शासनपत्र क्र.ममाअ ०२०७/पुणे-१४/पोल-१३, दि.२३.०४.२००७ व क्र.सीएपी ०२०७/पुणे १४/पोल-१३, दि.१६.०४.२००७ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही असे उत्तरवादीने दि.१८.०५.२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने दि.२२.०५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१०.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, संबंधीत फाईल, पत्रव्यवहार, टिप्पण्या, आदेश, कागदपत्राची तपासणी करुन साक्षांकित छायाप्रती मिळण्याची मागणी केली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिका-यांची कृती निश्चितच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास संबंधीत फाईल निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावी. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत फाईलचे निरीक्षण करावे. त्यानंतर निवडक कागदपत्राच्या साक्षांकित प्रती अपीलकारास उपलब्ध करुन द्याव्यात.

**आदेश**

**अपील मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४८४/०२**

**श्री. ताराचंद मुलमुले**
**समता कॉलनी नागभीड,**
**पो.व ता.नागभीड,**
**जि.चंद्रपूर. .... अपीलकार**

**<u>विरूध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.ताराचंद मुलमुले यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०१.०९.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार उपस्थित होते. तक्रारदार हजर नव्हते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात अर्ज करून, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भुमि अभिलेख यांच्या कामकाजाबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाल नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/२५८६/०२ दाखल केले होते. तक्रारदाराने प्रश्नोत्तर स्वरूपात माहिती मागीतली होती. प्रश्नोत्तर स्वरुपाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत मोडत नाही. तक्रारदाराचा अर्ज पुढील कारवाईकरिता जमाबंदी आयुक्तांकडे पाठविण्यात आला. असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले होते. तक्रारदाराने मागणी केलेल्या कागदपत्राचा जाणीवपूर्णक शोध घेउन ६० दिवसाचे आत तक्रारदारास माहिती पुरवावी असे राज्य माहिती आयोगाने दि.२७.०५.२००९ रोजी आदेश पारित केले होते. ६० दिवसाहून अधिक कालावधी उलटून गेला तरी गैरतक्रारदाराने

माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४८४/०२ ही तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. तक्रारदारास माहिती पुरवावी अशा अधिक्षक भूमि अभिलेख, चंद्रपूर जि.चंद्रपूर यांना दि.२२.०६.२००९ च्या पत्रान्वये गैरतक्रारदाराने सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आवश्यकती माहिती अपीलकारास पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदार तथा अवर सचिव श्री.माधव काळे यांनी तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

(रामानंद तिवारी)
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४८५/०२**

**श्री. पी.बी.सहस्त्रभोजनी**
**३५-बी, हिंदूस्थान कॉलनी,**
**अमरावती रोड, नागपूर ४४० ०३३.** .... अपीलकार

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** .... उत्तरवादी

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.पी.बी.सहस्त्रभोजनी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार तसेच तक्रारदार उपस्थित होते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने नागपूर सुधार प्रन्यासचे अधिक्षक अभियंता (निलंबित) श्री.एन.पी.वासवानी यांच्याविरुध्द केलेल्या तक्रारीवरील कारवाईची माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे माहिती दिली नाही म्हणून तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/२५६१/०२ सादर केले होते. गैरतक्रारदाराने, तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती द्यावी असे आयोगाने दि.२२.०५.२००९ रोजी आदेश पारित केले. गैरतक्रारदाराने विहित वेळेत तक्रारदारास माहिती दिली नसल्याने त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का सुरु करु नये याबाबतही खुलासा सादर करण्याबाबत आयोगाचे आदेश होते.

तात्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव श्री.आडिवरेकर हे दि.१५.०१.२०१० पर्यंत रजेवर असून सद्या ते परदेशात (USA) आहेत. सदर प्रकरणातील मूळ

कागदपत्रे श्री.आडिवरेकर, सह सचिव यांनी हाताळली असून या बाबतची मूळ कागदपत्रे त्यांच्या दालनातून दि.२१.१२.२००९ रोजी प्राप्त करुन घेण्यात आली आहेत. यासंदर्भात तात्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सह सचिव श्री.आडिवरेकर यांनी अमेरीका येथून ई-मेल पाठविला असून, या प्रकरणी झालेल्या विलंबाबद्यल क्षमा याचना करुन आयोगाची माफी मागितलेली आहे.

श्री.वासवांनी यांना नागपूर सुधार प्रन्यासने "अधिक्षक अभियंता" या पदावरुन "कार्यकारी अभियंता" या पदावर दि.१५.०७.२००९ रोजी पदावनत केले आहे. तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या प्रस्तावानुसार श्री.वासवानी यांच्याविरुध्द न्यायालयात अभियोग दाखल करण्यास दि.०१.१०.२००९ रोजी नागपूर सुधार प्रन्यासने मंजूरी दिली असून त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मा.विशेष न्यायालय, नागपूर येथे खटला दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

गैरतक्रारदाराने वर नमुद केल्यानुसार आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. यावरुन तक्रारदाराने श्री.वासवाणी बाबत केलेल्या तक्रारीसंबंधीची कारवाई करण्यात आली आहे. तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती मिळाली असल्याने मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४८७/०२**

**श्री.निळकंठ ठाकरे**
**जरी पटका पोलीस ठाणे,**
**नागपूर शहर.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस महासंचालक**
**शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.निळकंठ ठाकरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०५.२००८ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार उपस्थित होते. तक्रारदार उपस्थित नव्हते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराची एक वर्ष वेतनवाढ रोखण्याची दिलेली शिक्षा त्यांनी भोगली आहे. त्यामुळे तक्रारदारांची आडवून ठेवलेली वेतनवाढ / पदोन्नती त्यांना देण्यात यावी. अशी दि.१२.११.२००७ च्या अर्जान्वये मागणी केली होती. तक्रारदाराची वार्षिक वेतनवाढ जुलै, २००७ पासून सुरु होणार असल्याने जुलै, २००८ मध्ये सदरची शिक्षा संपल्यानंतर अपीलकार यांचे प्रकरण पदोन्नतीकरिता वर्तुळांकित पध्दतीने निवड मंडळासमोर ठेवण्यात येईल व सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात येईल असे गैरतक्रारदाराने तक्रारदारास कळविले होते. यामुळे समाधान झाले नसल्याने तक्रारदाराने गैरतक्रारदाराकडे प्रथम अपील दाखल केले होते. गैरतक्रारदाराने सुनावणी आयोजित करुन दि.०८.०२.२००८ रोजी आदेश पारित केले. वेतनवाढ / पदोन्नती दिली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर

तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. गैरतक्रारदारांनी आयोगासमोर असे प्रतिपादन केले की, तक्रारदारास पदोन्नती देण्यात आली आहे. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदाराची मागणी पूर्ण झाली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/३९६६/०२**

**श्री.न.वि.देशपांडे**
**२२, सागर सोसायटी,**
**सहकारनगर नं.२, पुणे ९.** **.... अपीलकार**

**<u>विरुध्द</u>**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव**
**जलसंपदा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

अर्जदार श्री.न.वि.देशपांडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०९.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.३१.०१.२००६ रोजी अर्ज करुन, जलसंपदा विभागातील उप विभागीय स्तरावरील खुल्या गटातील अभियंत्याविषयी म्हणजे उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अभियंता आणि सहाय्यक अभियंता (१) याचे विषयी थेट सेवाभरती संबंधी एकूण ३ मुद्याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. जन माहिती अधिका-यांनी विलंबाने दि.२६.०७.२००६ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती पुरविली. तत्पूर्वी अपीलकाराने दि.०४.०५.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. उत्तरवादीने दि.०३.०४.२००६ च्या पत्रासोबत पूर्वीच माहिती दिली होती. उत्तरवादीने माहिती देण्यास टाळाटाळ केली. माहिती विलंबाने दिली असल्याने संबंधित अधिका-याविरुध्द दंडात्मक कारवाई करावी असा मुध्दा उपस्थित करुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.१८.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी तसेच अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

सहाय्यक अभियंता श्रेणी-२ संवर्गातील सर्वश्री गाढवे, सबनीस व भोसले यांना उपविभागीय अभियंता या पदावर जुलै, २००३ मध्ये पदोन्नती देण्यात आली आहे. सदर अधिका-यांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव दि.०१.०४.२००० च्या निवडसूचीमध्ये त्यांची सुधारित जेष्ठता विचारात घेउन मान्य करण्यात आले आहे. त्यानुसार सदर अधिका-यांचे पदोन्नतीचे आदेश स्वतंत्र धारिकेतून दि.०७.०८.२००३ मधून निर्गमित करण्यात आले होते. सदर धारिका दि.०१.०४.२००० च्या निवडसूचितील पात्र अधिका-यांच्या पदोन्नतीचे आदेश ज्या धारिकेतून काढण्यात आले होते त्यासोबत नव्हती. ज्यावेळी अपीलकाराने माहिती मागीतली होती. त्यावेळी सदर धारिका उपलब्ध होउ शकली नाही. पदोन्नतीच्या आदेशासंदर्भात नोंदवहीमध्ये घेण्यात आलेल्या नोंदी श्री.देशपांडे यांना माहिती उपलब्ध करुन देतांना विचारात घेण्यात आल्या असा जन माहिती अधिका-यांनी लेखी अहवाल आयोगास सादर करुन विलंबाबाबत खुलासा सादर करुन क्षमा याचना केली. जन माहिती अधिका-यांनी / प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ कशी केली याबाबत अपीलकाराने खुलासेवार आयोगासमोर प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४८८/०२**

**श्री.कवडुजी ज. यनपेड़डीवार**
**शांतीनगर, वॉर्ड नं.८, कृषी बाजार रोड मूल,**
**ता.मूल, जि.चंद्रपूर ४४१ २२४.** .... अपीलकार

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उप नियंत्रक**
**महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.** .... उत्तरवादी

**विवेचन**

तक्रारदार श्री.कवडुजी यनपेड़डीवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार तसेच तक्रारदार उपस्थित होते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिाकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन महाराष्ट्रातील अतिक्रमण धारक पात्र व अपात्र लोकांना जमिनीचे स्थायी पट्टे देणेबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. माहिती मिळाली नसल्याने तक्रारदाराने आयोगाकडे अपील क्र.२००९/१८६४/०२ दाखल केले होते. वन जमिनीवरील अतिक्रमणाची प्रकरणे नव्याने तपासण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार काय कारवाई करण्यात आली. याबाबत गैरतक्रारदाराने तक्रारदारास सविस्तर माहिती पुरवावी असे राज्य माहिती आयोगाने दि.२५.०३.२००९ रोजी अपील क्र.२००९/१८६४/०२ बाबत आदेश पारित केले होते. गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे क्र.४८८/०२ ही तक्रार दाखल केली.

दि.२३.०४.२००७ च्या शासन निर्णयान्वये दि.२५.१०.१९८० च्या कालावधीपर्यंतचे दावे तपासण्यासाठी गाव पातळी, तालुका पातळी आणि जिल्हा पातळीवर समित्या नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. तद्नंतर केंद्र शासनाने अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक जंगलवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अमलात आणला. त्यामुळे दि.२३.०४.२००७ चे आदेश दि.२३.०८.२००७ च्या शासन परिपत्रकान्वये स्थगित करण्यात आले. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक जंगलवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी विकास विभागाला समन्वय विभाग म्हणून केंद्र शासनाने घोषित केले आहे. सदर अधिनियमानुसार व वन जमिनीवर दि.१३.१२.२००५ पूर्वी झ ालेल्या अतिक्रमण धारकांना संरक्षण देण्यात आले आहे व त्यांना वन हक्क (लागवड, निवास, गौण वनोपज, निस्तार, संरक्षण व संवर्धन इत्यादि) मिळण्यासाठी पात्र समजण्यात आले आहे. वन जमिनीवरील अतिक्रमणदारांचे दावे तपासण्यासाठी अधिनियम / नियम यातील तरतूदीनुसार वन हक्क समिती, उप विभागीय समिती, जिल्हा स्तरीय समिती व मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सनियंत्रण समिती गठीत करण्याबाबत आदिवासी विकास विभागाने दि.२२.०२.२००८ व १७.०३.२००८ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत.

सदर प्रकरणी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता आदिवासी विकास विभागाशी संपर्क साधावा असे गैरतक्रारदाराने दि.२१.०५.२००९, २२.०७.२००९ व २१.०८.२००९ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४८३ अ/०२**

**श्री.किरण भाट्टे**
**६०६, बी/विंग, निलांगी,**
**कांदरपाडा जंक्शन, बी.पी.रोड,**
**दहिसर (प), मुंबई ४०० ०६८. .... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी (बोरीवली)**
**नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालय,**
**नाटकवाला लेन, एस.व्ही.रोड,**
**बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२. .... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.किरण भाट्टे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार उपस्थित नव्हते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे दि.२०.०९.२००७ रोजी अर्ज करुन, मंडपेश्वर गाव बोरीवली (प), मुंबई येथील सी.टी. सर्व्हे क्र.८० च्या सी.टी. सर्व्हे प्लानच्या दोन प्रतीची मागणी केली होती. गैरतक्रारदाराने मागणीप्रमाणे विहित कालावधीत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४८३ अ /०२ ही तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीकरिता तक्रारदार अनुपस्थित होते. तक्रारदाराने मागीतलेली माहिती तक्रारदारास पुरविण्यात आली असल्याचे गैरतक्रारदाराने तक्रारीवरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई (रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९ राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४३२/०२**

**श्री.आर.एम.प्रभू,**
**टी/बी/स्पेशल/१६/१६४,**
**सी.जी.एस.क्वाटर्स,**
**घाटकोपर (प), मुंबई ४०० ०६८.** **.... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**आचेडिओसीज**
**बीशप हाउस, एन.पारीख मार्ग,**
**मुंबई ४०० ००१.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.आर.एम.प्रभू यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१८.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार उपस्थित नव्हते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करून, परेल येथील सेंट पॉलस़ कॉन्हेंन्ट शाळेच्या प्लॉटबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. गैरतक्रारदाराने माहिती दिली नसल्याने राज्य माहिती आयोगाकडे तक्रारदाराने अपील क्र.२००९/१५२७/०२ दाखल केले होते. गैरतक्रारदारास माहिती उपलब्ध करून द्यावी असे आयोगाने दि.१३.०४.२००९ रोजी आदेश पारित केले होते. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नसल्याने तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे क्र.४३२/०२ ही तक्रार दाखल केली.

तक्रारदाराने विश्वस्त मंडळाबाबत (Public Trust) गैरतक्रारदाराकडे माहिती मागीतली आहे. विश्वस्त मंडळ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मोडत नाही असा मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांनी रीट याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये निर्णय दिला आहे. या पार्श्र्वभुमिवर सदर प्रकरण बंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४८३/०२**

**श्री.नानाजी डोनुजी अलसावार**
**राममंदीर जवळ, वार्ड नं.२,**
**मु.पो.तालुका चामोर्शी,**
**जि.गडचिरोली. .... तक्रारदार**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे. .... उत्तरवादी**

**विवेचन**

तक्रारदार श्री.नानाजी डोनू अहसावार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.२३.१२.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर होते. तक्रारदार उपस्थित नव्हते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी गैरतक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

१. नागरिकांचे फाईल सात दिवसात निकाली काढण्याच्या अधिनियमाचे उल्लघंन करणे सुरु असल्याने सदर अधिनियमांचे अमंलबाजवणी करण्याचे आदेश पुन्हा पारित करुन अमंलबजावणी करण्याबाबत तक्रारदाराने सादर केलेल्या विनंती अर्जावरील केलेल्या कारवाईची माहिती.

२. सात दिवसाचे आत फाईल निकाली काढण्याच्या अधिनियमाचे सन २००६ च्या शासन निर्णयाची प्रत.

३. भूमि अभिलेख कार्यालय चामोर्शी जिल्हा गडचिरोली यांनी सात दिवसात फाईल निकाली काढली नाही. सदर कायद्याचे उल्लघंन केल्याबद्दल काय कारवाई केली इत्यादी माहिती मागीतली होती.

गैरतक्रारदाराने विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/२५३०/०२ दाखल केले होते. तक्रारदारास मुध्देनिहाय माहिती पुरविण्यात आली नसल्याचे आयोगाचे निदर्शनास आले. म्हणून तक्रारदारास उर्वरित मुद्यावर मुध्देनिहाय माहिती तात्काळ पुरवावी. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार उत्तरवादी विरूध्द शास्ती लादण्याची कारवाई सुरु करण्यात येईल. असे दि.१८.०५.२००९ रोजी आदेश पारित केले होते त्यानंतर माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने आयोगाकडे क्र.४८३/०२ ही तक्रार दाखल केली.

गैरतक्रारदार, अधिक्षक भूमि अभिलेखक, गडचिरोली यांनी तक्रारदारास दि.१८.०१.२००९ रोजी माहिती पुरविली असल्याचे गैरतक्रारदाराने लेखी अहवाल आयेगास सादर करुन तक्रारीवरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले.

चार्मोशी येथील न.भू.क्र.११८२ या मिळकतीवर श्री.नारायण रामचंद्र औताडे यांचेकडून खरेदीखत दि.३०.०१.१९७७ अन्वये श्री.विठोबा डोनूजी अलसावार यांनी खरेदी घेतलेली असून त्याप्रमाणे तालुका निरीक्षक भूमि अभिलेख चार्मोशी यांनी नोंद घेतलेली आहे. सदर खरेदीखताबाबत त्यांची तक्रार असल्याने योग्य त्या न्यायालयात दावा दाखल करुन दाद मागणे आवश्यक आहे. सदर बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मध्ये मोडत नसल्याने प्रकरण नस्तीबंद्द करण्यात आल्याबाबत अर्जदारास कळविण्यात आलेले आहे. यावरुन सदर प्रकरणी तक्रारदारास माहिती पुरविण्यात आली असल्याने या प्रकरणी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्र.२००९/२८७२/०२**

**श्री.भुषण मालगावकर**
**१२२/३०२, मुकेश अपार्ट.,**
**नाडकर्णि मार्ग, वडाळा (पू),**
**मुंबई ४०० ०३७.** **.... अपीलकार**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्रबंधक**
**मुंबई विद्यापीठ,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,**
**विद्यानगरी, सांताक्रुझ (पू),**
**मुंबई ४०० ०९८.**

**जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक**
**मुंबई विद्यापीठ,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन,**
**विद्यानगरी, सांताक्रुझ (पू),**
**मुंबई ४०० ०९८.** **.... उत्तरवादी**

**विवेचन**

अर्जदार श्री.भूषण मालगावकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलकाराने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२०.११.२००७ रोजी अर्ज करुन, सन २००२ ते २००७ या कालावधीत मुंबई विद्यापीठात आयोजित केलेल्या (पदवी, पदवित्तोर, पी.एच.डी) किती परिक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्या होत्या. त्याकरिता मुंबई विद्यापीठातील कर्मचारी वर्ग जबाबदार होता का, मुंबई विद्यापीठातील परिक्षा नियंत्रक जबाबदारी पारपाडण्यात कसून करत असेल तर पदाचा राजीनामा का देत नाहीत इत्यादी अनुषंगीक माहिती मागीतली होती. मागणीप्रमाणे माहिती प्राप्त झाली नाही. यामुळे अपीलकाराने दि.०३.०१.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय प्राधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही.

माहिती दिली नाही.  यामुळे व्यथीत होउन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि.०९.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते.  अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचेवेळी अपीलकार यांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले.  तसेच अपीलातील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलकाराने जन माहिती अधिका-यांकडे अर्ज करुन, मुंबई विद्यापीठातील सन २००२-२००७ या कालावधीत आयोजित केलेल्या परिक्षांचे पेपरफुटीबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती.  जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकारास विहित कालावधीत माहिती दिली नाही.  या परिस्थितीत मी आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलकाराच्या अर्जातील (a) बाबत माहिती पुरवावी.  सदर माहिती हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवावी. अर्जातील इतर मुद्याबाबतची माहिती, माहितीच्या अधिकारात मोडत नाही.  सदर प्रकरणी अपीलकारास विहित कालावधीत जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविलेली नाही.  याकरिता जन माहिती अधिका-यांना जबाबदार धरुन त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २० अनुसार शास्ती लादण्याची कारवाई का करण्यात येउ नये याबाबत १५ दिवसाचे आत आयोगाकडे लेखी खुलासा सादर करावा.  या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील अशंतः मान्य करण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक ३१.१२.२००९**

**(रामानंद तिवारी)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्र.२००९/४७३/०२**

**श्री. निशांत घाडगे**
**२१, गोकूळ,**
**डॉ.पेडणेकर बिल्डींग,**
**स.म.मार्ग, कुर्ला (प),**
**मुंबई ४०० ०७०.** **.... तक्रारदार**

**<u>विरुध्द</u>**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एस विभाग,**
**मुलुंड (प), मुंबई.** **.... उत्तरवादी**

**<u>विवेचन</u>**

तक्रारदार श्री.निशांत घाडगे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.१०.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१९.११.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार हजर नव्हते. तक्रारदार उपस्थित होते. तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी तक्रारदाराचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. तसेच तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, हॉटेल, उपहारगृहे, चायनिस रेस्टॉरंन्टला परवाने देण्यात आले आहेत काय? याबाबत अनुषंगीक माहिती मागीतली होती. उत्तरवादीने विहित कालावधीत माहिती पुरविली नसल्याच्या कारणावरुन तक्रारदाराने आयोगाकडे अपील क्र. ३०२३/०२ दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसात माहिती द्यावी असे आयोगाने दि.११.०८.२००९ रोजी आदेश पारित केले होते. सदर आदेशानुसार माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने क्र.४७३/०२ ही तक्रार दाखल केली. सदर प्रकरणी माहिती पुरविली नसल्याने गैरतक्रारदाराविरुध्द कलम २० अनुसार शास्तीची कारवाई का? करु नये याबाबत दि.२४.११.२००९ च्या पत्रान्वये खुलासा मागविला आहे.

तक्रारदारास दि.२३.०१.२००९ च्या अर्जास अनुसरुन दि.२०.०२.२००९ रोजी माहिती पुरविली. दि.१२.०३.२००९ च्या प्रथम अपीलावर दि.३१.०३.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली तक्रारदार अनुपस्थित होते. दि.०८.०४.२००९ रोजी तक्रारदारास उत्तर दिले असा गैरतक्रारदाराने दि.१८.१२.२००९ च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाकडे खुलासा सादर केला आहे.

राज्य माहिती आयोगाच्या दि.११.०८.२००९ च्या आदेशास अनुसरुन दि.२६.११.२००९ रोजीच्या पत्रान्वय तक्रारदारास माहिती पोटी रू.१२/- शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे गैरतक्रारदाराने कळविले. यावरुन उत्तरवादीने आयोगाच्या आदेशाचे पालन केले आहे असे दिसते. मी असे आदेश देतो की, गैरतक्रारदाराने हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास निशुल्करित्या पोच देय डाकेने माहिती पुरवावी.

**आदेश**

**तक्रार मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**
**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ याच्यांसमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्र.२००९/३५१/०२

श्री.शिवकुमार कलीराम अग्रवाल
२१५, अग्रवाल नगर, वासीनाका,
आर.सी.मार्ग, मुंबई ४०० ०७४. .... तक्रारदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
बांद्रा-कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पू),
मुंबई ४०० ०५१. .... उत्तरवादी

विवेचन

तक्रारदार श्री.शिवकुमार अग्रवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०६.२००९ रोजी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर दि.१०.०७.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सुनावणीकरिता गैरतक्रारदार तसेच तक्रारदार हजर नव्हते. सुनावणीचेवेळी तक्रारीतील कागदपत्राची तपासणी करण्यात आली.

तक्रारदाराने माहितीच्या अधिकारात गैरतक्रारदाराकडे अर्ज करुन, पांजरपोल लिंग रोड मधील बाधीत शिवशक्तीनगर, मुकुंदनगर, पटेल नगर, आदर्श नगर, दत्ता कृपा सोसायटी, मीत्तल सोसायटी नागबाबानगर येथील निवासी/ अनिवासी/अन्य याची अनुषंगीक माहिति मागीतली होती. अर्जातील मुध्द क्र.१, २, ३ व ६ बाबत तक्रारदारास दि.२०.०२.२००९ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. अर्जातील मुध्दा क्र.४ व ५ बाबत माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.२००९/१९५४/०२ दाखल केले होते. तक्रारदारास १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी असे दि.३१.०३.२००९ रोजी आयोगाने आदेश पारित केले होते. त्यानंतरही तक्रारदारास गैरतक्रारदाराने माहिती पुरविली नाही. यामुळे तक्रारदाराने क्र.३५१/०२ ही आयोगाकडे तक्रार दाखल केली. तक्रारीवरील सुनावणीकरिता दि.१०.०७.२००९ रोजी गैरतक्रारदार अनुपस्थित होते. यामुळे गैरतक्रारदारास दि.२५.०८.२००९

रोजी कारणे दाखवा नोटीस पाठवून खुलासा मागविण्यात आला आहे. गैरतक्रारदाराने कारणे दाखवा नोटीस विचारात घेउन तक्रारदारास अर्जात मुध्दा क्र.४ व ५ बाबत माहिती दि.१८.१२.२००९ च्या पत्रान्वये पुरविली आहे. दि.१८.१२.२००९ च्या पत्राची प्रत आयोगास माहितीस्तव सादर केली आहे. यावरून सदर प्रकरणी गैरतक्रारदाराने तक्रारदारास उर्वरित मुद्याची माहिती पुरवून आयोगाच्या आदेशाचे पालन केले आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(रामानंद तिवारी)**

**दिनांक ३१.१२.२००९** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**